
# महाराष्ट्राचे शिल्पकार एस्. एम्. जोशी





Design: Raja Badsal

ग. प्र. प्रधान

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# एस्. एम्. जोशी
## स्वातंत्र्यसेनानी आणि समाजवादी नेते

ग. प्र. प्रधान

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : नोव्हेंबर, २००१

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ४०/-

# अध्यक्षांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची फेब्रुवारी २००० मध्ये पुनर्रचना झाली. त्या पुनर्रचित मंडळाने ज्या विविध योजना नव्याने हाती घेतल्या त्या योजनांपैकी "महाराष्ट्राचे शिल्पकार" ही एक योजना आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे, अशा ७५ महनीय व्यक्तींची जीवनचरित्रे लिहून ती मंडळातर्फे प्रकाशित करण्यात येणार आहेत.

कुमारवयीन विद्यार्थी, ज्यांचे फारसे शिक्षण झालेले नाही; असे ग्रामीण व नागरी भागातील वाचक हा या ग्रंथमालेचा वाचक धरण्यात आलेला आहे. त्यामुळे अशा वाचकांना आकलन होईल अशी सुलभ भाषा व मांडणी या ग्रंथाची असावी तसेच प्रत्येक ग्रंथ शंभर ते सव्वाशे पृष्ठांचा व्हावा, अशी ही योजना आहे.

या योजनेअंतर्गत "एस्. एम्. जोशी : स्वातंत्र्यसेनानी आणि समाजवादी नेते" हा पहिला चरित्र ग्रंथ प्रकाशित होत आहे. खरे तर तेराव्या शतकापासून आजपर्यंतच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीचे एक समग्र चित्र या ग्रंथमालेतून उमटावे हा या योजनेचा हेतू असल्यामुळे कालानुक्रम निश्चित करून हे चरित्रग्रंथ प्रकाशित करण्याचा मंडळाचा मनोदय होता. परंतु त्यामुळे या योजनेतील पुस्तके प्रसिद्ध होण्यास खूप विलंब लागण्याची शक्यता होती. म्हणून जसजशी ही

चरित्रे लिहून होतील तसतशी ती प्रसिद्ध करण्याचा निर्णय मंडळाने घेतला.

एस्. एम्. जोशी यांचे महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. हा चरित्रग्रंथ आदरणीय प्रा. ग. प्र. प्रधान यांनी लिहून दिलेला असल्यामुळे व त्यांनी या चरित्रग्रंथाचे मनःपूर्वक लेखन केले असल्यामुळे या ग्रंथमालेचा स्तर निश्चित वाढलेला आहे, असे मला वाटते.

प्रधानसरांचा मी ऋणी आहे.

रा. रं. बोराडे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुंबई
दि. १२ नोव्हेंबर, २००१

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण – १ | विद्यार्थिदशा आणि मनाची घडण | १ |
| प्रकरण – २ | स्वातंत्र्य संग्रामातील समर्पण | ३४ |
| प्रकरण – ३ | फावडे, तुरुंग आणि मतपेटी | ७९ |
| प्रकरण – ४ | संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन | ९३ |
| प्रकरण – ५ | तीन क्षेत्रांतील कार्य | १०९ |
| प्रकरण – ६ | समाजवादी चळवळीची वाटचाल | १३३ |
| प्रकरण – ७ | ‘आणीबाणी’ विरुद्ध संघर्ष आणि जनता पक्ष | १५० |
| प्रकरण – ८ | अखेरचे पर्व | १८६ |

# प्रकरण १

## विद्यार्थिदशा आणि मनाची घडण

१९७६ सालातला मे महिना. रत्नागिरीहून सकाळी निघालेली एस्.टी. ची बस अर्ध्या तासात गोळप या लहानशा गावी पोहोचली. तेथे एक उंच, शिडशिडीत बांध्याचे वृद्ध गृहस्थ आपल्या तीन नातवंडांना आणि सुनेला घेऊन उतरले. झपाट्याने चालत त्यांच्या जुन्या घरी पोहोचल्यावर उत्साहाने नातवाला म्हणाले, 'निक्या, हे आपलं घर. इथं माझं लहानपण गेले. आज आपण रत्नागिरीहून पटकन् बसने आलो. पण माझ्या लहानपणी आधी रत्नागिरीला बंदरावर यायचं; मग भाट्याची तर ओलांडली की नंतर बैलगाडीने दोन अडीच तासांनी आम्ही इथं पोहोचायचे.' हे सत्तरी ओलांडलेले वृद्ध गृहस्थ होते महाराष्ट्रातले थोर समाजवादी नेते एस्. एम्. जोशी. त्यांच्या बरोबर त्यांची सून डॉ. कांचन आणि तिची तीन मुले होती. त्यांच्यातला थोरला, ९ – १० वर्षांचा अनिकेत. एस्. एम्. त्याला प्रेमाने हाक मारीत 'निक्या'. एस्. एम्.चा तो फार लाडका होता. तो एकदा आपल्या आजोबांना म्हणाला, 'अण्णा, माझी मुंज का नाही तुम्ही करीत? मुंज केली म्हणजे मला खूप प्रेझेंट्स मिळतील.' त्याचे वडील डॉ. अजेय जवळच बसले होते. ते म्हणाले, 'अरे, अण्णांनी माझी, तुझ्या बजाकाकाचीही मुंज

नाही केली.’ एस्. एम्. यावर म्हणाले, ‘अजा, तुझी आणि बजाची मुंज केली नसली तरी आता मात्र मी माझ्या पद्धतीनं निक्याची मुंज करणार आहे.’ सगळ्यांना हे ऐकून आश्चर्यच वाटले. निक्या मात्र खूष झाला. अनिकेतच्या शाळेला सुट्टी लागल्यावर एस्. एम्. त्याला, त्याच्या दोन भावंडांना आणि त्यांच्या आईला घेऊन रत्नागिरीस गेले. तेथे ते आबा वणजूंच्या लॉजमध्ये उतरले. सकाळी आंघोळी झाल्यावर एस्. एम्. म्हणाले, ‘चला आता’; आणि ते त्या सर्वांना, लो. टिळकांचा ज्या घरात जन्म झाला होता, त्या घरी घेऊन गेले. तिथे गेल्यावर एस्. एम्. म्हणाले, ‘ही फार पवित्र जागा आहे. इथं बाळ गंगाधर टिळकांचा – ज्यांना आपण लोकमान्य टिळक म्हणतो त्यांचा जन्म झाला. टिळकांचं हायस्कूलचं शिक्षणही इथं रत्नागिरीतच झालं. टिळकांनी भारताला स्वराज्याचा मंत्र दिला. स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश सरकारविरुद्ध लोकांना उठवले, सरकारवर टीका केली म्हणून टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली आणि सरकारने त्यांना ब्रह्मदेशात मंडालेच्या तुरुंगात ठेवलं. शिक्षा भोगून सुटल्यावर लोकमान्य टिळक पुण्याला परत आले. मी त्या वेळी पुण्याला टिळकांनी स्थापन केलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत होतो. तेव्हा एक दिवस आम्ही दहाबारा विद्यार्थी त्यांना नमस्कार करण्याकरिता गायकवाड वाड्यात टिळक राहात तिथे गेलो होतो. लो. टिळक, महात्मा गांधी यांच्यामुळे मी स्वातंत्र्य चळवळीत पडलो. निक्या, ही

टिळकांची जन्मभूमी. इथं नमस्कार कर.’ अनिकेतने, त्याच्या बहिणींनी आणि आईने एस्. एम्. यांच्याबरोबर लोकमान्य टिळकांच्या छायाचित्राला नमस्कार केल्यावर एस्. एम्. अनिकेतच्या आईला म्हणाले, ‘कांचन, लोकमान्यांच्या घरात आपण आलो. त्यांना नमस्कार केला. हाच खरा संस्कार. मी निक्याला, तुम्हांला इथं आणलं तो हा संस्कार करण्यासाठी. हीच त्याची मुंज.’ हा संस्कार केल्यानंतर एस्. एम्. नातवंडांना, सुनेला घेऊन गोळपला गेले. तिथं ते कांचनला म्हणाले, ‘मुलांना आपला देश कळला पाहिजे. नुसतं पुण्यात राहून नाही तो समजायचा. निक्याने रत्नागिरीला समुद्र पाहिला, आपलं गाव पाहिलं. आता त्याच्यावर करायचा संस्कार पुरा झाला. आता त्याची मुंज पुरी झाली.’ इतकं बोलून एस्. एम्. नातवंडांना म्हणाले, ‘आता इथले आंबे खाल्ले, कोकम सरबत घेतलं, काजूची उसळ, फणसाचे गरे खाल्ले म्हणजे कळेल तुम्हांला आपल्या कोकणाची गोडी.’

कोकणावर एस्. एम्.चे फार प्रेम होते. बरका फणस तर भलताच आवडायचा. मी त्यांना एकदा सहज म्हणालो, ‘बरक्या फणसातला गरा गिळगिळीत असतो.’ ते हसले आणि म्हणाले, ‘तुम्हां घाटावरच्या लोकांना त्याची लज्जत कळायचीच नाही. माझ्यासारख्या कोकण्यालाच ती कळणार.’

## बालपण आणि प्राथमिक शिक्षण

गोळप हे एस्. एम्. चे गाव. पण त्यांचा जन्म मात्र पुणे जिल्ह्यातल्या जुन्नरला १२ नोव्हेंबर १९०४ ला झाला. त्यांचे वडील जुन्नरच्या कोर्टात नाझर होते. पाच भाऊ आणि तीन बहिणी अशी आठ सख्खी भावंडे. शिवाय चुलतभाऊ, तात्या सहकुटुंब सहपरिवार, काकी, आई असे हे एकत्र कुटुंब होते. एस्. एम्. भावंडांमध्ये चौथे. त्यांचे नाव होते श्रीधर. जन्म जुन्नरला झाला तरी श्रीधरचे प्राथमिक शिक्षण मात्र गोळपलाच झाले. प्राथमिक शाळेतील एक मास्तर श्रीधरचे दूरचे काकाच होते. ते छान शिकवायचे. मुलांना वर्गात गणित, हिशोब शिकवतानाच त्यांचे पोस्टाचेही काम चालायचे. बाबूकाकांचा श्रीधरला आणि सगळ्या विद्यार्थ्यांना धाक वाटे. कारण ते मुलांना हात पसरायला लावून रुळाने मारीत. शाळेचे मुख्य मास्तर होते केळकर. ते विड्या फुंकायचे म्हणून गावात त्यांना 'फुक्या मास्तर' म्हणत. शाळा डोंगराच्या बाजूला होती. मध्ये एक दरड होती. ती फोडून विद्यार्थ्यांच्या मदतीने तिथे केळकर मास्तरांनी बाग केली. गोळप गावात दोन पाठशाळा होत्या. श्रीधरच्या वडिलांनी एकाही मुलाला पाठशाळेत घातले नाही म्हणून गावातील भिक्षुकांचा त्यांच्यावर राग होता. गाव सनातनी होते. गावात जी महार मंडळी होती ती एका रस्त्याने जायची आणि बाकीची माणसे दुसऱ्या रस्त्याने. कारण काय, तर महारांची सावली इतरांवर, विशेषतः ब्राह्मणांवर पडू नये. या सनातनी

गावात बायकांना कसे वागवीत असत आणि त्याचा श्रीधरच्या मनावर कसा परिणाम झाला, हे एस्. एम्. यांनी त्यांच्या 'मी एस्. एम्.' या आत्मकथनात पुढीलप्रमाणे लिहिले आहे.

"लहानपणी एकदा आई उगीचच्या उगीच रागावली, या समजुतीने मी तिच्यावर रागावून घराच्या खालून पाट वहात होता तिथे जाऊन बसलो. संध्याकाळपर्यंत जेवलोही नाही. आमच्या शेजारी उमाकाकू लेले म्हणून एक विधवा बाई राहात. या उमाकाकूने मला जेवू घातले व घरी आणून सोडले. या उपकारकर्त्या उमाकाकूच्या आयुष्याची पुढे कालान्तराने जी परवड झाली तिने माझ्या हृदयावर मोठा आघात झाला. ती विधवा होती. कुणाशी तरी तिचा संबंध आला आणि तिला दिवस गेले. तो गर्भ पुढे पाडला म्हणा, काही म्हणा; पण उपद्व्यापी लोकांनी तो उचलून आणून आमच्या गावच्या दीक्षितांपुढे ठेवला! दीक्षितांनी उमाकाकूला बोलावून तिची खूप निर्भत्सना केली. उमाकाकूला धरणी पोटात घेईल तर बरे, असे वाटले. ती घरदार सोडून जी गेली ती गेलीच. पुन्हा तिने गाव बघितले नाही. नरसोबाच्या वाडीस भीक मागून तिने आयुष्य संपविले, असे कानावर आले. या घटनेचा माझ्या मनावर परिणाम झाला. फार बोच लागून राहिली. वाटायचे, काय हे! या बाईला माणसासारखेसुद्धा वागवले नाही. तिला जीवनातून उठवले. या घटनेवर आईला विचारण्याइतकी बेचैनी प्राप्त व्हावी इतका मी मोठा झालो होतो. त्या वेळी मी आईला विचारले,

'बायको मेली तर पुरुष लग्न करतो. त्याप्रमाणे नवरा मेला तर बाईला लग्न का करता येऊ नये?' आई म्हणाली, 'तुला त्यातलं कळायचं नाही.' मी जरा रागातच म्हणालो, 'काय कळायचं नाही?' तेव्हा आई म्हणाली, 'बाईमाणूस मातीच्या भांड्याप्रमाणं असतं. मातीच्या भांड्यात आपण जर काही खाल्लं तर ते फेकून द्यायचं. ते धुवून पुन्हा त्यात खात नाहीत. पुरुष हा धातूच्या भांड्यासारखा आहे. धातूचं भांडं आपण पुनः पुन्हा घासून पुसून वापरतोच की नाही? तसं आहे हे.'

आईच्या उत्तराचे मला फार आश्चर्य वाटले. बाईच्या बाबतीत एक न्याय आणि पुरुषाच्या बाबतीत वेगळा न्याय. हा त्या वयात माझ्यावरती केवढा मोठा आघात होता!"

गोळप या सनातनी गावात महारांना, स्त्रियांना मिळणारी वागणूक पाहून श्रीधरचे संवेदनाशील मन दुखावले. काय करावे, हे त्या वेळी श्रीधरला समजत नव्हते. पण मनावरच्या त्या आघाताची जाणीव मोठ्या वयात तीव्रतेने झाली तेव्हा मात्र त्याचे मन अन्यायाविरुद्ध पेटून उठले.

गोळपच्या या ब्राह्मणी संस्कृतीत श्रीधरचे आईवडील वाढले खरे, पण त्यांच्यात उदारता होती. वडील जुन्नरहून आले म्हणजे लाकडे फोडून घेण्यासाठी धन्या या कुळवाड्याला बोलावून घेत. हा धन्या एकदा विषमज्वराने आजारी पडला. श्रीधरची आई धन्यासाठी मऊ भात करायची. स्वतः तो घेऊन जायची. एकदा श्रीधर आईबरोबर

गेला होता. धन्याला जेवायला बसवले, भात लोणचे वाढले. एक-दोन घास तो जेवला. पण पुढे त्याला अन्न जाईचना. दोन दिवसांनी तो वारल्याचे कळताच आई रडायला लागली. आसवे टिपता टिपता म्हणाली,‘गेला बिचारा.’

श्रीधरचे वय मरण म्हणजे काय ते कळण्याचे नव्हते. पण आईच्या मनातील सहानुभूतीचा त्याच्या मनावर परिणाम मात्र झाला. श्रीधर तिसरी पास झाला आणि गोळपला पुढील शिक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे वडिलांनी त्याला जुन्नरला न्यायचे ठरविले. श्रीधरचे वय तेव्हा दहा वर्षांचे होते. आईला सोडून जायचे जीवावर आले होते. आईने जवळ घेऊन भरल्या डोळ्यांनी त्याची पाठवणी केली.

श्रीधरच्या वडिलांनी रत्नागिरीहून कार्गो बोटीने जायचे ठरविले. अशी एक कार्गो स्टीमर आली. बोट समुद्रात उभी. तिच्यापर्यंत जाऊन पोचण्यासाठी खपाट्याने जावे लागले. खपाटा बोटीला लागला. पण सामान ज्या खपाट्यात होते तो वाहावला त्यामुळे श्रीधर आणि त्याचे वडील निमूटपणे किनाऱ्यावर आले. मग स्टीमरचा नाद त्यांनी सोडला. बैलगाडीने तीन दिवस प्रवास करून मलकापुरला आले. तेथून पोस्टाच्या टांग्यातून कोल्हापूर; तेथून रेल्वेने दुसऱ्या दिवशी पुण्याला आले. पुण्याला श्रीधरचा थोरला भाऊ शिक्षणासाठी रहात होता. तेथे दादाने छोट्या श्रीधरला आर्यन थिएटरमध्ये एक आण्यात सिनेमा दाखवला. पुण्यात एक दिवस राहून वडिलांच्या बरोबर

श्रीधर रेल्वेने तळेगावला आला आणि तेथून मोटारने जुन्नरला पोचला. जुन्नरला श्रीधर चौथ्या इयत्तेत बसला. त्याच्या वर्गात एक ढोराचा मुलगा होता. तो हुशार होता. त्याचा नेहमी पहिला नंबर यायचा. पण वर्गात बाकीची मुले बाकावर बसत असताना तो मात्र दरवाज्याजवळ गोणपाटावर बसे. श्रीधरची आणि त्याची दोस्ती झाली. खाऊसाठी त्याला घरातून थोडेसे पैसे मिळत. तो त्याचे पेरू घेई. अर्धे श्रीधरला देई. पण चौथीनंतर तो जुन्नरलाच राहिला आणि श्रीधर मात्र शिकण्यासाठी जुन्नर सोडून गेला.

श्रीधरचे वडील निवृत्त झाले होते. त्यांना पंचवीस रुपये पेन्शन मिळे. एका ट्रस्टचे कारभारी म्हणून त्यांनी नोकरी धरली. तिथे पंचवीस रुपये मिळत. इतक्या तुटपुंज्या पैशातही ते एकत्र कुटुंबाचा प्रपंच चालवीत. दुर्दैवाने ते अकस्मात निधन पावले. त्यांच्या निधनामुळे घर उद्ध्वस्तच झाले. वडिलांच्या निधनाची दाहक आठवण मनात घेऊन श्रीधर पुन्हा मुंबईमार्गे गोळपला आईकडे आला. वैधव्याच्या आघाताने ती धाय मोकलून रडली. गावात कोणत्याही घरी मृत्यू झाला की गावाची सहानुभूती असे. परंतु श्रीधरच्या वडिलांचे आणि गोळप गावातील ब्राह्मणांचे कशावरून तरी भांडण झाले होते आणि सनातनी ब्राह्मणांनी त्यांना वाळीत टाकले होते. ते जेव्हा वारले तेव्हा श्रीधरच्या थोरल्या भावाने जाऊन माफी मागितली. मगच त्यांच्या वडिलांचा अकरावा बारावा करायला ब्राह्मण मिळाले. जोशी कुटुंबावरील या

दुर्घर प्रसंगात श्रीधरच्या थोरल्या भावाने धीराने कुटुंबाची जबाबदारी घेतली. तो हुशार विद्यार्थी होता. प्रिव्हिअसला फर्स्ट क्लासमध्ये आला होता. पण इंटरच्या वर्गात असताना त्याने शिक्षण सोडून कलेक्टर कचेरीत नोकरी धरली. त्या वेळी त्याला वीस रुपये पगार मिळे. ८ रुपयांत तो एकवेळ जेवून राही आणि बारा रुपये गोळपला आईला आणि भावंडांना खर्चासाठी पाठवी. सगळा ओढग्रस्तीचा संसार. इतकी तोंडं खाणारी आणि स्वस्ताई असली तरी बारा रुपयांत भागत नसे. अडीअडचणीत पुरशामामा मदत करी. घरातले तांदूळ संपले की श्रीधरची आई सांगे, 'अरे पुरशा, काही तरी करून गोणभर तांदूळ दे आणून.' त्या वेळी रंगूनचे तांदूळ अडीच तीन रुपयांत शंभर किलो मिळत. गोणभर तांदूळ पंधरा दिवस पुरत असे. आमटी – भातावर कशीतरी पोटाची खळगी भरायची. मधून मधून पुरशाची आजी कधी ताक, कधी लोणचे आणून देई.

गोळप गावच्या खोतांचा भाऊ अर्धवट होता. पण घरच्या श्रीमंतीमुळे त्याचे एका सुंदर मुलीशी लग्न झाले. पुरशामामाचे त्या घरी येणेजाणे असे. पुरशा गावच्या नाटकात काम करी. तो दिसायलाही देखणा होता. खोतांच्या वेडसर भावाच्या बायकोशी दोस्ती जमली. या प्रकरणी मारामारीही झाली. एक दिवस संध्याकाळी बापू खोत आणि त्यांचे मित्र अंधारात बसून बोलत होते. श्रीधर जवळ उभा होता, हे त्यांच्या लक्षात आले नाही. खोत

त्याच्या मित्राला म्हणाले, ‘या पुरशाला जर शेण खायचं होतं तर ते आमच्या घरी कशाला? कुळवाड्यांच्या बायका काय कमी होत्या?’ अकरा – बारा वर्षांच्या श्रीधरला हे ऐकून धक्काच बसला. या घटनेबद्दल एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे.

“ब्राह्मणांच्या बायका शुचिर्भूत राहिल्या पाहिजेत. कुळवाड्यांच्या न राहिल्या तर चालतील. असाच ना हा विचार? माझे मन ते उद्गार ऐकून अगदी बावरून गेले. त्या वयात माझ्या मनावर झालेला हा दुसरा आघात. वडील वारल्यानंतरची परिस्थिती आणि मनावर झालेले हे आघात यातून नैतिक जीवनासंबंधीचे विचारचक्र माझ्या मनात सुरू झाले. पण शिक्षण घेणे महत्त्वाचे होते. जायचे कोठे, हा प्रश्न उभा राहिला. श्रीधरचा चुलतभाऊ नागपुरला गेला होता. त्याला छापखान्यात वीस रुपये पगार मिळे. त्याचे लग्न झाले होते. एक मुलगी होती. पण काकूवरचा भार कमी व्हावा म्हणून तो श्रीधरला नागपुरला घेऊन गेला. सुळे स्कूलला श्रीधर पाचवीत जाऊ लागला. परंतु त्याच वेळी तात्याची नोकरी सुटली. तीन महिने फी देता आली नाही. मुख्याध्यापकांनी शाळेतून नाव काढून टाकले. घरात तांदळाचा दाणा नव्हता. उपास पडत होते. शेजारच्या परदेशी बाईच्या हे लक्षात आले. तो श्रावणाचा महिना होता. त्या शेजारच्या बाईंनी श्रीधरला बोलावले. ब्राह्मणाच्या मुलाला जेवायला कसे घालायचे, म्हणून वाटीभर दह्यात

साखर घालून श्रीधरला ते खायला दिले. माणुसकीच्या या स्पर्शाने श्रीधरचे मन गलबलून आले.

## अखेर शिक्षणाची संधी लाभली

नागपूर सोडायचे ठरले. चुलतभावाचा एक मित्र रेल्वेत नोकरीला होता. त्याच्या मदतीने श्रीधर मुंबईस त्यांच्या नात्यातल्या आत्माराम लेले यांच्याकडे आला. त्याचे शिक्षण श्रीधरच्या वडिलांनी केले होते. त्याला श्रीधरचे शिक्षण करणे फारसे कठीण नव्हते. पण तो ते करायला तयार नव्हता. तेवढ्यात त्याचे सासरे पुण्याहून आले. ते श्रीधरला म्हणाले, ‘माझ्याबरोबर पुण्याला चल, मी तुझी सोय लावून देतो.’ श्रीधर त्यांच्याबरोबर पुण्याला आला. त्यांनी श्रीधरचे वार लावून दिले. श्रीधरच्या थोरल्या भावाला हे मान्य नव्हते. त्याने खटपट करून त्यांच्याच चुलत घराण्यातल्या गोविंदराव जोशींकडे आश्रित विद्यार्थी म्हणून श्रीधरची सोय केली. त्या वेळी आश्रित मुलांना वरची कामे करावी लागत. कंदिलाच्या काचा पुसून त्या लखलखीत ठेवणे, जेवणाच्या वेळी पाटपाणी करणे, गोठ्यातल्या म्हशीची धार काढायला गडी आला की म्हशीचे आंबोण नेऊन ठेवणे, विहिरीचे पाणी काढणे, भांडी विसळणे ही सारी कामे श्रीधर करीत असे. आणखी एक काम त्याला करावे लागे. त्या घरातली लंगडी मुलगी द्वारका कुबड्या घेऊन हुजूरपागेत जात असे. श्रीधर तिला तिच्या शाळेत पोचवून

तेथून त्याच्या शाळेत न्यू इंग्लिश स्कूलमध्ये, रमण बागेत जाई. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जुन्नरच्या जुन्या शाळेच्या दाखल्यावर त्याला इंग्रजी पहिलीत प्रवेश मिळाला. तिमाहीत तो पहिला आला. पण फी कोठून भरणार? वर्गशिक्षकांनी सांगितले, 'तू फ्री स्टुडंटशिपसाठी अर्ज कर.' श्रीधर तसाच उठला आणि शाळेचे सुपरिटेन्डेन्ट एस्. आर्. कानिटकर यांच्याकडे गेला आणि म्हणाला, 'सर, मी आश्रित म्हणून राहतो. फी कोठून देणार? नागपुरला मी तीन महिन्याची फी दिली नाही म्हणून मला शाळा सोडावी लागली. तुम्ही मला फ्री स्टुडंटशिप दिली तरच माझं शिक्षण चालू राहील!' कानिटकरांना या हुशार विद्यार्थ्यासाठी काहीतरी करावे असे वाटले. असि. सुपरिटेन्डेन्ट चिपळूणकर पलीकडच्या खोलीत बसले होते. कानिटकरांनी बसल्या जागेवरून मोठ्याने विचारले, 'चिपळूणकर, आपल्याकडे एखादी फ्री स्टुडंटशिप शिल्लक आहे का?' चिपळूणकरांनी त्यांच्या खोलीतूनच उत्तर दिले, 'आहे. पण ब्राह्मणांसाठी नाही.' कानिटकरांनी श्रीधरला सोमवारी यायला सांगितले. शिक्षण थांबणार की काय, या काळजीने श्रीधर अस्वस्थ होता. सोमवारी भीतभीतच तो कानिटकरांच्या ऑफिसमध्ये गेला. कानिटकर कठोर शिस्तीचे, नियमांचे काटेकोर पालन करणारे. पण तिमाहीत पहिल्या येणाऱ्या या तरतरीत हुशार मुलाला संधी द्यायचे त्यांनी ठरविले. ते गंभीरपणे म्हणाले, 'उत्तम अभ्यास कर,

तुला फ्री स्टुडंटशिप दिलीय. जा आता वर्गात.' श्रीधरच्या मनावरचे ओझे उतरले. आता आपले शिक्षण चालू राहणार, हे समजल्यावर घरच्या कामाचेही काही वाटेनासे झाले. घरातल्या गंगूवहिनी श्रीधरवर लक्ष ठेवीत. त्याचा प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि हुशारी लक्षात आल्यावर गंगूवहिनी त्याच्यावर माया करायला लागल्या. गंधर्वाचे नाटक लागले तेव्हा पाहुण्यांसह सगळे नाटकाला गेले. श्रीधर अर्थात घरीच होता. गंगूवहिनी नाटकाला जाऊन आल्यावर म्हणाल्या, 'आता पुढच्या नाटकाला मी तुला पाठवीन.' श्रीधर आजारी पडला की गंगूवहिनी मायेने त्याची शुश्रूषा करीत. श्रीधरला गरिबीचे चटके बसत होतेच, पण असा मायेचा ओलावाही मिळत होता.

श्रीधरला शाळेत जिवलग मित्र मिळाले. श्रीधर आणि गोपीनाथ तळवलकर पहिलीपासून मॅट्रिकपर्यंत एका वर्गात होते. चौथीत असतना शिखरे, तारकुंडे हे हुशार विद्यार्थी वर्गात आले. गोरे, खाडिलकर, शिरुभाऊ लिमये, गं. भा. निरंतर हेही श्रीधरचे वर्गमित्र. शिक्षक खूप मेहनत घेऊन शिकवत. शिक्षकांमध्ये काहीजण मवाळ मताचे होते, तर काही जहाल मताचे होते. चहा न पिणे हे त्या वेळी देशभक्तीचे लक्षण मानले जाई. म्हणून श्रीधरच्या मित्रांनी फळ्यावर लिहिले, 'बाबांनो, चहा पिऊ नका.' मवाळ मताच्या चिपळूणकरांना राग आला आणि निरंतर या श्रीधरच्या मित्राला चार छड्या खाव्या लागल्या. श्रीधरने

एकदा फळ्यावर देशभक्तिपर वाक्य लिहिले. आपटे सर जहाल मताचे. त्यांनी ते वाक्य वाचले आणि म्हणाले, ‘बोर्डावर लिहिताय ठीक आहे. पण देशभक्ती सोपी नाही, हे लक्षात ठेवा.’ शिक्षकांशी हे विद्यार्थी वादही घालीत आणि तरीही शिक्षक त्यांना उत्तेजन देत. श्रीधर आणि त्याच्या मित्रांनी हस्तलिखित मासिक काढले. त्या मासिकाचे नाव होते ‘वसंत’. त्यात श्रीधरने ‘शिवनेरीचा प्रवास’ हा लेख लिहिला होता. त्यांनी ते मासिक नेहमी खादी वापरणाऱ्या धारप मास्तरांना दिले. ते वाचल्यावर त्यांना ते फार आवडले. त्यांनी त्या मासिकात एक रुपया घालून मुलांना ते परत दिले. आणि ते म्हणाले, ‘हे असेच पुढे चालले पाहिजे’. पाठीवर अशी शाबासकीची थाप पडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनाचा हुरूप वाढला. श्रीधर हा अभ्यासू विद्यार्थी होता. क्रिकेट आणि विटीदांडू हे खेळ त्याच्या आवडीचे होते. तो वर्गात खट्याळपणाही खूप करी. शं. के. कानेटकर – कवी गिरीश – या शिक्षकांचा तो आवडता विद्यार्थी होता. ते एकदा श्रीधरला म्हणाले, ‘You are a clever boy but there is a lot of a jackal in you.’

न्यू इंग्लिश स्कूलमधील हे हुशार विद्यार्थी वर्गाचा गणपती उत्सव करीत आणि तेथे ते तात्यासाहेब केळकर, ज. स. करंदीकर, बाबुराव गोखले अशा वक्त्यांना भाषणाला बोलावीत. जी. जी. दामले हे इतिहास शिकविणारे तरुण शिक्षक विद्यार्थ्यांना किल्ले पहायला घेऊन जात. पुरंदर,

रायगड, सिंहगड, शिवनेरी या गडांवर गेल्यामुळे शिवछत्रपतींच्या पराक्रमी स्फूर्तीदायी जीवनाचा संस्कार या विद्यार्थ्यांवर झाला.

न्यू इंग्लिश स्कूलसमोरच लोकमान्य टिळक राहात असलेला गायकवाड वाडा होता. एकदा मधल्या सुट्टीत श्रीधर आणि त्याचे मित्र लोकमान्यांना पहायला गेले. टिळकांनी नुसती 'कोणत्या वर्गात आहात?' अशी चौकशी केली. पण केवळ त्यांच्या दर्शनाने विद्यार्थ्यांना वाटले की आपणही देशासाठी काहीतरी केली पाहिजे. टिळक इंग्लंडहून परत आले त्या वेळी त्यांची मिरवणूक निघाली होती. श्रीधर आणि त्याचे दोस्त मिरवणुकीत गेले. त्यामुळे शाळेत यायला एक तास उशीर झाला. शाळेच्या दरवाज्यावर सुपरिन्टेन्डेंट छडी घेऊन उभेच होते. त्यांच्या हातची छडी खाऊनच सगळेजण वर्गात गेले. त्यांनी ही शिक्षा आनंदाने सोसली. १९२० साली लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अस्थींच्या मिरवणुकीस गेल्याबद्दलही या विद्यार्थ्यांना छड्या खाव्या लागल्या. त्या वेळी देशातले वातावरण देशभक्तीचे होते. न्यू इंग्लिश स्कूलमधल्या या हुशार विद्यार्थ्यांच्या मनावर हा देशभक्तीचा संस्कार होत होता.

दोन वर्षांनी श्रीधर हा आपटे यांच्या घरी राहू लागला. पुढे श्रीधरचा धाकटा भाऊही पुण्यास आला. थोरल्या भावाचा पगार वाढल्यावर श्रीधर व त्याचा भाऊ खोली घेऊन

राहू लागले. ते हाताने स्वयंपाक करून जेवत व शाळेला जात. नंतर श्रीधरची आई आणि दोन बहिणीही पुण्यात आल्या. भाऊ महाराजांच्या बोळातील खाडिलकरांच्या वाड्यात त्यांनी बिऱ्हाड केले. श्रीधर मॅट्रिक झाला त्यावेळी तेथेच राहात होता. त्या वेळी शाळेतील विद्यार्थी एकमेकांना इंग्रजी आद्याक्षरी नावांनी हाक मारीत. श्रीधरला सर्वजण एस्. एम्. म्हणत, आणि तेच त्याचे नाव कायमचे पडले. श्रीधर १९२५ साली मॅट्रिक झाला, तेव्हा सगळे त्याला 'एस्. एम्.' म्हणूनच ओळखू लागले.

**देशभक्तीच्या भावनेचा उगम**

मनाची घडण ज्याप्रमाणे घरातील आणि शाळेत होणाऱ्या संस्कारांमुळे होते त्याचप्रमाणे समाजस्थितीमुळे आणि राजकीय परिस्थितीमुळेही होते. एस्. एम्. याच्या मनावर लहानपणी आईवडिलांच्या उदारतेचा संस्कार झाला. त्याचबरोबर भोवतालच्या सनातनी वातावरणातील संकुचितपणा आणि दलितांवरील व स्त्रियांवरील अन्याय यांमुळे आघातही झाले. पुण्यात हायस्कूल विद्यार्थी असताना शिक्षकांमुळे अभ्यासाची तसेच खूप अवांतर वाचन करण्याची सवय लागली. आणि हुशार व ध्येयवादी मित्रांच्या वर्तुळात अंगभूत गुणांमुळे तो सगळ्याबाबतीत पुढाकार घेत असताना नायक बनला. पारतंत्र्यातून आपला देश मुक्त झाला पाहिजे, ही शिकवण देणारे आणि त्यासाठी दीर्घमुदतीचा कारावास

सोसणारे लोकमान्य टिळक हे पुण्याचे त्या वेळी जणू दैवतच होते. एस्. एम्. च्या मनातही लोकमान्यांबद्दल आदराची भावना निर्माण झाली. १९१९ साली पंजाबमध्ये जालियनवाला बाग हत्याकांड झाले. ब्रिटिशांनी केलेल्या या अत्याचारांमुळे आणि जुलमांमुळे देशात संतापाची लाट उसळली. महात्मा गांधींनी या वेळी देशभर हरताळ पाळण्याचे आवाहन केले. आणि या अन्यायाविरुद्ध सत्याग्रहही केला. लो. टिळक त्या वेळी ब्रिटिश पार्लमेंटच्या समितीपुढे साक्ष देणाऱ्या शिष्टमंडळात इंग्लंडमध्ये होते. तेथेही त्यांनी जालियनवाला बागेत ब्रिटिशांनी केलेल्या हत्याकांडाचा निषेध केला आणि इंग्लंडमधून परत आल्यावर मुंबई बंदरात उतरताच ते म्हणाले, 'गांधींनी सत्याग्रह सुरू केला त्या वेळी मी हिंदुस्थानात असायला हवा होतो, असे मला फार वाटते. त्यांच्याबरोबर राहून मी अडचणी सोसल्या असत्या.' त्या वेळी हायस्कूल विद्यार्थी असलेल्या एस्. एम्. ला यामुळे एक समजले की लो. टिळक आणि म. गांधी या दोघांचे विचार सारखे होते आणि दोघेही कट्टर स्वातंत्र्यवादी होते. पुढे १९२० साली लो. टिळकांचे निधन झाले. त्यानंतर म. गांधींनी असहकाराच्या चळवळीचे रणशिंग फुंकले. त्याबद्दल 'मी एस्. एम्.' या आत्मकथनात लिहिले आहे. 'सबंध देशात एका नव्या जागृतीची लाट आली आहे व आपणही त्या लाटेत वाहून गेलो आहोत, असे मला वाटले.' अर्थात् लहान वयामुळे चळवळीत पडण्याचा प्रश्न नव्हता.

परंतु म. गांधींच्या प्रभावामुळे एस्. एम्. खादी वापरू लागले. एस्. एम्. ची त्याचा भाऊ बाळू याच्याशी या विषयावर चर्चा झाली तेव्हा बाळूने देशातील अनेकांच्या हाताला काम मिळेल म्हणून खादी वापरली पाहिजे, हा विचार आग्रहाने मांडला. एस्. एम्.ला तो मनोमन पटला आणि जाडीभरडी खादी वापरण्यात त्याला आनंद वाटू लागला.

## विशाल क्षितिज गवसले

कॉलेजची चार वर्षे ही त्या शिक्षणाची संधी मिळालेल्या प्रत्येक तरुणाच्या जीवनात फार महत्त्वाची असतात. या कालखंडात ज्ञानाच्या क्षितिजाचे दर्शन घडविणारे प्राध्यापक मिळाले आमि ग्रंथांशी नाते जुळले तर बुद्धीला पंख फुटतात. डोळसपणे भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण केले तर त्या काळाची आव्हाने कोणती आहेत ते समजू लागते आणि मनाला ती आव्हाने स्वीकारावी असे वाटू लागते. लहानपणी शिक्षणासाठी भ्रमंती करण्यात काही वर्षे गेल्यामुळे एस्. एम्. समकालीन विद्यार्थ्यांपेक्षा दोन तीन वर्षांनी मोठे होते आणि परिस्थितीचे जे टक्केटोणपे त्यांना लहानपणापासून मॅट्रिक होईपर्यंत सोसावे लागले त्यामुळे त्यांच्या जाणिवा प्रगल्भ झाल्या होत्या. फर्ग्युसन कॉलेजमधील ग्रंथालय उत्तम ग्रंथांनी सुसज्ज होतेच आणि तेथील 'ओपन शेल्फ' पद्धतीमुळे ज्ञानोत्सुक विद्यार्थ्यांना हवी ती पुस्तके वाचावयास सहजपणे मिळत होती. शिवाय वा. गो. काळे यांच्यासारखे विद्यार्थ्यांवर

प्रेम करणारे, त्यांना उत्तम मार्गदर्शन करणारे ज्ञानवंत प्राध्यापक एस्. एम्.ला अर्थशास्त्र शिकविण्यासाठी लाभले होते. राज्यशास्त्र या विषयाबद्दल एस्. एम्. ला आकर्षण होते आणि ‘कॉन्स्टिट्यूशन’ या विषयावर निबंध लिहून त्याने पारितोषिकही मिळविले होते. एकूणच कॉलेज जीवनात एस्. एम्.च्या बुद्धीस धार आली आणि मन अधिकाधिक ध्येय – सन्मुख होऊ लागले. शाळेमध्ये असताना वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये सर्व बाबतीत पुढाकार घेणारा एस्. एम्. कॉलेजमध्येही त्याच आत्मविश्वासाने वागत असे. एस्. एम्., गोरे, खाडिलकर, शिखरे, तारकुंडे आदी मित्रांचे एक सप्तर्षी मंडळ होते. हे स्थापन करण्यात एस्. एम्.चाच पुढाकार होता. नवीन पुस्तक वाचले अगर नवा विचार मांडणारा लेख सात जणांपैकी कोणाच्याही वाचण्यात आला की त्याने त्यावर सप्तर्षी मंडळात बोलायचे आणि नंतर त्यावर सर्वांनी चर्चा करायची, हा सप्तर्षी मंडळाचा मुख्य कार्यक्रम होता.

## तत्कालीन परिस्थिती

महाराष्ट्रातील तत्कालीन सामाजिक जीवनात ब्राह्मण – ब्राह्मणेतर असा तणाव होता. ब्राह्मण वस्तीतील सार्वजनिक हौद ब्राह्मणेतरांना १९२३ पर्यंत खुले नव्हते. म. फुले यांनी त्यांच्या घरातील हौद सर्व जातिधर्माच्या लोकांसाठी खुल्या केल्याला अनेक वर्षे लोटली होती, तरी सनातनी वृत्तीच्या पुणेकरांच्या वागण्यात बदल झालेला

नव्हता. म. फुले यांचे अनुयायी केशवराव जेधे हे पुण्याच्या नगरपालिकेचे सदस्य होते. त्यांनी १९२६ साली पुण्यातील सार्वजनिक हौद सर्वांना खुले करावेत, असा ठराव मांडला. त्याला नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकरांनी विरोध केला. इतकेच काय परंतु ब्राह्मणेतर सदस्यांनी हे सार्वजनिक हौद दलितांना खुले होऊ नयेत म्हणून केळकरांना पाठिंबा देऊन केशवराव जेधे यांचा ठराव नापास केला. महाराष्ट्रात जेव्हा ब्राह्मणेतर चळवळ जोरात होती तेव्हा ब्राह्मणेतर पुढारी राजकीय चळवळीपासून दूरच राहात असत. परंतु गांधीजींच्या नेतृत्त्वामुळे राजकीय चळवळ आणि सामाजिक सुधारणा एकत्र येण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाल्यावर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे समाजसुधारक विचारवंत नेते, स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊ लागले आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर समाजाने हीच भूमिका घ्यावी, अशीही शिकवण त्यांनी दिली. केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर या तरुण ब्राह्मणेतर नेत्यांनीही स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन बहुजन समाजास तोच मार्ग दाखविला. त्यामुळे १९२० पर्यंत सत्यशोधक चळवळीचे जे स्वरूप होते त्यात बदल झाला. एस्. एम्. शाळेत असताना पुण्यामध्ये गणपती उत्सवात मेळ्यांच्यामध्ये जो ब्राह्मण-ब्राह्मणेतर तणाव त्याने पाहिला होता तो १९२५ नंतर खूपच कमी झाल्याचे त्याने अनुभवले. एस्. एम्. च्या मनात आणखीही एक वैचारिक वादळ झाले. ते हिंदू-मुसलमान

प्रश्नाबाबत. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा त्याग आणि देशभक्ती यामुळे, त्यांच्या हिंदुत्ववादी विचारांचा महाराष्ट्रातील पांढरपेशा वर्गावर प्रभाव होता. लो. टिळकांच्या निधनानंतर आणि विशेषतः म. गांधींनी १९२४ मध्ये असहकाराची चळवळ मागे घेतल्यानंतर केसरीचे संपादक तात्यासाहेब केळकर तसेच त्यांच्या प्रभावळीतील अण्णासाहेब भोपटकर, ज. स. करंदीकर आदींनी म. गांधींच्या विरोधी आणि हिंदुत्ववादी भूमिका घेतली. या विचारांचा एस्. एम्. च्या मनावर काहीसा प्रभाव पडत होता. १९२६ साली अब्दुल रशीद याने स्वामी श्रद्धानंदांची जी हत्या केली त्यामुळे समाजातील वातावरण मुस्लिम विरोधी बनले.

## वैचारिक परिवर्तन

एस्. एम्. ने त्या वेळची त्याची मनःस्थिती पुढील शब्दात वर्णन केली आहे : “त्यावेळी माझ्या मनाची स्थिती तर अशी झाली होती की त्यामुळे पुढे स्थापन झालेल्या संघातच मी गेलो असतो. मुसलमानांबरोबर कसा काय व्यवहार करायचा, हा प्रश्न पडू लागला. मला चांगले स्मरते की मुसलमानांचे जे ताबूत निघत व त्यात सर्वजण जो भाग घेत तसा भाग आपण घ्यायचा नाही, असा माझ्या मनाशी मी निश्चय केला होता.” परंतु याच वेळी ज्या राजकीय घटना घडत गेल्या त्यामुळे देशापुढील राजकीय प्रश्नाचे स्वरूप काय आहे, हे समजून येऊन एस्. एम्. हिंदुत्ववादी

विचारांपासून दूर झाले आणि स्वातंत्र्य चळवळीच्या मुख्य प्रवाहाकडे ओढले गेले. ८ नोव्हेंबर १९२७ ला भारताला राजकीय हक्क कोणते द्यावे, हे ठरविण्यासाठी सायमन कमिशनची नेमणूक केल्याचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी जाहीर केले. कमिशनवर एकही भारतीय नसल्यामुळे काँग्रेसने ठराव करून कमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरविले. याच वर्षी मुंबईत यूथ लीगची स्थापना झाली आणि यूथ लीगतर्फे पहिली यूथ कॉन्फरन्स वीर नरिमन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झाली. ही कॉन्फरन्स घडवून आणण्यात मुंबईचे तरुण कार्यकर्ते युसुफ मेहेरअली आणि पुण्याचे श्री. आ. रा. भट यांनी पुढाकार घेतला. ते दोघेही कॉन्फरन्सचे कार्यवाह होते. यूथ लीगची स्थापना आणि सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा काँग्रेसचा निर्णय, या दोन्ही घटनांचा एस्. एम्. च्या मनावर परिणाम झाला. आपणही यूथ लीगमध्ये सामील व्हावे, असे त्यांना आणि त्यांचे सहकारी ना. ग. गोरे आणि र. के. खाडिलकर यांना वाटू लागले. मुंबईच्या कॉन्फरन्सनंतर मेहेरअली पुण्यात आले. त्या वेळी या तिघांची मेहेरअलींबरोबर सविस्तर चर्चा झाली. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी त्यांचे साम्राज्य कायम ठेवण्यासाठी भारतातील जनतेत सतत फूट पडली पाहिजे, असा राजकीय धोरणविषयक निर्णय घेतला आहे आणि 'फोडा आणि झोडा' (Divide and Rule) ही दुष्ट राजनीती अवलंबिली आहे, हे मेहेरअली यांनी विस्ताराने सांगितले.

विशेषतः हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये सतत तेढ राहावी, यासाठी ब्रिटिशांच्या ज्या कारवाया चालू होत्या तेही त्यांनी सांगितले. म्हणून स्वातंत्र्य चळवळीस गती येण्याकरिता ब्रिटिशांचा हा कुटील डाव हाणून पाडण्यासाठी हिंदू – मुसलमानांमध्ये आणि अन्य धर्मीयांच्या लोकांमध्येही ऐक्य घडवून आणणे जरूरीचे आहे, अशी भूमिका मेहेरअली यांनी मांडली. १८५७च्या उठावाच्यावेळी बहादुरशहा आणि नानासाहेब पेशवे यांच्या एकत्र नेतृत्वाखाली लोक लढले हेही मेहेरअली यांनी सांगितले. एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर यांना त्यांची भूमिका पटली. शिवाय हिंदुत्ववादी विचारांचे लोक स्वातंत्र्य चळवळीत भाग घेत नव्हते. या सर्व घटनांमुळे एस्. एम्., गोरे, खाडिलकर आणि चपलाबाई करंदीकर हे यूथ लीगचे सभासद झाले. हिंदुत्ववादी विचारांबद्दल काही काळ आकर्षण वाटणाऱ्या एस्. एम्.च्या जीवनाला यूथ लीगमध्ये काम करण्यास सुरुवात केल्यावर आमूलाग्र वेगळे वळण लागले. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आयुष्य समर्पण करावयाचे, असा निर्धार एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर यांनी केला. ज्या यूथ लीगचे हे तीन तरुण सदस्य होते त्या यूथ लीगच्या पुढील तीन प्रतिज्ञा होत्या.

१) भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळावे, म्हणून संघर्ष करणे.

२) जातीयवादाशी सर्व तऱ्हेने लढा देणे.

३) सर्व वस्तू केवळ स्वदेशीच वापरणे.

एस्. एम्.ची वैचारिक भूमिका स्पष्ट होत असताना आणि भावी काळात देशाच्या स्वातंत्र्यासाठी हवा तो त्याग करण्याचा त्याच्या मनाचा निश्चय होत असतानाच त्याची सेनापती बापट यांच्याशी भेट झाली. खादीचा साधा पोशाख केलेले तात्या बापट बोलू लागताच त्यांच्या शब्दांतून अंगार फुलत असे. डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असतानाच बापट यांनी देशभक्तीची प्रतिज्ञा केली. गणितात असामान्य यश मिळविणाऱ्या बापटांना मुंबई विद्यापीठाने शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडला पाठविले. बापट इंग्लंडला गेले. परंतु इंजिनिअरिंगचा अभ्यास करण्याऐवजी बाँब तयार करण्याची विद्या शिकले आणि त्याची इंग्रजीत पुस्तिका तयार करून भारतात परतले. काही काळ अज्ञातवासात काढून आणि काही वर्षे तुरुंगवास भोगून सुटका झाल्यावर पां. म. बापट पुण्यात केसरी कार्यालयात काम करू लागले. त्यांचे मन कृती करण्यासाठी उचंबळून येत असे. १९२१ मध्ये टाटा कंपनीने मुळशी धरण बांधण्याचे ठरविले आणि ब्रिटिश सरकारने मावळातील शेतकऱ्यांच्या जमिनी धरणासाठी टाटांना द्यावयाच्या आणि नुकसानभरपाई म्हणून शेतकऱ्यांना अल्प मोबदला देण्याचे ठरविले. बापटांचे मन या अन्यायाने पेटून उठले आणि त्यांनी मावळात खेड्याखेड्यातून दौरा करून साध्याभोळ्या शेतकऱ्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. बापटांच्या नेतृत्वाखाली, साधेभोळे शेतकरी ‘जान देऊ, पण जमीन

देणार नाही' अशी घोषणा करून सत्याग्रह करण्यास तयार झाले. शेतकरी त्यांच्या या नेत्याला 'सेनापती' मानू लागले आणि तेव्हापासून बापटांना महाराष्ट्र 'सेनापती बापट' म्हणून ओळखू लागला. मुळशी सत्याग्रह झाला त्या वेळी एस्. एम्. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी होता. मुळशी सत्याग्रहाच्या वार्तांनी पुणे शहर दुमदुमले. त्या वेळी बापट गरिबांसाठी लढत आहेत, इतकेच एस्. एम्. ला उमजले. पुढे तरुणपणी जेव्हा सेनापती बापटांशी त्याची गाठ पडली तेव्हा बापटांच्या धगधगीत देशभक्तीमुळे त्याला बापटांबद्दल मोठा आदर वाटला. बापटांनीही हा तेजस्वी तरुण स्वातंत्र्यासाठी कोणताही त्याग करील, हे अचूक ओळखले.

एस्. एम्.ने बी. ए. ला इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेतले होते. त्या वेळी आर्थिक क्षेत्रात एक घटना घडली, ती म्हणजे सरकारने जमिनीचे तुकडे जोडण्यासाठी एक तुकडे – जोड विधेयक आणले होते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा या तुकडे – जोडीस विरोध होता. त्या वेळचे बहुजन समाजाचे पुढारी केशवराव जेधे यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेऊन विधेयकाविरुद्ध ठराव केले. एस्. एम्. ने त्याचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक वा. गो. काळे यांच्याकडून हा प्रश्न समजून घेतला. त्या वेळी. वा. गो. काळे यांच्याकडून हा प्रश्न समजून घेतला. त्या वेळी वा. गो. काळे त्याला म्हणाले, 'जोशी, तुला राजकारणात इंटरेस्ट आहे. राजकारणात आर्थिक प्रश्नांना फार महत्व असते.

स्वातंत्र्याकरिता चळवळ करतानाच गरिबांवर अन्याय करणाऱ्या कायद्यांनाही विरोध करणे आवश्यक आहे, हे विसरू नकोस.' वा. गो. काळे हे नेमस्त होते. लिबरल पार्टीबद्दल त्यांना आपुलकी वाटे. परंतु आर्थिक प्रश्नांबाबत त्यांनी एस्. एम्.ला योग्य मार्गदर्शन केले. गरिबांच्या विरोधी कायद्यांना निदान सनदशीर विरोध झाला पाहिजे, असे प्रा. काळे यांचे मत होते. नेमस्त प्रवृत्तीचे असूनही प्रा. काळे यांनी गरिबांवरील अन्यायाचा स्पष्टपणे जो उल्लेख केला त्यामुळे एस्. एम्.च्या संवेदनशील मनाला त्या अन्यायाची तीव्रतेने जाणीव झाली.

एस्. एम्.च्या सर्वांत थोरल्या बंधूंनी – दादांनी कुटुंबाची जबाबदारी अंगावर घेऊन, कष्ट सोसून ती पार पाडली. एस्. एम्.पेक्षा मोठा असलेल्या बाळू या भावाला पुण्यात नोकरी लागली होती. परंतु दुर्दैवाने त्याला क्षय झाला आणि तो मरण पावला. आणखी दोघे भाऊही अकालीच गेले. दोघी बहिणींची लग्ने झाली होती. एस्. एम्.ची आई आणि एक बहीण दादांकडे राहायला गेली.

## ध्येयवादी निर्णय

१९२८ साली एस्. एम्. बी.ए.ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीलाच सर्वस्वी वाहून घ्यायचे ठरविले. त्यामुळे दादांना काही मदत करणे त्यांना

शक्य नव्हते. दादांची मदत न मागता सर्व वेळ सार्वजनिक काम करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

दहा वर्षांपूर्वी शिकण्यासाठी नागपूर, मुंबई अशी भ्रमंती करीत जो मुलगा पुण्यात आला तो फ्री स्टुडंटशिपच्या आधारे कष्ट करीत बी.ए. झाला. पण नोकरी, संसार ही चाकोरी या तरुणाने स्वीकारली नाही. मातृभूमीच्या पारतंत्र्यामुळे त्याचे मन नुसते व्यथित झाले नाही, तर या शृंखला तोडण्यासाठी प्राणपणाने लढण्याचा त्याने निर्धार केला. कुटुंबाचे मायेचे पाशही बाजूला सारले. शाळेत समवयस्क विद्यार्थ्यांमध्ये प्रमुख असणारा एस्. एम्. आता यूथ लीगचा तडफदार कार्यकर्ता म्हणून तळपू लागला. १९२८च्या फेब्रुवारी महिन्यात एस्.एम्.ने सायमन कमिशनच्या विरोधात पहिले जहाल भाषण शिवाजी मंदिरात केले. १९२८च्या नोव्हेंबर महिन्यात एस्.एम्., गोरे आणि खाडिलकर या यूथ लीगमधील तरुण कार्यकर्त्यांनी पुण्याला यूथ कॉन्फरन्स बोलाविली. त्यांनी या युवक परिषदेचे अध्यक्ष म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंना बोलाविले. पं. नेहरूंच्या भाषणाचा एस्. एम्.च्या मनावर मोठा परिणाम झाला. नेहरूंचे व आपले विचार जुळणारे आहेत, हेही त्याला जाणवले. एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथनात पं. नेहरूंची पुढील वाक्ये उद्धृत केली आहेत.

“Youth is the Standard bearer of revolt. It is his privilege. Every society alternates between

stabilisation and revolution; and we are in for a revolutionary stage."

१९२८ साली काँग्रेसने नेमलेल्या एका समितीने वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय असावे, असा अहवाल दिला होता. पं. नेहरूंनी याला विरोध करून संपूर्ण स्वातंत्र्य हेच ध्येय असावे, अशी दुरुस्ती सुचविली होती. एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर हे यूथ लीगचे तीन तरुण नेते त्याच मताचे होते. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी संघर्ष करण्याचा निर्धार त्यांनी केला होता. एस्. एम्.ने दहा वर्षे शिक्षणासाठी खडतर वाटचाल केली होती. १९२८ च्या अखेरीस त्याच्या जीवनातील खडतर वाटचालीचे दुसरे पर्व सुरू झाले.

## पर्वती सत्याग्रह

कॉलेजमध्ये सप्तर्षी मंडळात एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर हे राजकीय विषयांप्रमाणे सामाजिक प्रश्नांवरही चर्चा करीत. त्या वेळी या तरुण विद्यार्थ्यांनी ज्याप्रमाणे लो. टिळकांचे केसरीतील अग्रलेख वाचले होते, त्याप्रमाणेच आगरकरांचे लेखही त्यांनी वाचले आणि हिंदू धर्मातील जातींची उतरंड ही अनिष्ट आहे, हे त्यांना मनोमन पटले. त्याचप्रमाणे स्त्रियांवरील अन्याय दूर झाले पाहिजेत. पुनर्विवाहांना समाजाने मान्यता दिली पाहिजे, हा आगरकरांचा विचारही त्यांना पटला. विचारांचे हे बीजारोपण वाचनातून झाले असतानाच डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला. एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर यांची या सत्याग्रहानंतर चर्चा झाली. त्यामध्ये हा अन्याय दूर झाला पाहिजे आणि सार्वजनिक पाणवठ्यावर तरी अस्पृश्यता पाळली जाऊ नये, यावर या तीन तरुण विद्यार्थ्यांचे एकमत झाले. पुण्यामध्ये सनातनी मंडळींनी या सत्याग्रहाची जी निंदानालस्ती केली आणि 'भाला' या वृत्तपत्राचे संपादक भोपटकर यांनी जे गलिच्छ आणि विकृत लेखन या संदर्भात केले, त्याचा या तीन तरुणांना तीव्र संताप आला. चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि नाशिकला डॉ. आंबेडकरांनीच काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश मिळावा म्हणून केलेला सत्याग्रह यांमुळे यूथ लीगचे हे तिघे तरुण कार्यकर्ते प्रभावित झाले.

१९२९ च्या ऑक्टोबर महिन्यात ब्राह्मणेतर चळवळीचे नेते केशवराव जेधे, डॉ. आंबेडकर यांचे पुण्यातील अनुयायी पां. ना. राजभोज आणि यूथ लीग यांनी पुण्याला पर्वती मंदिरात दलित बांधवांसह प्रवेश करण्याचे ठरविले. त्याच वेळी म. गांधीच्या सत्याग्रह आंदोलनाची पूर्वतयारी सुरू होती आणि आचार्य जावडेकर हे कार्यकर्त्यांची बौद्धिके घेत असत. एस्. एम्. आणि त्यांच्या यूथ लीगमधील सहकाऱ्यांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या बांधवांसह सत्याग्रह करण्याचा त्यांचा विचार आचार्य जावडेकरांना सांगितला. त्या वेळी आचार्यांनी त्याला पाठिंबा दिला. १३ ऑक्टोबर रोजी

पंचवीस-तीस सत्याग्रहींनी पर्वतीच्या पायऱ्या चढण्यास सुरुवात करताच सनातन्यांनी त्यांना अडवले, धक्काबुक्की केली आणि जवळच्या निवडुंगाच्या काटेरी फडात ढकलून दिले. पोलिस सनातन्यांची ही गुंडगिरी शांतपणे पाहत होते. पर्वती सत्याग्रह पुण्यात खूप गाजला. एस्. एम्. आणि खाडिलकर खानावळीत जेथे जेवायला जात तेथेही जेवायला येणारी सनातनी ब्राह्मण मंडळी त्यांना उद्देशून अभद्र बोलत असत. पर्वती सत्याग्रहानंतर अकरा दिवसांनी पुण्यामध्ये सनातनी मंडळींनी एक जाहीर सभा घेतली. त्या सभेत भालाकार भोपटकर यांनी अस्पृश्यांनी खुशाल मुसलमान व्हावे म्हणजे हिंदूधर्म अधिक पवित्र होईल, असे आत्मघातकी उद्गार काढले. भालाकार भाषण करता करता म्हणाले, ‘आम्ही घरातदेखील अस्पृश्यता पाळतो. बाईला पाळीच्या वेळी तीन दिवस शिवत नाही.’ हे निर्लज्ज उद्गार ऐकून सभेत हशा पिकला. एस्. एम्. मुद्दाम सभेस गेले होते. हशा थांबताच ते संतापून उभे राहिले आणि म्हणाले, ‘तीन दिवस बाईला दूर ठेवतो हे सांगितलंत पण चौथ्या दिवशी जवळ घेता, हे नाही सांगितलंत?’ त्यावर सभेत एकदम कोलाहल झाला आणि लोक एस्. एम.ना मारायला धावले. तेव्हा एस्. एम्.चे एक तालीमबाज मित्र सदूभाऊ गोडबोले यांनी एस्. एम्. ना उचलून प्रक्षुब्ध जमावातून बाहेर काढले. एस्. एम.ना त्या दिवशी भयानक मारहाण झाली असती ती टळली.

या वेळी राजकीय घटनाही फार वेगाने घडत होत्या. १९२७ साली सरकारने देशभरात ट्रेड युनियन चळवळीत काम करणाऱ्या डांगे, मिरजकर, जोगळेकर, मुजफ्फर अहमद आदींची धरपकड केली आणि त्यांच्यावर मीरत कटाचा खटला भरला. पं. मोतीलाल नेहरूंनी या तरुण कार्यकर्त्यांचे वकीलपत्र घेतले. मीरत कटाचा खटला खूप गाजला. त्या वेळी बी.ए.च्या वर्गात असणाऱ्या एस्.एम्. आणि सप्तर्षी मंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांना या कटातील आरोपींबद्दल आदर आणि आकर्षण वाटले होते.

## क्रांतिकारकांबद्दल आकर्षण

एस्. एम्. ची यूथ लीगमधील कामाची सुरुवात सायमन कमिशन विरोधी निदर्शनाने झाली. ही निदर्शने देशभर झाली. लाहोरला सायमनच्या विरोधात निघालेल्या मिरवणुकीचे नेतृत्त्व थोर आणि ज्येष्ठ देशभक्त लाला लजपतराय हे करीत होते. त्या वेळी सॉंडर्स या पोलिस अधिकाऱ्याने लालाजींच्या छातीवर दंडुक्याचा प्रहार केला. लालाजी खाली पडले. नंतर ते सभेत थोडा वेळ बोलले. परंतु त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले आणि तेथेच काही दिवसांनी त्यांचे निधन झाले. सर्व देशभर या घटनेने संतापाची लाट उसळली. यूथ लीगचे तरुण कार्यकर्ते प्रक्षुब्ध झाले. पुढे काही दिवसांनी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, चंद्रशेखर आझाद या क्रांतिकारक तरुणांनी सॉंडर्सला

गोळ्या घालून ठार मारले आणि लालाजींवरील हल्ल्याचा बदला घेतला. एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे, “पुण्यास ही बातमी येताच आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले.”

काही दिवसांनी सरकारने ट्रेड डिस्पूट बिल आणि पब्लिक सेफ्टी बिल सेंट्रल असेंब्लीत मांडण्याचे ठरविले. नागरी स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या या बिलांना सर्व देशभक्तांचा विरोध होता. पब्लिक सेफ्टी बिल ज्या दिवशी असेंब्लित मांडले जाणार होते त्या दिवशीच भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी असेंब्लीत बॉंब टाकला. त्याचा धूर सगळीकडे पसरत असताना भगतसिंग आणि दत्त या दोघांनी ‘इन्किलाब झिंदाबाद’ या आणि सरकारच्या निषेधाच्याही घोषणा दिल्या आणि हे दोघेही निर्भयपणे उभे राहिले. त्या दोन क्रांतिकारी तरुणांना अटक झाली. भगतसिंग आणि चंद्रशेखर आझाद यांच्या नेतृत्वाखाली सशस्त्र क्रांतीची तयारी करणाऱ्या अनेक क्रांतिकारी तरुणांनाही पकडण्यात आले आणि त्यांच्याविरुद्ध लाहोर कटाचा खटला सुरू झाला. या खटल्यातील आरोपींचा अमानुष छळ करण्यात आला. त्यांना भीषण मारहाण करण्यात आली. याविरुद्ध या क्रांतिकारी राजबंद्यांनी उपोषण सुरू केले. जतीन्द्रनाथ दास यांनी सर्वांत अधिक काल उपोषण केले. ६४व्या दिवशी १३ सप्टेंबर १९२९ला जतीन्द्रनाथ दास यांचे निधन झाले. ते हुतात्मा झाले. पुण्यात एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर या

यूथ लीगच्या कार्यकर्त्यांनी ‘सर्व युवकांनी उपोषण करावे’ असे आवाहन केले. त्यांनी मिरवणूक काढली आणि जतीन्द्रनाथ दास यांना वंदन करण्याकरिता सभाही घेतली. आता या तीन तरुण कार्यकर्त्यांची नावे पोलिसांच्या ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आली. कारण सरकार या यूथ लीगच्या तरुण नेत्यांना ‘धोकादायक’ (डेंजरस) मानत होते. अर्थात् देशभक्तीने पेटलेल्या या तरुणांना त्याची फिकीर वाटत नव्हती.

१९२९ च्या लाहोर काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू हे होते. पं. नेहरूंनी अध्यक्षीय भाषणात, संपूर्ण स्वतंत्र्य हे भारताचे ध्येय आहे, असे स्पष्टपणे सांगितले आणि अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव एकमताने मंजूर झाला. पं. नेहरूंच्या आदेशानुसार २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन म्हणून देशभर कार्यकर्त्यांनी साजरा केला. पुण्यामध्ये एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर या तरुणांच्या पुढाकाराने २६ जानेवारीस झेंडावंदन, मिरवणूक, सभा आदी कार्यक्रम करण्यात आले.

यानंतर म. गांधींनी स्वातंत्र्य लढ्यासाठी देशाला हाक दिली आणि नंतर मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी साबरमती आश्रमापासून दांडीपर्यंत पदयात्रा काढली.

•

# प्रकरण २

## स्वातंत्र्य संग्रामातील समर्पण

१९३० साली म. गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे रणशिंग फुंकले आणि सर्व देशभर चैतन्याची लाट पसरली. 'सत्याग्रह करून निर्भयपणे लाठीमार, गोळीबार सहन करा आणि ब्रिटिश सरकारच्या मिठाच्या कायद्याचा भंग करून तुरुंगातही जा', हा गांधीचींचा संदेश असंख्य भारतीयांच्या अंतःकरणाला जाऊन भिडला. गांधीजींनी ज्या वेळी मिठावरील कराविरुद्ध सत्याग्रह करण्याचे जाहीर केले त्या वेळी देशातील अनेक विचारवंत, पत्रकार इतकेच नव्हे तर काँग्रेसमधील काही नेत्यांनाही त्याचा अर्थ नीटसा समजला नाही. परंतु मीठ हे लोकांच्या जीवनाला आवश्यक आहे आणि त्यावरील कराला आव्हान देताना गांधींजी हे ब्रिटिश साम्राज्याच्या सत्तेलाच आव्हान देत होते, हे जनसामान्यांना मात्र तत्काळ उमगले. म. गांधींच्या दांडीयात्रेकडे सर्व जगाचे लक्ष वेधले आणि हा अभिनव कायदेभंग पाहण्यासाठी जगातील पत्रकार भारतात आले. एस्. एम., गोरे आणि खाडिलकर या यूथ लीगच्या तीन तरुण नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेण्याचा तत्काळ निर्णय घेतला. एस्. एम्. यांनी त्यांच्या त्या वेळच्या मनःस्थितीचे वर्णन पुढील शब्दांमध्ये केले आहे. "राजकीय कृती करायला आमचे हात

स्फुरण पावले होते. गांधीजींनी सत्याग्रह आंदोलन सुरू केले आणि बेभान अंतःकरणाने आम्ही त्यात स्वतःला झोकून दिले.”

## पहिला कारावास

महाराष्ट्रात शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली चळवळ सुरू झाली. विलेपार्ले येथे सत्याग्रही आश्रम सुरू करण्यात आला. एस्. एम्., गोरे, खाडिलकर आणि सतरा तरुण या आश्रमातील सत्याग्रह शिबिरात दाखल झाले. शिबिरानंतर कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी पाठविण्यात आले. एस्. एम्. प्रथम रत्नागिरी जिल्ह्यात शिरोडा येथे गेले. नंतर त्यांना अलिबागला पाठविण्यात आले. १० मे १९३०ला जाहीर सभेत एस्. एम्. जोशी आणि वामन परांजपे या तरुण कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्याची मागणी करणारी ज्वलज्जहाल भाषणे केली. त्यांना त्या रात्री पकडण्यात आले. दुसऱ्या दिवशी त्यांच्यावरील खटला चालला. सत्याग्रही असल्यामुळे वकील देणे वा खटला लढविणे, हा प्रश्नच नव्हता. एस्. एम्.ने जबानीत आपली स्वातंत्र्यवादी भूमिका तेजस्वीपणे मांडली. एस्.एम्. आणि मेहेंदळे यांना सहा महिन्यांची शिक्षा  झाली आणि ठाणा जेलमध्ये त्यांना पाठविण्यात आले. ना. ग. गोरे आणि र. के. खाडिलकर यांनी पुण्यात सत्याग्रह केल्यावर त्यांना अटक करून सहा

महिन्यांची शिक्षा देण्यात आली. त्यांना 'क' वर्ग देण्यात आला आणि वॉर्डरने त्यांना खूप छळले. मारपीटही केली.

ठाणा जेलमध्ये असताना एस्. एम्. यांच्यासमवेत आचार्य भागवत, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ आदी नेते होते. तेथे वाचावयास पुस्तके मिळत. रात्री बराक बंद झाल्यावर वाचन करता येई. एस्. एम्. जेलमध्ये अन्य राजबंद्यांचे केस कापण्याचे काम हौसेने करीत. शिक्षा भोगून हे तीन तरुण कार्यकर्ते आपला पहिला कारावास संपवून सहा महिन्यांनी सुटून आले. तुरुंगात त्यांच्या देशभक्तिपर विचारांना अधिक सुस्पष्टता आणि धार आली.

१९३१ साली एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर या तिघांनी एम.ए. च्या वर्गात फर्ग्युसन कॉलेजमध्ये नावे घातली. कॉलेज सुरू झाल्यावर काही दिवसांनी त्या वेळचे मुंबई राज्याचे गव्हर्नर हॉटसन यांनी फर्ग्युसन कॉलेजला भेट दिली. त्या वेळी लायब्ररीत ते जात असताना वासुदेव बळवंत गोगटे या विद्यार्थ्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. हॉटसन यांनी चिलखत घातले असल्यामुळे ते जखमीही झाले नाहीत. परंतु गोगटे यांना अटक झाली. या घटनेनंतर पुण्यात प्रचंड खळबळ उडाली. एस्. एम्., गोरे व खाडिलकर यांचा या घटनेशी काही संबंध नव्हता. तरीदेखील प्राचार्य महाजनींनी त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. एस्. एम्. हे त्या वेळी फ्री प्रेसचे वार्ताहर म्हणून काम करीत होते आणि त्यांनी हॉटसनवर गोगटे यांनी

गोळ्या झाडल्याची बातमी साद्यंत फ्री प्रेसमध्ये दिली. तीच देशभर छापली गेली.

पुढे गांधीजी राऊंड टेबल कॉन्फरन्ससाठी इंग्लंडला गेले. त्यांनी भारताची बाजू ठामपणे मांडली. परंतु कॉन्फरन्स अयशस्वी झाली. भारताला काहीच मिळाले नाही. भारतात चळवळ पुन्हा सुरू झाली. संयुक्त प्रांतामध्ये नेहरूंनी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू केले. आचार्य नरेन्द्र देव आणि पुरुषोत्तमदास टंडन हे दोघे नेतेही या आंदोलनात सामील झाले.

**सक्तमजुरीत मस्त**

देशातील वातावरण तापत होते. चळवळीला अनुकूल होत होते. त्या वेळी एस्. एम्. गोरे आणि खाडिलकर या यूथ लीगच्या कार्यकर्त्यांनी पुण्यामध्ये युवक परिषद घेण्याचा निर्णय घेतला आणि तरुणांचे आवडते नेते बाबू सुभाषचंद्र बोस यांना अध्यक्ष म्हणून बोलाविले. १९३१ च्या डिसेंबर मधील पुण्यातील ही युवक परिषद देशभर गाजली. त्यानंतर काही दिवसांनीच पं.जवाहरलाल नेहरूंना अटक झाली. त्यांच्यानंतर सुभाषबाबूंना ५ जानेवारीस पकडण्यात आले. व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डंन याने स्वातंत्र्य चळवळ चिरडून काढण्याचा निर्णय घेतला आणि अनेक जुलमी वटहुकूम लागू केले. एस्. एम्., गोरे आणि खाडिलकर यांना प्रथम दोन महिने स्थानबद्ध केले. या तिघांनीही स्थाननबद्धतेचे

निर्बंध मोडून अटक करून घेण्याच्या निर्णय घेतला. २३ मार्चला भगतसिंगांची पहिली पुण्यतिथी होती. त्या दिवशी एस्. एम्., गोरे यांनी स्थानबद्धतेचा भंग करून ते कॅन्टोन्मेंट हद्दीतून बाहेर आले. या वेळी त्यांना पकडण्यात आले. दुसऱ्या दिवशी मॅजिस्ट्रेटपुढे त्यांना उभे करण्यात आले. एस्. एम्. यांनी आपले प्रखर विचार मांडणारे निवेदन वाचले. मॅजिस्ट्रेटने त्यांना दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा दिली. तेव्हा एस्. एम्. यांनी तुरुंगात 'क' वर्ग ('सी' क्लास) मिळावा, अशी विनंती केली. सर्व सामान्य सत्याग्रहींबरोबर राहता यावे म्हणून त्यांनी निकृष्ट दर्जाच्या 'क' वर्गीय शिक्षेची मागणी केली. पोलिस प्रॉसिक्युटर त्यांना म्हणाला, 'तरुण माणसा, तू सहृदय आहेस. पण तुला डोके नाही.' एस्. एम्. ना येरवडा तुरुंगात नेण्यात आले. आत्मकथेत या कारावासाचे वर्णन करणाऱ्या प्रकरणाला एस्. एम्. यांनी शीर्षक दिले आहे, "सक्त मजुरीत मस्त." जेलमधील अन्न निकृष्ट होते. सर्व तऱ्हेचे हाल होते. पण एस्. एम्. मस्तीत होते. रात्री बराक बंद झाल्यावर समाजवादावरील मार्क्सचे विचार वाचीत होते. तीस सालातील पहिल्या तुरूंगवासाप्रमाणेच इतर राजबंद्यांचे केस कापत होते. ध्येयधुंद अवस्थेत हालअपेष्टांचे काहीच वाटत नव्हते. पुढे सुटल्यावर एस्. एम्. यांनी 'किर्लोस्कर' मासिकात "तुरूंगातील दिवाळी" म्हणून एक सुंदर लेख लिहिला होता.

त्या वेळी म. गांधीही येरवडा तुरूंगात होते. मात्र ते दुसऱ्या वॉर्डमध्ये होते. एस्. एम्.ना आचार्य भागवतांबरोबर गांधीजींना भेटण्याची एकदा संधी मिळाली. त्या वेळी त्यांनी गांधीजींना हिंसा – अहिंसेबद्दल काही प्रश्न विचारले. पुढे गांधीजींनी दलितांना विभक्त मतदार संघ देण्याच्या विरोधात प्राणांतिक उपोषण सुरू केले. या उपोषणानंतर 'गांधी – आंबेडकर' करार होऊन विभक्त मतदार संघ रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला.

गांधीजींचे उपोषण चालू असताना, त्या उपोषणमागच्या भूमिकेस पाठिंबा म्हणून आचार्य भागवत, एस्. एम्. आदी राजबंद्यांनी तुरुंगात भंगीकाम मागून घेतले. या एकूण अनुभवाबद्दल एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे.

"अशा प्रकारे तुरुंगवासात मी न्हावी झालो, भंगीही झालो. म्हणूनच मी नेहमी म्हणतो की तुरुंगात गेल्यावर मी पूर्ण नागरिक झालो. पूर्ण या अर्थाने की देशातील काही माणसांना त्यांच्या कामावरून लेखण्यात येते ते बरोबर नाही, हे तुरुंगवासाने माझ्या मनावर बिंबवले.

मुसलमानांसंबंधीदेखील आपला दृष्टिकोन बरोबर नाही. तुरुंगात उर्दू शिकल्याकारणाने मुसलमान माझ्याकडे शंभरदा येत. म्हणूनच मी म्हणतो की तुरुंग हे असे विद्यापीठ आहे, की ज्याच्यामुळे मी भारताचा 'पूर्ण' नागरिक झालो."

## समाजवादी विचारांचे आकर्षण

येरवडा तुरुंगात असताना एस्. एम्. यांनी मानवेन्द्र नाथ रॉय यांचे 'Tasks before us' हे पुस्तक वाचले. रॉय यांनी रशियन राज्यक्रांतीत लेनिनचे सहकारी म्हणून कार्य केले होते. पुढे कम्युनिस्टांबरोबर वैचारिक मतभेद झाल्यावर ते भारतात आले आणि डॉ. महंमद या नावाने वावरू लागले. कराची काँग्रेसला ते पं. नेहरू आणि सुभाषबाबू यांचे सहकारी म्हणून डॉ. महंमद म्हणूनच हजर होते. पुढे त्यांना अटक झाली आणि १२ वर्षांची शिक्षा झाली. एम. एन. रॉय यांच्या व्यक्तिमत्वाभोवती तेजोवलय होते. त्यांचे लेखनही अत्यंत प्रभावी असे. एस्. एम्. यांनी रॉय यांचे विचार वाचल्यावर त्यांची समाजवादी भूमिका अधिक दृढ झाली. रॉय यांच्याबद्दल आकर्षण वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या भारताच्या स्वातंत्र्य चळवळीबाबतच्या भूमिकेला रॉय यांनी खंबीर विरोध केला होता. कम्युनिस्टांची अशी भूमिका होती की म. गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची चळवळ, ही एक भांडवलशाही चळवळ आहे आणि त्या चळवळीपासून कम्युनिस्ट आणि सोशलिस्टांनी दूर राहिले पाहिजे. या भूमिकेवरून १९३० च्या स्वातंत्र्य आंदोलनास डांगे, रणदिवे आदी कम्युनिस्ट नेत्यांनी विरोध केला होता. रॉय यांना हे मान्य नव्हते. त्यांच्या मते साम्राज्यवाद्यांच्या जोखडाखाली पारतंत्र्यात असणाऱ्या देशामध्ये राष्ट्रवाद हा पुरोगामी विचार असून या

विचाराच्या आधारे होणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांनी सहभागी झालेच पाहिजे. रॉय यांच्या ‘ब्लू बुक’ची एक प्रत येरवडा तुरूंगात एस्. एम्. यांना मिळाली, त्यांनी ती अभ्यासिली आणि त्यांना त्यातील भूमिका पुरेपुर पटली. एस्. एम्. यांच्याप्रमाणेच त्यांच्याबरोबर तुरूंगात असलेले यशवंतराव चव्हाण, द्वा. भ. कर्णिक, ह. रा. महाजनी आदींनाही रॉय यांचे विचार पटले. एस्. एम., यशवंतराव, आचार्य भागवत आदींना येरवडा तुरूंगातून विसापूर तुरूंगात पाठविण्यात आले. शिक्षेची मुदत संपल्यावर नोव्हेंबर १९३३ मध्ये एस्. एम्. सुटून आले.

एस्. एम्. येरवडा तुरूंगात होते त्या वेळी त्यांचे सहकारी ना. ग. गोरे नाशिकच्या तुरुंगात होते. १९३० च्या तुरुंगवासानंतर गोरे यांनीही मार्क्सच्या ग्रंथाचे वाचन सुरू केले होते आणि समाजवादी विचारसरणीबद्दल त्यांनाही आकर्षण वाटू लागले होते. नाशिकच्या तुरुंगात त्यांच्या समवेतच जयप्रकाश नारायण, युसुफ मेहेरअल्ली, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता आदी मंडळी होती. जयप्रकाश नारायण हे अमेरिकेत शिकण्यासाठी गेले होते. तेव्हा तेथेच मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. अच्युतराव पटवर्धन हे बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांना थिऑसफीबद्दल आकर्षण वाटे. परंतु स्वातंत्र्य चळवळीत पडल्यावर त्यांनाही मार्क्सचे विचार पटू लागले. या सर्व मित्रांनी तुरुंगात असे

ठरविले की सुटून बाहेर गेल्यावर काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करावयाची. तुरुंगातून सुटल्यावर बिहार मध्ये पाटणा येथे पहिली समाजवादी परिषद भरली. एस्. एम्., गोरे, मेहेरअल्ली, अच्युतराव, मिनू मसानी, अशोक मेहता आदी मित्र त्या परिषदेला गेले होते. काशी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे स्फूर्तिस्थान असणारे इतिहासाचे गाढे अभ्यासक, आचार्य नरेन्द्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया आणि कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी या परिषदेत पुढाकार घेतला. मार्क्सच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या या सर्वांना स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी आशय आलाच पाहिजे असे उत्कटतेने वाटत होते. गांधीजींच्या केवळ रचनात्मक कामामुळे या देशात पुरेशी शक्ती निर्माण होणार नाही. ती निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांच्या कामगारांच्या संघर्षशील संघटना बांधल्या पाहिजेत, असा समाजवादी विचारांच्या या सर्व कार्यकर्त्यांचा आग्रह होता. मात्र कोणत्याही परिस्थितीत स्वातंत्र्य चळवळीच्या मुख्य प्रवाहापासून दूर जायचे नाही, कम्युनिस्टांनी केलेली चूक करायची नाही, याबद्दलही या सर्वांचे एकमत होते. २१ ऑक्टोबर १९३४ला मुंबईत काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. जयप्रकाश नारायण हे जनरल सेक्रेटरी आणि नानासाहेब गोरे हे जॉईंट सेक्रेटरी झाले. एस्. एम्. कार्यकारीणीचे सदस्य होते.

एम. एन. रॉय हे तुरूंगात होते आणि त्यांची प्रकृती बिघडली. त्यांच्या सुटकेची मागणी करण्यासाठी दुसऱ्या

दिवशी चौपाटीवर सभा होती. कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीतर्फे एस्. एम्. ना सभेत बोलण्यासाठी पाठविण्यात आले. जेलमध्ये उर्दूचा अभ्यास उत्तम असल्यामुळे एस. एम यांनी हिंदीत भाषण केले. भाषणात ते म्हणाले, "जब फ्रेंच रेव्होल्युशन हुआ तब बॅस्टिल जेल तोडके लोगो ने अपने साथियोंको रिहाई किया था। जब हमारी जीत होगी तब कॉ. रॉय रिहा होंगे।" त्या भाषणाला खूप टाळ्या पडल्या. एस्. एम्. पुण्याला गेल्यावर आठ दिवसांनीच त्यांना अटक करण्यात आली. चौपाटीवरील भाषणाबद्दल त्यांना ४ डिसेंबरला दोन वर्षांची शिक्षा देण्यात आली.

यापूर्वी १९३३ साली सुटका झाल्यानंतर एस्. एम्. ने सेकंड एल.एल.बी. ची परीक्षा दिली. जामिनावर मुक्त असताना त्यांनी वकिलीची सनद काढली परंतु वकिली सुरू करण्यापूर्वीच चौपाटीवरील भाषणाबद्दल शिक्षा झाली आणि एस्. एम्.ना जानेवारी १९३५ मध्ये साबरमती तुरुंगात पाठविण्यात आले. एस्.एम्.ना 'क' वर्ग देण्यात आला होता. ही दोन वर्षे फार कष्टाची गेली. दोन कडक उन्हाळे त्यांनी तेथे काढले. या उन्हाळ्यामुळे त्यांचे वजन १०३ पौंडावर आले. असे हाल होत असतानाही एस्. एम्. गुजराती शिकले. भाषा आत्मसात झाल्यावर अनेक गुजराती कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. मार्क्सचे 'कॅपिटल' मिळविले होते. तेही वाचले. एस्. एम्. यूथ लीगचे काम करीत असताना १९३२ साली तारा पेंडसे ही विद्यार्थीनी त्यांना

भेटायला आली. तिने एस्. एम्. कडे समाजवादावरील पुस्तके मागितली. त्यातून दोघांची ओळख झाली आणि मैत्री जमली. एस्. एम्. साबरमतीच्या तुरूंगात होते त्यावेळी तारा पेंडसे पुण्याला कर्वे विद्यापीठात शिकत होती. तिची नियमाने एस्. एम्.ना पत्रे येत. दोघांची मने जुळली होती. साबरमती जेलमध्ये असह्य उन्हाळा होता. जेवायला मिळणारे अन्न निकृष्ट आणि बेचव होते. प्रकृती बिघडत होती. परंतु तारा पेंडसेच्या पत्रातून व्यक्त होणाऱ्या प्रेमामुळे हेही सुसह्य होत होते.

१ ऑगस्ट १९३६ ला एस्. एम्.ची साबरमती तुरुंगातून सुटका झाली. सुटकेच्या वेळी एस्. एम्.चे मित्र आणि काँग्रेस सोशलिस्ट पार्टीतील सहकारी प्रा. दातवाला एस्. एम्. ना घरी घेऊन गेले. त्या दिवशी लो. टिळकांची पुण्यतिथी होती. एका हॉलमध्ये सभा होती. एस्. एम्.ना बोलण्यास सांगण्यात आले. त्यांनी हिंदीतूनच भाषण केले.

भाषणाच्या शेवटी एस्. एम्. म्हणाले, ‘लोकमान्य टिळक म्हणाले होते, ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे तो मी मिळवीनच.’ हा त्यांचा निर्धार आपण सर्वांनी लक्षात ठेवला पाहिजे.’ एस्. एम्. गुजरात मेलने मुंबईस आले. तेथे मित्रांनी त्यांचे हार्दिक स्वागत केले. पुण्याला आल्यावर एस्. एम्. यांनी शनिवार पेठेत दहा रुपये भाड्याने खोली कशीबशी मिळवली.

एस्. एम्. तुरुंगात असताना पक्षाच्या ध्येय धोरणात बदल करण्यात आला. जयप्रकाश नारायण यांना डाव्या पक्षांची एकजूट करणे आवश्यक वाटत होते. त्या त्यांच्या आग्रहामुळे मीरत येथे झालेल्या पक्षाच्या परिषदेत सोशलिस्ट पक्ष हा मार्क्सिस्ट सोशलिस्ट पक्ष आहे, असे ठरविण्यात आले. जयप्रकाश नारायण यांनी याचवेळी 'Why Socialism?' हे पुस्तक लिहिले व प्रसिद्ध केले. त्या पुस्तकात त्यांनी मार्क्सवादी भूमिका स्पष्टपणे मांडली होती. ना. ग. गोरे यांनी या पुस्तकाचे मराठीत 'समाजवादच का?' असे भाषांतर केले. त्या वेळी सोशलिस्ट कार्यकर्ते या पुस्तकाला आपला वैचारिक प्रबंध मानीत.

## फैजपूर काँग्रेस

१९३६ साली महाराष्ट्रात फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. ग्रामीण भागात भरणारे काँग्रेसचे ते पहिलेच अधिवेशन होते. पं. जवाहरलाल नेहरू हे नियोजित अध्यक्ष होते. अधिवेशनाची व्यवस्था करण्यासाठी काँग्रेस सेवा दलाची संघटना उभी करण्यात आली. रावसाहेब पटवर्धन हे या सेवादलाचे प्रमुख होते. रावसाहेबांच्या आग्रहामुळे एस्. एम्. हे फैजपूर काँग्रेसच्या प्रचार समितीचे चिटणीस झाले. खानदेशातील निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते धनाजी नाना चौधरी, लोडुभाऊ फेगडे यांच्याबरोबर एस्. एम्. खानदेशात पायीही अनेक गावांतून गेले. दीड

महिन्याच्या या पदयात्रेत एस्. एम्.ना खानदेशातील ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन झाले. गावागावात शेतकरी समाजातले लेवापाटीदार आणि मराठा गुण्यागोविंदाने राहात. खानदेशाच्या या दौऱ्यानंतर एस्. एम्.च्या लक्षात आले की भारताची स्वातंत्र्य चळवळ प्रभावी व्हायची असेल तर शेतकऱ्यांना चळवळीत आणले पाहिजे. एस्. एम्.ना मुंबईचा कामगार वर्ग परिचित होता. त्यांना यावेळी वाटले की कामगार क्रांतिकारक असला तरी भारतात क्रांती घडवून आणायची असेल तर ग्रामीण भागातील जनतेचा, शेतकरी वर्गाचाच त्या क्रांतीला पाठिंबा असला पाहिजे. एस्. एम्.नी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे :

"माझ्या विचारांना जो एकांगीपणा आला असता तो फैजपूरमुळे टळला, नाहीतर आम्ही केवळ कामगार संघटित करण्यावरच भर देत राहिलो असतो." फैजपूर काँग्रेसच्या अधिवेशनापूर्वी प्रचारासाठी हिंडताना एस्. एम्. यांचा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्त्यांशी संबंध आला आणि त्या कार्यकर्त्यांनाही एस्. एम्.चा मनमोकळा स्वभाव, साधे राहणे आणि भाषणांतून प्रगट होणारे त्यांचे देशप्रेम, यामुळे ते हवेहवेसे वाटू लागले.

२० नोव्हेंबर १९३६ ला रॉय यांची सुटका झाली. ते फैजपूर काँग्रेसला हजर राहिले. घटना परिषदेसंबंधीच्या ठरावावर त्यांचे भाषण फार माहितीपूर्ण आणि मुद्देसूद झाले. पं. जवाहरलाल नेहरूंचे अध्यक्षीय भाषण फारच स्फूर्तिदायी

झाले. त्यांनी भाषणात आपण समाजवादी आहोत हे स्पष्टपणे आणि आग्रहपूर्वक सांगितले.

फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणामध्ये पं. नेहरूंनी १९३५ च्या सुधारणा कायद्याबद्दल नाराजी आणि निराशा व्यक्त केली. मात्र निवडणुकीवर बहिष्कार न टाकता लोकजागृतीची एक संधी म्हणून निवडणुकीचा वापर करावयाचा असा निर्णय काँग्रेसने एकमताने घेतला. पं. नेहरूंनी निवडणूक प्रचारासाठी जो देशभर दौरा केला, त्या दौऱ्यात, ‘या निवडणुका हा स्वातंत्र्य लढ्याचाच भाग आहे, जे लोक परिस्थितीच्या वा वैयक्तिक मर्यादांमुळे चळवळीत सामील होऊ शकले नाहीत त्यांनी त्यांचा स्वातंत्र्य लढ्याला असलेला पाठिंबा काँग्रेसला मत देऊन व्यक्त करावा’, हा संदेश त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात पोचविला. त्याचबरोबर पं. नेहरूंनी जातिधर्माचे भेद ओलांडून सर्व भारतीय समान आहेत ही भूमिकाही जनतेच्या मनावर ठसवली आणि स्वतंत्र भारतात श्रमिकांना, दलितांना, उपेक्षितांना न्याय दिला जाईल, असेही आश्वासन स्पष्टपणे दिले. एस्. एम्. आणि गोरे यांनी समाजवादी कार्यकर्त्यांची पुण्यामध्ये बैठक घेतली आणि त्या बैठकीत पं. नेहरूंच्या वैचारिक भूमिकेच्या आधारे गावोगाव सभा घेऊन मतदारांचे प्रबोधन करण्यासाठी निवडणुकीत काम करावयाचे असा एकमताने निर्णय घेण्यात आला. एस्. एम्. यांनी पुण्यामध्ये आणि पुणे जिल्ह्यामधील इंदापूर

तालुक्यात मुख्यतः काम केले. पुण्यामधून काँग्रेसने मुंबई असेंब्लीसाठी स्वातंत्र्य लढ्यात कारावास भोगलेल्या आणि काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आणि नामवंत वकील भा. म. उर्फ बापूसाहेब गुप्ते आणि लक्ष्मीबाई ठुसे यांना उभे केले. त्यांच्या विरोधात लोकशाही स्वराज्य पक्षाने ख्यातनाम वकील ल. ब. भोपटकर आणि अ‍ॅड. सुभद्राबाई तारकुंडे यांना उभे केले. एस्. एम्., गोरे, शिरुभाऊ लिमये यांनी प्रचार मोहिमेत हिरिरीने काम केले. देशभराप्रमाणेच पुण्यामध्ये आणि पुणे जिल्ह्यातही काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस यश मिळाले. एस्. एम्. यांना इंदापूर तालुक्यात काम करताना स्थानिक परिस्थितीमुळे कटू अनुभव आले. परंतु त्यांनी निर्भयपणे सभा घेतली. त्यांची स्वातंत्र्याबद्दलची तळमळ श्रोत्यांना जाणवली आणि प्रथम आक्रमक असलेले विरोधक नंतर नरम झाले.

काँग्रेसने पुढे अधिकार स्वीकार करण्याचे ठरविले आणि बाळासाहेब खेर यांचे मंत्रिमंडळ अधिकाररूढ झाले. त्या वेळी महसूल मंत्री मोरारजी देसाई यांनी जमिनविषयक एक विधेयक तयार केले. या विधेयकात जमीनदारी नष्ट करण्याची तरतूद नसली तरी कुळांना कायम वहिवाट करण्याचा हक्क दिलेला होता. कर्नाटकातील गंगाधरराव देशपांडे आणि अन्य जमीनदार, गुजरातमधील जमीनदारांचे हितसंबंधी आणि रत्नागिरी जिल्ह्यातील खोतमंडळी यांनी

विधेयकाविरुद्ध प्रचार केला. पुण्यात गोखले हॉलमध्ये जमीन मालकांची एक परिषद झाली आणि त्यांनी कुळांना कायम वहिवाटीचा हक्क देऊ नये, अशी मागणी ठराव करून केली. तेव्हा एस्. एम्. हे महसूलमंत्री मोरारजी देसाई यांना भेटले आणि त्यांना सांगितले, "जमीनदार जर वर्ग म्हणून संघटित होत असतील तर आम्ही कुळांची परिषद बोलावू." मोरारजी भाईंनी "बोलवा" असे सांगितले. एस्. एम्., ना. ग. गोरे, शिरूभाऊ लिमये आणि रॉयवादी कार्यकर्ते यांनी पुणे जिल्हा कॉंग्रेसच्यावतीने कुळांचा मोर्चा काढायचा आणि पुण्यात असेंब्लीचे पावसाळी अधिवेशन भरेल त्या वेळी कौन्सिल हॉलवर मोर्चा न्यावयाचा, असा निर्णय घेतला. त्यावेळी शंकरराव देव महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांचा मोर्चा काढण्यास विरोध होता. परंतु जिल्हा कॉंग्रेसच्या सर्वसाधारण सभेत एस्. एम्.च्या बाजूने निर्णय झाला. शेतकऱ्यांचा मोर्चा प्रचंड होता. महसूल मंत्र्याच्या बंगल्यावर शिष्टमंडळ गेले. तेथे प्रधानमंत्री बाळासाहेब खेर आले होते. शेतकऱ्यांच्या मोर्चाला उद्देशून भाषण करताना बाळासाहेब खेर म्हणाले, 'पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा'.

आपले राज्य असले तरी गरिबांना श्रमिकांना न्याय देण्यासाठी सतत काम केले पाहिजे, संघर्षही केला पाहिजे, असे एस्. एम्. सर्व तरुण समाजवादी कार्यकर्त्यांना सांगत आणि स्वतः सतत कार्यरत असत. एस्. एम्., ना. ग. गोरे आणि शिरुभाऊ लिमये यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील

कार्यामुळे आणि त्यांच्या वेगवेगळ्या प्रश्नांवरील पुरोगामी मतांमुळे, समाजवादी पक्षाकडे ध्येयवादी तरूण आकृष्ट होऊ लागले. यांच्यामध्ये विनायकराव कुलकर्णी, बंडू गोरे, माधव लिमये, अण्णा साने, गंगाधर ओगले हे प्रमुख होते. एस्. एम्. आणि गोरे हे नेतृत्त्व करीत होते. एस्. एम्. आणि गोरे हे या तरुण कार्यकर्त्यांचा नियमाने अभ्यासवर्ग घेत असत. त्यावेळी लोकशक्तीचे संपादक आचार्य जावडेकर हे होते आणि पां. वा. गाडगीळ हे सहसंपादक होते. पां. वा. गाडगीळ हेही या अभ्यासवर्गात बौद्धिक घेत. ना. ग. गोरे आणि पां. वा. गाडगीळ हे दोघे लेखनही करीत. त्या वेळी पुण्यातील सुप्रसिद्ध लेखक – प्रकाशक य. गो. जोशी यांनी वादविवेचनमाला काढून पुस्तके प्रसिद्ध केली. त्या मालेत ना. ग. गोरे यांनी 'विश्वकुटुंबवाद' आणि 'साम्राज्यशाही' ही पुस्तके लिहिली. गोरे यांनी पं. नेहरूंच्या आत्मकथेचाही मराठीत सुंदर अनुवाद केला. तो सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेने प्रसिद्ध केला. १९३७ साली एस्. एम्.च्या खोलीवर एक १५ – १६ वर्षांचा विद्यार्थी आला. स्वातंत्र्य चळवळ आणि समाजवाद याबद्दल या विद्यार्थ्याने काही प्रश्न विचारले. मॅट्रिक पास होऊन कॉलेजाच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या या तरूणाने खूप वाचन केले आहे, हे एस्. एम्.च्या लक्षात आले. त्याची प्रखर बुद्धिमत्ताही त्यांना जाणवली. एस्. एम्.नी त्याला ज्या आपुलकीने वागविले त्यामुळे हा विद्यार्थी एस्. एम्.कडे सतत येऊ लागला आणि गोऱ्यांनी त्याला

अभ्यास वर्गालाही यायला सांगितले. या विद्यार्थ्याचे नाव होते मधू लिमये. समाजवादी गटातील तरूण कार्यकर्त्यांमध्ये वयाने सर्वांत लहान असलेला मधू त्याच्या बुद्धिमत्तेमुळे, वादविवादातील त्याच्या अभिनिवेशामुळे एकदम चमकू लागला. एस्. एम्. शी असलेल्या त्याच्या निकट स्नेहामुळे त्याचे मित्र त्याला एस्. एम्.चा 'छावा' म्हणत.

## ताराबाईंच्या बरोबर विवाह

एस्. एम्. आणि तारा पेंडसे यांची मने जुळली होती. कर्वे विद्यापीठाच्या पदवीधर झाल्यावर ताराबाई पुण्याला भावे स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून नोकरी करू लागल्या १९३० ते १९३६ या काळात एस्. एम्. च्या तुरुंगाच्या वाऱ्या सुरू होत्या. १९३६ नंतर समाजवादी पक्षाच्या आणि स्वातंत्र्य लढ्याच्या कामात ते गुरफटून गेले. फ्री प्रेसचे वार्ताहर म्हणून थोडे पैसे मिळत. पण एकूण कष्टानेच जगणे चालू होते. एस्. एम्. ताराबाईंना म्हणाले, "मी हा असा भणंग, माझा एक पाय सतत तुरुंगात असणार. तुझ्याबद्दल मला प्रेम वाटते पण माझ्यासारख्या माणसाला प्रपंच करणे कसे जमणार? शिवाय मी आता जवळजवळ पस्तीच वर्षांचा आहे.' ताराबाई म्हणाल्या, 'माझे तुमच्यावर प्रेम आहे. लग्न केल्यावर मी सगळं सोसायला तयार आहे.' ताराबाईंची घरची सुस्थिती होती. त्यांच्या सर्वात थोरल्या भावाचा या

लग्नाला विरोध होता. पण सर्वात थोरली बहीण सौ. दमयंती गोखले आणि दुसरी सुंदराबाई यांचा मात्र या लग्नाला पाठिंबा होता. एस्. एम्.चे मित्र म्हणत, ‘तू आता लग्न कर.’ एस्. एम्.चे जिवलग मित्र ना. ग. गोरे यांनी त्यांच्याबरोबर कॉलेजमध्ये असलेल्या सुमती कीर्तने या विद्यार्थिनीशी पुनर्विवाह केला होता. नानासाहेबांच्या आईवडिलांचा या लग्नाला तीव्र विरोध होता. नानासाहेबही चळवळीत पडल्यामुळे काही मिळवत नव्हते. सुमतीबाईंनी सेवासदनमध्ये शिक्षिका म्हणून नोकरी धरली आणि नंतरच त्यांनी गो ऱ्यांबरोबर लग्न केले. गोरे एस्. एम्.ना म्हणाले, ‘आपण चळवळीत काम करताना आपल्या बायकांनी प्रपंच सांभाळायचा हे आपण मान्य करावे. तू तारा पेंडसेशी लग्न केलेच पाहिजे, असे मला वाटते.’

एस्. एम्.च्या आईने खूप दुःखे सोसली. त्यांनाही एस्. एम्.चा संसार सुरू व्हावा, असे वाटत होते. अखेर १९३९ च्या सप्टेंबर महिन्यात गोखले हॉलमध्ये नोंदणी पद्धतीने एस्. एम्. जोशी आणि तारा पेंडसे यांचे लग्न झाले. निमंत्रण पत्रिकाही छापल्या नव्हत्या. पण एस्. एम्. वर प्रेम करणारे स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्ते आपल्या घरचे कार्य म्हणून लग्नाला आले. सातरकरचे हॉटेल गोखले हॉलसमोर होते. त्यांनी सर्वांना चहा दिला आणि विवाह समारंभ संपला. रावसाहेब पटवर्धन आणि त्यांच्या आई यांनी चाळीस निमंत्रितांना मेजवानी दिली. काकासाहेब

गाडगीळांच्या पत्नी आनंदीबाई यांनी एस्. एम्. व ताराबाईंचे निकटचे मित्र – मैत्रिणी आणि निकटचे नातेवाईक यांना स्वतःच्या घरीच जेवण दिले. एका खोलीत राहणारे एस्. एम्. लग्नानंतर १८ रुपये भाड्याच्या तीन खोल्यांत पत्नी आणि आई यांच्यासह राहू लागले. असा हा संन्याशाचा संसार १९३९ साली सुरू झाला.

**स्वातंत्र्यलढा क्षितिजावर**

३ सप्टेंबर १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. भारताच्या राजकीय जीवनावर त्याचा परिणाम होणे अपरिहार्यच होते. युद्ध पुकारले जाताच व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी जाहीर करून टाकले की हिंदुस्थानही इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाला आहे. पं. नेहरू हे त्या वेळी चीनच्या दौऱ्यावर होते. दौरा लवकर आटोपून ते भारतात परतले. व्हाइसरॉयनी काँग्रेसच्या नेत्यांबरोबर चर्चा न करता एकतर्फी हिंदुस्थान युद्धात सामील झाल्याचे जाहीर केले, याबद्दल काँग्रेस वर्किंग कमिटीने तीव्र नापसंती व्यक्त केली. पं. नेहरूंनी असे स्पष्टपणे सांगितले की काँग्रेसचा फॅसिझमला विरोध असून काँग्रेस ही लोकशाहीवादी आहे. परंतु साम्राज्यवादी युद्धात मात्र भारत सामील होणार नाही. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी भारताला फरफटत नेण्यास पं. नेहरूंचा विरोध होता. पुढे काँग्रेस वर्किंग कमिटीत अधिक चर्चा होऊन ज्या सात प्रांतांमध्ये काँग्रेसची मंत्रिमंडळे होती. त्या प्रांतांतील काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामा द्यावा,

असा ठराव करण्यात आला. त्या आदेशानुसार सातही काँग्रेस मंत्रिमंडळांनी एकाच दिवशी राजीनामे दिले. एस्. एम्. आणि त्यांचे समाजवादी सहकारी यांना जे घडावे असे वाटत होते तेच काँग्रेस मंत्रिमंडळांच्या राजीनाम्याने घडले. एस्. एम्. गोरे आदी समाजवाद्यांचा हिटलर – मुसोलिनीच्या हुकूमशाहीला कडवा विरोध होता. मानवी स्वातंत्र्याचा गळा घोटणारी ही विनाशकारी विचारसरणी आहे, असे त्यांना वाटत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी त्यांचे, भारत हे हिंदू राष्ट्र आहे या संघाच्या भूमिकेवरून खटके उडतच. शिवाय संघ ही एकचालकानुवर्ती संघटना असल्यामुळे त्या संघटनेतील अनेकांना हुकुमशाहीबद्दल आकर्षण वाटत होते. त्यामुळेही समाजवादी पक्षाचा संघाला विरोध होता. संघातील ना. द. आपटे, गोडसे आदी मंडळी सतत आक्रमक भूमिका घेत. १ मेच्या कामगारांच्या मिरवणुकीचे एस्. एम्. नेतृत्व करीत असताना ना. द. आपटे आदींनी त्या मिरवणुकीवर हल्ला केला. एस्. एम्.च्या डोक्यावर सळईने प्रहार केला. त्यामुळे झालेल्या एस्. एम्. यांच्या जखमेतून रक्तस्त्राव झाल्यामुळे टाके घालावे लागले. एकीकडे संघाच्या विरोधाला तोंड देतानाच एस. एम्. यांचे एके काळी त्यांचे मित्र असलेल्या रॉयवादी मित्राबरोबरही तीव्र वैचारिक मतभेद झाले. रॉय यांनी लोकशाही आणि हुकूमशाही राष्ट्रांमध्ये महायुद्ध सुरू असताना भारताने लोकशाही राष्ट्रांनाच पाठिंबा दिला पाहिजे, अशी भूमिका

घेतली. म्हणजे प्रत्यक्षात ब्रिटिश साम्राज्यशाहीबरोबरच सहकार्य करावयाचे, असा या भूमिकेचा अर्थ होता. पं. नेहरू आणि समाजवाद्यांची भूमिका अशी होती की ब्रिटीश साम्राज्याची मगरमिठी जोपर्यंत भारतावर आहे. तोपर्यंत ब्रिटन हे हिटलरविरोधी असले तरी भारत त्याला पाठिंबा देऊ शकणार नाही. दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यावेळी कम्युनिस्ट पक्षानेही हे साम्राज्यवादी युद्ध असल्यामुळे त्या युद्धाला विरोध केला पाहिजे, अशीच भूमिका घेतली. रशिया आणि जर्मनीचा जोपर्यंत अनाक्रमणाचा करार होता तोपर्यंत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने युद्धविरोधी भूमिका घेतली. परंतु पुढे हिटलरने रशियावर आक्रमण केले आणि नंतर इंग्लंड, फ्रान्स या दोस्त राष्ट्रांच्या आघाडीत रशियाही सामील झाला. त्यानंतर कम्युनिस्ट पक्षाने ताबडतोब कोलांटी उडी घेऊन साम्राज्यवादी युद्ध नसून 'लोकयुद्ध' आहे अशी भूमिका घेतली. कम्युनिस्ट पक्षाचा युद्धविरोध मावळला आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांना युद्धप्रयत्नांमध्ये सहकार्य केले पाहिजे, यावेळी त्यांच्याशी संघर्ष करणारी स्वातंत्र्य चळवळ करू नये, असा पवित्रा कम्युनिस्ट पक्षाने घेतला.

## युद्धविरोधाबद्दल कारावास

एस्. एम्. चे एक सहकारी नाना पुरोहित हे महाड तालुक्यात काम करीत होते. त्यांनी बीरवाडी येथे १९४०च्या मे महिन्यात शेतकरी परिषद घेतली. परिषदेस त्यांनी एस्.

एम्. जोशींना बोलाविले. एस्. एम्.बरोबर बंडू गोरे आणि माधव लिमये हेही गेले होते. या परिषदेत या तिघांची भाषणे झाली. त्यात स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपल्याला चळवळ करावी लागेल हे सांगतानाच एस्. एम्. यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही भाषण केले. कसणाऱ्याची जमीन झाली पाहिजे, असे त्यांनी आग्रहाने सांगितले. भाषण करून आणि परिषदेचे काम संपवून एस्. एम्. पुण्याला गेले आणि १० जूनलाच पोलीस पकड वॉरंट घेऊन आले. वॉरंट बजावल्यावर एस्. एम्. म्हणाले, “मला माझ्या पत्नीला भेटायचे आहे.” ताराबाई त्या वेळी बाळंतपणासाठी थोरल्या बहिणीकडे गेल्या होत्या आणि मुलाचा – अजेयचा – जन्म होऊन चौदाच दिवस झाले होते. एस्. एम्. यांनी शांतपणे ताराबाईंचा निरोप घेतला. ताराबाई म्हणाल्या, ‘तुम्ही आमची काळजी करू नका. तुरूंगात प्रकृतीला जपून रहा.’ युद्धविरोधी भाषणाबद्दल खटला चालून एस्. एम्. आणि त्यांच्या तरुण सहकाऱ्यांना १ वर्षाची सजा झाली. प्रथम त्यांना ठाणे येथील तुरुंगात नेले आणि काही दिवसांनी नाशिक येथील तुरुंगात त्यांची रवानगी करण्यात आली.

म. गांधींनी १९३९ मध्ये महायुद्ध सुरू झाल्यानंतर प्रथम इतकेच जाहीर केले होते की, ते अहिंसावादी असल्यामुळे त्यांचा युद्धाला विरोध आहे. त्याचबरोबर त्यांची अशीही भूमिका होती की ब्रिटन युद्धात गुंतले असताना सामुदायिक लढा उभारून सरकारला अडचणीत टाकायचे

नाही. परंतु १९४० च्या सप्टेंबरमध्ये म. गांधींनी त्यांच्या भूमिकेत बदल करून ऑक्टोबर महिन्यात युद्धाच्या विरोधामध्ये वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. आचार्य विनोबा भावे हे पहिले सत्याग्रही होते. त्यांना सरकारने चार महिन्यांची शिक्षा दिली. दुसरे सत्याग्रही पं. जवाहरलाल नेहरू हे होते. त्यांना मात्र सरकारने चार वर्षांची शिक्षा ठोठावली. एस्. एम्. यावेळी नाशिक तुरुंगात होते. ते बंडू गोरेला म्हणाले, ‘यानंतर काही दिवसांनी पुढचे पाऊल म्हणून गांधीजी सामुदायिक लढ सुरू करतील असे मला वाटते.’

एस्. एम्. नाशिकच्या तुरुंगात असताना १९४० च्या डिसेंबर महिन्यात जयप्रकाश नारायण अकस्मात पुण्यामध्ये नानासाहेब गोरे यांच्या घरी आले. जयप्रकाशजी युद्ध – विरोधी भाषणाबद्दल नऊ महिन्यांची शिक्षा भोगून नुकतेच तुरुंगातून सुटले होते. त्यांना पाहून नानासाहेब चकितच झाले. गांधीजींनी युद्धाच्या विरोधात वैयक्तिक सत्याग्रह नुकताच सुरू केला होता. जयप्रकाशजी नानासाहेबांना म्हणाले, “स्वातंत्र्याचा लढा हा केवळ वैयक्तिक सत्याग्रहाच्या स्वरूपात चालविणे मला अपुरे वाटते. आपल्याला देशभर जनतेचा उठाव करावा लागेल आणि त्याच्या जोडीला भूमिगत चळवळही चालवावी लागेल. हिटलरने युरोपात जे देश जिंकले तेथील स्वातंत्र्यवादी तरूणांनी भूमिगत चळवळ चालविली आहे. हिटलरच्या

सैन्याने अनेकांना ठार केले तरी त्याच्याविरुद्ध हे शूर स्वातंत्र्यसैनिक भूमिगत राहून लढा देत आहेत. आपल्याला ब्रिटिश साम्राज्याविरूद्ध असाच लढा द्यावा लागेल. भूमिगत चळवळ करून सरकार खिळखिळे (पॅरलाइज) करावे लागेल. याच्यासाठी आत्तापासून संघटना बांधावी लागेल. मी मुंबईला मेहेरअल्लीशी बोललो. याचा तपशील मी तुम्हाला नंतर पाठवीन.' जयप्रकाशजी मुंबईला पोहोचताच तोच पोलिसांनी त्यांना अटक केली आणि राजस्थानात देवळीच्या तुरूंगात स्थानबद्ध केले.

नाशिक तुरूंगात असताना एस्. एम्.ना घरची मात्र फार काळजी वाटत होती. ताराबाई आणि तान्हा अजेय कसे राहात असतील, या कल्पनेने ते अनेकदा अस्वस्थ होत. सुदैवाने एस्. एम्.चे मित्र शंकरराव आगाशे यांनी ताराबाईंनी सर्व तऱ्हेची मदत केली. एस्. एम्.ना हे कळल्यावर त्यांच्या मनाची तगमग कमी झाली. परंतु त्यांचे पित्याचे अंतःकरण मुलासाठी व्याकूळ होत होतेच. अखेर शिक्षा भोगून एस्. एम्. बंडू गोरे, आणि माधव लिमये हे १९४१ च्या एप्रिल महिन्याच्या शेवटी सुटून बाहेर आले.

## राष्ट्र सेवादलाची स्थापना

एस्. एम्. तुरुंगात असताना आणखीही एक महत्वाची घटना झाली. एकीकडे स्वातंत्र्याच्या चळवळीला गती येत असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या हिंदुत्ववादी

संघटनेचा प्रचार आणि प्रसार वाढत चालला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ 'सैन्यात शिरा' अशी भूमिका घेऊन ब्रिटिशांना युद्धप्रयत्नांतही मदत करीत होता. त्या वेळी शाळा कॉलेजात अभ्यासाव्यतिरिक्त फारसे अन्य कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी नसत. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्या तरी संघटनेत जावेसे वाटत होते. काँग्रेसचे राजकीय कार्य वाढत होते. परंतु तरुणांसाठी काँग्रेसची प्रभावी संघटना नव्हती. विद्यार्थ्यांच्या मनावर स्वातंत्र्यवादी आणि पुरोगामी विचारांचा संस्कार करण्यासाठी युवक संघटना असली पाहिजे असे अनेकांना वाटत होते. या बाबतीत विचारविनिमय करण्याकरिता शिरुभाऊ लिमये आणि नानासाहेब गोरे यांनी पुण्यात काही निवडक मंडळींची बैठक घेतली. या बैठकीत, राष्ट्र सेवादलाची स्थापना करावी असा निर्णय घेण्यात आला. या संघटनेने मुख्यतः तरुणांच्या मनावर व्यापक राष्ट्रवादी विचारांचा संस्कार करून त्यांच्या मनात स्वातंत्र्य चळवळीबद्दल आकर्षण निर्माण करावे, असाही निर्णय घेण्यात आला. एस्. एम्. जोशींना या संघटनेचे प्रमुख होण्याची विनंती करावी असेही एकमताने ठरले. या बैठकीनंतर काही दिवसांनीच नानासाहेब गोरे यांना गुलबर्गा येथील भाषणाबद्दल अटक होऊन शिक्षा झाली. काँग्रेसच्या वैयक्तिक सत्याग्रहाचा सरकारचा युद्धप्रयत्नांवर फार मोठा जरी परिणाम झाला नाही तरी शिस्तबद्ध रीतीने देशभरातून तीस हजार सत्याग्रही तुरुंगात गेले. याचा परिणाम म्हणजे

राजकीय जागृती मोठ्या प्रमाणावर होऊन स्वातंत्र्य आंदोलनास अनुकूल वातावरण निर्माण झाले.

एस्. एम्. जोशींना शिरुभाऊ लिमये यांनी पुण्यातील बैठकीचे वृत्त सांगितले आणि राष्ट्र सेवादलाची स्थापना करून एस्. एम्. ने दलप्रमुख व्हावे, अशी त्यांना विनंती केली. एस्. एम्. जोशींनी या सूचनेचा विचार करून राष्ट्र सेवादलाची सूत्रे हाती घेतली. जून १९४१ मध्ये राष्ट्र सेवादलाची स्थापन होऊन एस्. एम्. जोशी हे दलप्रमुख झाले. एस्. एम्. चे आतापर्यंतचे जीवन राजकीय चळवळीत गेले होते. राष्ट्र सेवादलाची जबाबदारी घेताना स्वातंत्र्य चळवळीत समर्पण करण्याची प्रेरणा तरुणांना द्यावयाची असाच निर्धार त्यांनी मनाशी केला.

यापूर्वी थोडेच दिवस आधी १७ जानेवारी १९४१ला भारतालाच नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनाही धक्का देणारी एक घटना घडली. महायुद्ध सुरू झाल्याबरोबर सुभाषचंद्र बोस यांना सरकारने त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले होते. घराभोवती पोलिसांचा सक्त पहारा असताना सुभाषबाबू तेथून निसटून पेशावर मार्गे देशाबाहेर गेले. सर्व देश सुभाषबाबूंच्या साहसामुळे थरारून गेला. सुभाषबाबूंच्या या सीमोल्लंघनामुळे जनतेत नवे चैतन्य निर्माण झाले.

देवळी तुरुंगात स्थानबद्ध असताना जयप्रकाश नारायण यांनी भूमिगत चळवळीचे स्वरूप काय असावे याचा तपशील देणारे एक पत्र आपल्या समाजवादी मित्रांना गुप्तपणे

पाठविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते पत्रक पोलिसांनी, जयप्रकाश नारायण यांच्या पत्नी प्रभावतीदेवी यांच्याकडून हस्तगत केले. काँग्रेसमध्ये असलेल्या या तरूण पुढाऱ्याचा गांधीजींनी निषेध करावा म्हणून सरकारनेच ते पत्रक प्रसिद्ध केले. त्या पत्रकाचा निषेध करण्यास गांधीजींनी स्पष्ट नकार दिला. ‘हरिजन’मध्ये आपली भूमिका स्पष्ट करताना गांधींजींनी लिहिले, ‘मला अहिंसकच चळवळ करावयाची आहे, परंतु लोकांच्या रास्त आकांक्षाही पुऱ्या न करता ब्रिटिश सरकार दडपशाही करीत असेल तर काहीजण हिंसक चळवळीस अनुकूल होणारच. जयप्रकाश नारायण यांची भूमिका ही सरकारच्या जुलमी धोरणाविरुद्धची तीव्र प्रतिक्रिया आहे.’

जागतिक राजकारणातही प्रचंड घडामोडी होत होत्या. सात डिसेंबरला जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर हल्ला करून अमेरिकेचा नाविक तळ उद्ध्वस्त केला. त्यानंतर अमेरिका लोकशाहीवादी राष्ट्रांच्या बाजूने युद्धात सामील झाली. यापूर्वी युरोपपुरतेच मर्यादित असलेले युद्ध आता खऱ्या अर्थाने जागतिक युद्ध झाले. ज्याप्रमाणे युरोपात हिटलरने एकामागून एक देश जिंकत रशियावर स्वारी केली त्याचप्रमाणे पूर्वेकडे जपान काही आशियाई राष्ट्रांवर, विशेषतः युरोपियन साम्राज्यांतर्गत राष्ट्रांवर, हल्ला करणार अशी शक्यता निर्माण झाली.

१९४२ च्या फेब्रुवारीत भारताच्या ईशान्य आणि आग्नेय दिशांच्या रोखाने जपानचे सैन्य पुढे येऊ लागले. १५ फेब्रुवारीला सिंगापूर पडले. सात मार्चला जपानने रंगूनचा ताबा घेतला. पाच एप्रिलला जपानने कोलंबोवर आणि ६ एप्रिलला भारतातील विशाखापट्टण आणि काकिनाडा शहरावर बॉम्बफेक केली. ब्रिटिश सरकार भारतीय जनतेचे रक्षण करू शकणार नाही, ही भावना लोकांत वाढू लागली. या परिस्थितीत ब्रिटनने कडव्या साम्राज्यवादी भूमिकेस मुरड घालून भारताचा युद्धप्रयत्नात खराखुरा पाठिंबा मिळविण्यासाठी अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनी इंग्लंडवर दबाव आणला. सामोपचाराचे वातावरण निर्माण करण्यासाठी ब्रिटिश सरकारने पं. नेहरू, मौ. आझाद, सरदार पटेल आदी नेत्यांची आणि वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतलेल्या अन्य सत्याग्रहींची मुक्तता केली. त्यानंतर भारताच्या नेत्यांबरोबर बोलणी करण्याकरिता १९४२ च्या मार्चमध्ये सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ पाठविण्यात आले. ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांनी अत्यंत नाखुशीने हे केले होते. कारण कोणत्याही परिस्थितीत ब्रिटिश साम्राज्याचे सार्वभौमत्व कमी होता कामा नये, अशी त्यांची भूमिका होती.

एस्. एम्. जोशी आणि त्यांचे सहकारी यांना संघर्षाच्या मार्गानेच स्वराज्य मिळेल असे वाटत होते आणि तडजोड झाल्यास संघर्षाची धार कमी होईल अशी भीती

वाटत होती. या वेळी गांधीजींनी अत्यंत जहाल भूमिका घेऊन 'स्वतंत्र हिंदुस्थानच स्वतःचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करू शकेल', असे रोखठोकपणे सांगितले. ब्रिटन स्वतःला लोकशाहीवादी म्हणवीत असले तरी जोपर्यंत भारतावरील ब्रिटिश साम्राज्याचे जोखड दूर होत नाही, तोपर्यंत ब्रिटनला लोकशाहीवादी म्हणताच येणार नाही अशी भूमिका गांधीजींनी 'हरिजन'मधून देशासमोर मांडली. गांधीजी त्यांच्या अग्रलेखांतून, मुलाखतींमधून आणि भाषणांतून राजकीय वातावरण तापवू लागले. भारताची स्वातंत्र्याची आकांक्षा ताबडतोब पूर्ण झाली पाहिजे, असे गांधीजींनी 'हरिजन' च्या अग्रलेखात लिहिले तेव्हा देशभर चैतन्याची नवी लाट उसळली. क्रिप्स शिष्टमंडळाने, काँग्रेस अध्यक्ष मौ. आझाद आणि पं. नेहरू यांच्याबरोबर बोलणी करून युद्ध संपल्यानंतर ब्रिटन भारताला वसाहतीचे स्वराज्य देईल, अशी योजना त्यांच्यासमोर ठेवली. परंतु गांधीजींनी ही योजना ठोकरून लावली. क्रिप्स योजना म्हणजे 'बुडत्या बँकेवरचा पुढच्या तारखेचा धनादेश आहे', असे जेव्हा गांधीजींनी 'हरिजन' मध्ये लिहिले, त्या वेळी एस्. एम्. ना फार समाधान वाटले. स्वातंत्र्यसंग्राम आता समीप आला आहे, हे त्यांनी ओळखले.

## स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई

राष्ट्र सेवादलाच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना ते म्हणाले, "काहीजण म्हणतात की, राष्ट्र सेवादल हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला विरोध करण्यासाठी सुरू केले आहे. हे खोटे आहे. राष्ट्र सेवादलाची भूमिका नकारात्मक नाही. तरुणांना स्वातंत्र्य लढ्यात येण्याची प्रेरणा देण्यासाठी राष्ट्रसेवादल सुरू केले आहे. संघ स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देण्याऐवजी "सैन्यात जा" म्हणून ब्रिटिश साम्राज्याशी सहकार्य करण्याची भूमिका घेतो, म्हणून राष्ट्र सेवादलाचा संघाला विरोध आहे. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच," असे लो. टिळकांनी आपल्याला सांगितले. म. गांधींच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊनच आपली स्वराज्याची आकांक्षा पुरी होऊ शकेल. राष्ट्र सेवादलातील सैनिकांनी स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे. भगतसिंग, राजगुरू हे हुतात्मे झाले. बाबू गेनू या साध्या कामगाराने स्वदेशीसाठी बलिदान केले. हाच संस्कार राष्ट्र सेवादलाला करायचा आहे." एस्. एम्. यांचे हे बौद्धिक ऐकणारा मी एक श्रोता होतो. स्वातंत्र्यलढ्यात तरुणांनी उडी घेतली पाहिजे, हे त्यांचे आवाहन ऐकताना माझ्या मनात देशभक्तीची ज्योत पूर्वीपेक्षाही प्रखर झाली. मन पेटून उठले. बैठकीनंतर आम्ही तरुण कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत पडण्याचा निर्धार केला.

चर्चिल या साम्राज्यवादी ब्रिटिश पंतप्रधानांना भारताला राजकीय हक्क देण्याची कल्पनाही सहन होत नव्हती. त्यांनी जाहीर घोषणा केली, “मी ब्रिटनचा पंतप्रधान झालो आहे ते साम्राज्याचे दिवाळे काढण्यासाठी नाही.” चर्चिल यांनी रूझवेल्ट यांच्या दबावामुळे क्रिप्स शिष्टमंडळ पाठविले, परंतु छुप्या रितीने त्या योजनेला त्यांनी सुरुंग लावला. क्रिप्स योजनेत पाकिस्तान निर्मितीची बीजे होतीच. शिवाय संस्थानिकांना भारताचे भविष्य ठरविण्यासाठी जादा अधिकार दिले होते. अखेर काँग्रेसचे अध्यक्ष मौ. आझाद यांनीही क्रिप्स योजना फेटाळून लावली. वाटाघाटी फिसकटल्या. एस्. एम्. आणि त्यांचे सहकारी या कालखंडात ‘हरिजन’ मधील गांधीजींचे अग्रलेख अत्यंत काळजीपूर्वक वाचीत असत. २६ एप्रिलच्या ‘हरिजन’च्या अंकात गांधीजींनी ब्रिटिशांना, भारत सोडून चालते व्हावे - ‘चले जाव’, ‘क्विट इंडिया’ असा आदेश दिला. एस्. एम्. ने आत्मकथेत लिहिले आहे, ‘हरिजन’मधील या अग्रलेखापासून देशातील वातावरण उत्तरोत्तर विजेने भारल्यागत झाले.

## भूमिगत चळवळीची तयारी

मे महिन्यात पुण्याला एस्. एम्. जोशी यांनी राष्ट्र सेवादलाच्या महाराष्ट्रातील दीडशे निवडक तरुण कार्यकर्त्यांचा कॅम्प घेतला होता. कॅम्पच्या समारोपाला

युसूफ मेहेरअली आले होते आणि त्यांनी तरुणांना स्वातंत्र्य लढ्यात सामील होण्याचे आवाहन केले. त्याच दिवशी मेहेरअल्ली, एस्. एम्. आणि शिरुभाऊ यांची एक खासगी बैठक झाली आणि तेथे ठरल्याप्रमाणे १९४२ च्या जून महिन्यात एस्. एम्. आणि शिरुभाऊ यांनी महाराष्ट्रातील निवडक समाजवादी कार्यकर्त्यांचे एक गुप्त शिबिर पुण्यात रास्ता पेठेत 'गुजरात मेटल वर्क्स' च्या जागेत घेतले. ब्रिटिशांची सत्ता केन्द्रे नष्ट करावयाची, सैन्याच्या हालचालीस प्रतिबंध व्हावा म्हणून पूल उडविणे, तारा तोडणे आदी गोष्टी करावयाच्या, मात्र शक्यतो जीवितहानी करावयाची नाही आणि व्यक्तिगत मालमत्तेवर घाला घालायचा नाही, असा कार्यक्रम या गुप्त बैठकीत ठरविण्यात आला.

## 'चले जाव' आंदोलनास प्रारंभ

८ ऑगस्ट रोजी मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले. अधिवेशनास देशभरातून तरुण आले होते. अधिवेशनात म. गांधीजींचे भाषण एस्. एम्. जीवाचा कान करून ऐकत होते. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे समर्पण करावे लागेल, या आशयाच्या गांधीजींच्या शब्दांनी सभेतील लक्षावधी श्रोत्यांप्रमाणेच एस्. एम्. यांचे मन थरारून गेले. एस्. एम्. ताराबाईंना घेऊन अधिवेशनास आले होते आणि थत्ते नावाच्या स्नेह्याकडे उतरले होते. ८

ऑगस्टला ‘चले जाव’ ठराव पास झाल्यानंतर पुढाऱ्यांची धरपकड होणार, असा एस्. एम्. यांना अंदाज होताच. त्यांनी ताराबाईंना पुण्यास पाठवून दिले आणि स्वतः लागलीच भूमिगत व्हावयाचे ठरविले. ते ताडदेवला जनुभाऊ गुणे यांच्या निवासस्थानी गेले. ही जागा आडबाजूला होती. तीन खोल्या आणि बाथरूम अशा त्या जागेत गुणे हे वैद्यकीचा अभ्यास करणारे विद्यार्थी राहात. वरच्या मजल्यावर शेंड्ये हे विद्यार्थी राहात. गुणे हे नगरच्या वैद्यराज गुण्यांचे चिरंजीव. ही जागा नगरच्या जनुभाऊ पटवर्धनांनी भूमिगत नेत्यांना राहण्यासाठी निश्चित केली होती. एस्. एम्. आणि जनुभाऊ तेथे आल्यावर गुणे आणि शेंड्ये हे जागा सोडून गेले आणि दोन मजल्यांची ती जागा भूमिगतांचे निवासस्थान बनली. त्या जागेत एकच अडचण होती, ती म्हणजे तेथे उंदीर फार होते. एस्. एम्. म्हणाले, ‘आपण भूमिगत आणि आपले येथील सोबती बिळात राहणारे उंदीर.’ त्यानंतर भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये ही जागा ‘मूषक महाल’ म्हणून ओळखली जाऊ लागली. ८ ऑगस्टला मध्यरात्रीनंतर म. गांधी, पं. नेहरू आदी पुढाऱ्यांची ब्रिटिश सरकारने धरपकड केली. मुंबईत लोकांना ही वार्ता सकाळी कळताच लोकांनी प्रचंड मोर्चे काढले. या मिरवणुकांतील लोक बेभान झाले होते. लाठीमार, अश्रुधूर, गोळीबार यांना न भिता लोक आपला संताप व्यक्त करीत होते. देशभर सर्वत्र असे उठाव झाले. सरकारने जिल्हा पातळीवरील काँग्रेस

कार्यकर्त्यांची धरपकड केली. मात्र पूर्वी ज्या नेत्यांनी भूमिगत व्हायचा निर्णय घेतला होता, ते पोलिसांना सापडले नाहीत. ते भूमिगत झाले. अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअल्ली, डॉ. राममनोहर लोहिया आदी नेते मुंबईत वेगवेगळ्या जागी लपून राहिले. चार दिवसांनी हे सर्व भूमिगत नेते एकत्र आले आणि पुढील चळवळ चालविण्यासाठी ते गुप्तपणे एकत्र जमून पुढील योजना ठरवू लागले. ११ ऑगस्टला साने गुरुजी गुप्तपणे मुंबईत आले आणि तेही एस्. एम्. राहात असलेल्या 'मूषक महालात' दाखल झाले. भूमिगत अवस्थेत वेषांतर करणे आवश्यक होते. चार दिवसांच्या धावपळीत एस्. एम्. ना दाढी करणेही जमले नव्हते. दाढी वाढलेला आपला चेहरा बदललेला दिसतो, हे त्यांच्या लक्षात आले. गुण्यांची शेरवानी घालताच हे वेषांतर पुरेस आहे असे ठरले. पायजमा, शेरवानी आणि जीना कॅप असा पोषाख करून एस्. एम्. ने एक काळा गॉगल डोळ्यावर ठेवला. ते बोहरी मुसलमानासारखे दिसू लागले. इमाम अल्ली हे टोपण नाव घेऊन या पोषाखात एस्. एम्. यांचे स्वातंत्र्य चळवळीचे भूमिगत कार्य सुरू झाले. काँग्रेसचे 'मध्यवर्ती संचालन केन्द्र' (काँग्रेस सेंट्रल डिरेक्टोरेट) स्थापन करण्यात आले. त्यात सुरुवातीस अच्युतराव पटवर्धन, डॉ. राममनोहर लोहिया आणि अरुणा असफअल्ली हे तिघेचजण होते. पुढे नोव्हेंबर महिन्यात जयप्रकाश नारायण आणि त्यांचे सहकारी हजारीबाग

तुरुंगातून भिंतवरून उड्या मारून बाहेर पळून आले. ते काही दिवसांनी मुंबईत आले. नंतर स्वातंत्र्य लढ्याच्या केन्द्रीय संचालन केन्द्रामध्ये जयप्रकाश नारायण यांचा समावेश झाला. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, रंगराव दिवाकर आणि पुंडलिक कातगडे यांच्याकडे शस्त्रागाराचे काम सोपविण्यात आले. एस्. एम्. जोशी प्रथम महाराष्ट्रातील भूमिगत कार्याला सुव्यवस्थित स्वरूप देण्यासाठी जळगाव, सोलापूर इत्यादी काही ठिकाणी जाऊन आले. बुलेटिन्स लिहिण्याचे काम सुरुवातीस मधू लिमये आणि विनायकराव कुलकर्णी हे करीत. पुढे त्यांनाही मुंबईबाहेर पाठविण्यात आले. साने गुरुजीही गुप्तपणे कार्यकर्त्यांच्या बैठकांना जात आणि परत आल्यावर गुप्त पत्रकांचा स्फूर्तिदायी मजकूर लिहीत. कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनासाठी “क्रांतीच्या मार्गावर” ही ओजस्वी पुस्तिका साने गुरुजींनी ‘मूषक महाला’तच लिहिली. नानासाहेब गोरे हे गुलबर्गा तुरुंगातून सुटल्यावर पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळाले आणि मुंबईला मूषक महालात आले. त्यांनी साने गुरुजींच्या क्रान्तीच्या मार्गावर या पुस्तिकेला उचित आणि प्रभावी प्रस्तावना लिहिली. या पुस्तिकेच्या शेकडो प्रती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पाठविण्यात आल्या. प्रत्येक प्रांतात भूमिगत कामाला हळूहळू वेग येऊ लागला. विदर्भ आणि मध्य प्रांतामध्ये मगनलाल बागडी, श्याम नारायण काश्मिरी, आचार्य दांडेकर यांचे काम चालले होते. गुजरातमध्ये छोटूभाई पुराणिक यांच्या

नेतृत्वाखाली भूमिगत आंदोलन सुरू होते. या सर्व कामांचे एकसूत्रीकरण करण्याची जबाबदारी वेगवेगळ्या नेत्यांवर सोपविण्यात आली. एस्. एम्. जोशी पूर्वी तुरुंगात उर्दू शिकले होते, ते उर्दू बोलू शकत असत. त्यामुळे त्यांना दिल्ली वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंधमध्ये पाठविण्यात आले. इमाम अल्ली हे टोपण नाव, मुस्लिम पद्धतीचा पोषाख आणि फर्ड्या उर्दूमध्ये बोलणे यामुळे एस्. एम्. उत्तर भारतात फिरत असताना पकडले गेले नाहीत. वायव्य सरहद्द प्रांतात त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अल्लाबक्ष हे एका वेळी सिंधचे मुख्यमंत्री होते. त्यांचा काँग्रेसकडे ओढा होता. ब्रिटिश सरकारने त्यांना बडतर्फ केले. अल्लाबक्ष यांची गाठ घेण्यासाठी एस्. एम्. कराचीला आले. त्यांना भेटण्यासाठी अरुणा असफअल्ली यांनी एस्. एम्. यांच्याजवळ पत्र दिले होते. पेशावरहून एस्. एम्. कराचीला पोहोचले. त्याच दिवशी अल्लाबक्ष यांचा त्यांच्या राजकीय विरोधकांनी खून केला. एस्. एम्. उद्विग्न होऊन मुंबईस परत आले.

**प्रति – सरकार**

महाराष्ट्रात महाडच्या मोर्चामध्ये वसंत दाते आणि कमलाकर दांडेकर हे कॉलेज विद्यार्थी पोलीस गोळीबारात ठार झाले. नेरळचे धडाधडीचे कार्यकर्ते भाई कोतवाल यांनी ठाणे जिल्ह्यात सिद्धगडावर आदिवासींना संघटित करून काही गावांमध्ये प्रति-सरकार स्थापन केले. पुढे सरकारने

सिद्धगडाला वेढा घातला आणि भाई कोतवाल ब्रिटिश अधिकाऱ्यांशी समोरासमोर लढताना गोळीबारात मारले गेले. अनेक ठिकाणी निर्भय कार्यकर्ते हुतात्मे झाले. सातारा, सांगली भागात क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी गनिमी काव्याने सरकारशी लढा देत प्रति — सरकार — पॅरलल् गव्हर्न्मेंट स्थापन केले. बंगालमध्ये मिदनापूर, उत्तर प्रदेशात बालिया येथेही असेच प्रयत्न झाले. परंतु ते काही काळच टिकले. साताराचे स्वातंत्र्यसैनिक मात्र सरकारपुढे नमले नाहीत. तेथील प्रतिसरकार १९४५ अखेरपर्यंत चालू राहिले. डॉ. लोहिया यांच्याभोवती मुंबईत गोळा झालेल्या विठ्ठल जव्हेरी, उषा मेहता या कॉलेज विद्यार्थ्यांनी स्वतंत्र भारताचा रेडिओ सुरू केला. अच्युतराव पटवर्धन, अरुणाबाई, डॉ. लोहिया यांची भाषणे, क्रांतीची स्फूर्तिदायक गाणी, देशभराच्या स्वातंत्र्य संग्रामातील घटनांची माहिती आदी कार्यक्रम या रेडिओवरून नियमाने होत. पुण्यामध्ये कॅन्टोन्मेंटमध्ये कॅपिटॉल या सिनेमा थिएटरमध्ये बॉम्बचा स्फोट होऊन नऊ ब्रिटिश सोल्जर्स ठार झाले. पुण्यात या क्रांतिकारी तरुणांचे नेतृत्व शिरुभाऊ लिमये करीत होते. शिरुभाऊंना पकडण्यासाठी सरकारने खूप धडपड करूनही ते सापडले नव्हते. परंतु १८ एप्रिल १९४३ ला मुंबई पोलिसांनी 'मूषक महाला'वर छापा घालून शिरुभाऊ लिमये, नानासाहेब गोरे, साने गुरुजी आणि माधव लिमये आदींना पकडले.

यानंतर काही दिवसांनी ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस भूमिगत चळवळीतल्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. बैठकीस जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया, अरुणा असफअल्ली, एस्. एम्. जोशी हे हजर होते. स्वातंत्र्य आंदोलनाचा जोर ओसरला होता. हजारो लोक तुरुंगात होते. भूमिगत चळवळीतीलही अनेक जण पकडले गेले होते. अनेकांवर खटले चालू होते. अरूणाबाई त्या दिवशी फारच खिन्न होत्या. बैठकीच्या सुरुवातीस त्यांच्या क्षेत्रातील कामाचा आढावा घेताना त्यांच्या बोलण्यात निराशेचा सूर उमटला. त्यांचे बोलणे पुरे झाल्यावर जयप्रकाश नारायण यांनी बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, "आपल्या लढ्याचा एक अध्याय संपला आहे हे खरे, परंतु दुसरा सुरू होण्याची शक्यता नक्कीच आहे. तुम्हाला माहीत आहे ना की सुभाषचंद्र बोस जर्मनीहून पाणबुडीने हजारो मैल समुद्र ओलांडून ६ मे ला पूर्वेकडे सेवान इथे पोहोचले आणि नंतर ते १६ मे ला टोकिओला पोहोचले. तेथे त्यांनी ब्रिटिश सेनेतील जे भारतीय लष्करी अधिकारी आणि जवान जपानच्या ताब्यात कैदी होते त्यांना एकत्र करून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी लढण्याचे आवाहन केले आणि सुभाषबाबूंनी या भारतीय लष्करी अधिकाऱ्यांची आणि जवानांची आझाद हिंद फौज स्थापन झाल्याची घोषणा चारच दिवसांपूर्वी रंगून येथे केली. हे जाहीर केल्यावर सरसेनापती या नात्याने या सेनेला उद्देशून भाषण करताना सुभाषबाबूंनी 'चलो दिल्ली' ही

स्फूर्तिदायी घोषणा केली आहे. आपला भारतातील स्वातंत्र्य लढा ज्या वेळी जोरात होता, त्या वेळी हे घडावयास हवे होते. परंतु मला अशी खात्री वाटते की सुभाषबाबूंची आझाद हिंदसेना जेव्हा भारतात प्रवेश करील तेव्हा आपण पुन्हा प्रचंड उठाव करू. यासाठी आपल्याला तयारी केली पाहिजे. देशाच्या सर्व ठिकाणचे कार्यकर्ते मणिपूरकडे न्यावयाचे आणि भारताच्या ईशान्य आणि पूर्व भागात 'आझाद दस्ते' उभे करायचे, असा माझा इरादा आहे. आता आपण या कामाला लागले पाहिजे. पावसाळा संपला की कोहिमामार्गे मी गुप्तपणे ब्रह्मदेशात जाऊन सुभाषबाबूंना भेटेन आणि नंतर काय करावयाचे ते आपण ठरवू.' जयप्रकाश नारायण यांनी दिलेल्या माहितीमुळे बैठकीचा रंगच पालटला. एस्. एम्. म्हणाले की, लांब काळोख्या बोगद्यातून बाहेर यावे आणि उजेड दिसावा असे वाटले. जयप्रकाशजींनी १ सप्टेंबरला 'सर्व स्वातंत्र्य सैनिकांस पत्र' यामध्ये सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेची ही माहिती दिली. १८ सप्टेंबरला एस्. एम्. जोशी, मधू लिमये आणि विनायकराव कुलकर्णी या तिघांना त्यांच्या नळबाजारातील दलाल बिल्डिंग या निवासस्थानी पोलिसांनी अटक केली आणि सप्टेंबर महिन्यातच फ्रॉंटिअर मेलमधून प्रवास करीत असताना जयप्रकाश नारायण यांनाही पकडण्यात आले.एस्. एम्. यांना अटकेनंतर मुंबईस पोलिस लॉक अप्‌मध्ये ठेवले. एक वर्षभरच्या भूमिगत जीवनात एस्. एम्. यांना विविध प्रकारचे अनुभव आले. नंतर

चळवळ संपल्यावर एकदा ते आम्हांला सांगत होते, ‘भूमिगत असताना स्वातंत्र्य लढ्याबद्दल लोकांना जी आपुलकी होती त्यामुळे मला अपार प्रेम मिळाले. अनपेक्षित मदत मिळाली.’ एस्. एम्. एकदा म्हणाले, ‘गांधीजींचा उपास चालू असताना आम्हा भूमिगतांची जी तडफड झाली ती आजही आठवते. गांधीजींच्या उपासाच्या दहाव्या दिवशी पुण्याहून असा निरोप आला की गांधीजी आता केवळ काही तासांचे सोबती आहेत. जयप्रकाशजी अच्युतरावांना म्हणाले, ‘भूमिगत चळवळ चालवणाऱ्यांसाठी आणि आम जनतेसाठी ताबडतोब काहीतरी लिहिले पाहिजे.’ या बुलेटिनचा इंग्रजी मसुदा अच्युतराव पटवर्धनांनी आणि मराठी मसुदा साने गुरुजींनी लिहावा असे ठरले. दोघेही लिहायला बसले पण दोघांनाही अश्रू आवरत नव्हते. गांधीजी हयात नाहीत, ही कल्पनाही आम्हां सर्वांना असह्य होत होती. सुदैवाने दुसऱ्या दिवशी गांधीजींच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याची बातमी आली आणि आमच्या मनावरचे ओझे उतरले.’

## महाराष्ट्र कटाचा खटला

एस्. एम्. यांना काही दिवसांनी मुंबईला आर्थर रोड तुरुंगात पाठविण्यात आले. पुण्यात कॅपिटॉल बॉम्ब खटला प्रथम सुरू झाला. सरकारने महाराष्ट्र कटाचा खटलाही भरण्याचे ठरविले. या खटल्यात शिरुभाऊ लिमये, एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, साने गुरुजी आदींना आरोपी

करण्यात आले. परंतु पुरेसा पुरावा न मिळाल्यामुळे तो खटला उभाच राहिला नाही. पुढे एस्. एम्.ना नाशिक तुरुंगात पाठवण्यात आले. तेथे नानासाहेब गोरे आणि साने गुरुजी त्यांच्या समवेत होते. तेथे गोकुळाष्टमीला साने गुरुजींनी राजबंद्यासमोर कीर्तन केले. त्या दिवशी एस्. एम्. यांनी त्यांच्या दैनंदिनीत लिहिले, “आज गोकुळाष्टमीचा दिवस. अनेकांनी उपास केला. मी मात्र केला नाही, तरीपण माझे मन प्रसन्न आहे. साने गुरुजींचे कीर्तन फार सुंदर झाले. गुरुजींना गाता येत नाही, पण काय तन्मयता. जणू गंगेचा प्रवाहच चालला आहे. माझ्या भावना आज अगदी उचंबळून आल्या. मी अत्यंत भाविकपणे साने गुरुजींच्या पायावर डोके ठेवले. माझ्या डोळ्यांत अश्रू आले. शेवटी आरतीच्या भजनाला तर तल्लीनतेने मी नाचलोदेखील. लोकांना आश्चर्य वाटले. मला वाटले मी भावुक म्हणून असे झाले. पण कीर्तनानंतर बराकीत परत येताना नानासाहेब गोरेही म्हणाले, की साने गुरुजींच्या कीर्तनामध्ये आणि वक्तृत्वामध्ये शुचितेकडे नेण्याची विलक्षण शक्ती आहे. आमचे साने गुरुजी म्हणजे निर्मळ प्रेमाचा समुद्रच. नाशिक, साबरमती आणि येरवडा कॅम्प जेल अशा तीन तुरुंगांचा अनुभव दोन वर्षे घेत अखेर १८ सप्टेंबर १९४५ला एस्. एम्.ची अन्य सहकाऱ्यांच्या समवेत तुरुंगातून मुक्तता झाली.

## फाळणीचे अग्निदिव्य

एस्. एम्. १९४७च्या जुलैमध्ये केलेल्या एका भाषणात म्हणाले. '१९४५ साली आम्ही समाजवदी जेलमध्ये होतो. तरी मन निराश नव्हते. परंतु सुटका झाल्यावर देशातील हिंदु-मुसलमान दंगे, नोआखली आणि बिहारमधील रक्तपात, यामुळे मन फार खिन्न झाले. ४ जुलै १९४६ मुंबईला अ. भा. काँग्रेस कमिटीची बैठक झाली. त्या वेळी त्या बैठकीत जयप्रकाश नारायण आणि युसूफ मेहेरअल्ली या समाजवादी नेत्यांनी देशाच्या फाळणीस कडाडून विरोध केला. परंतु आम्ही अल्पमतात होतो. त्रिमंत्री योजनेचा ठराव मंजूर झाला त्या वेळी म. गांधींनाही देशाची फाळणी होणे मंजूर नव्हते. मे १९४७ पर्यंत गांधीजी हे फाळणी अपरिहार्य मानीत नव्हते. परंतु ४ जूनला प्रार्थनेच्या वेळी ते म्हणाले, 'देशाच्या विभाजनाची योजना काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांनी मान्य केली आहे. मी काँग्रेसचा सेवक असल्यामुळे काँग्रेस विरुद्ध बंड करणार नाही.' यानंतर आम्हां समाजवाद्यांपैकी जयप्रकाश नारायण आणि डॉ. लोहिया यांनी गांधीजींची भेट घेऊन विचारले, 'आपण पूर्वी फाळणीस विरोध केला असताना आता मान्यता का देत आहात?' यावर गांधीजी म्हणाले, 'माझे आजपर्यंतचे निकटचे लोक मला सोडून गेल्यानंतर तुमच्यांतून नवे नेतृत्व घेऊन, फाळणीच्या विरोधात संघर्ष उभा करण्याइतकी शक्ती आता माझ्यापाशी उरलेली नाही.'

एस्. एम्. पुढे त्यांच्या भाषणात म्हणाले, ‘देशाची फाळणी झाली याचे आम्हां समाजवाद्यांना तीव्र दुःख होते आणि आहे. फाळणीच्या विरोधी शक्ती आम्ही संघटित करू शकलो नाही, ही आमची कमजोरी आहे. फाळणी हा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत निर्माण झालेल्या राष्ट्रवादी शक्तींचा पराभव आहे.’

एस्. एम्. जोशी हे दलप्रमुख म्हणून पुन्हा काम करू लागले. राष्ट्र सेवा दलाच्या अनेक कार्यकर्त्यांनी १९४२च्या स्वातंत्र्य संग्रामात धैर्याने काम केले. भूमिगत चळवळीत, तसेच मोर्चांमध्ये आणि सत्याग्रहात भाग घेतला. त्यामुळे अनेक तरुण राष्ट्र सेवादलाकडे आकृष्ट झाले. या सैनिकांचा एक भव्य मेळावा घ्यावा, असे एस्. एम्. यांनी ठरविले. त्याप्रमाणे सातारा येते १९४६ ला राष्ट्र सेवादलाचा प्रचंड मेळावा भरला. सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेतील एक वीर कॅ. शहानवाजखान सातारा मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. एस्. एम्. यांनी तरुणांना राष्ट्र सेवादलाचे, राष्ट्रीयत्वाचे आणि समतेचे संस्कार समाजातील विद्यार्थिविद्यार्थिनींच्यावर करण्याचे आवाहन केले.

## स्वातंत्र्याची मंगलप्रभात

१५ ऑगस्ट १९४७ बद्दल एस्. एम्. जोशींनी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे, “स्वातंत्र्य प्राप्तीच्या क्षणी मी पुण्यात होतो. मी, अजेय आणि ताराबाई पोलिस ग्राऊंडवर

झालेल्या सरकारी ध्वजवंदनाचा सोहळा पाहण्यासाठी गेलो होतो. अजेय त्यावेळी सात वर्षांचा होता. आम्ही इतरांप्रमाणे गर्दीत उभे राहूनच तो सोहळा पहात होतो. स्वातंत्र्य सैनिक म्हणून मला खास निमंत्रण नव्हते. गर्दीत उभे राहून अजेयला समारंभ दिसत नव्हता. म्हणून मी त्याला उचलून धरले आणि त्याला ते दृश्य दाखविले. स्वतंत्र भारताचा तो पहिला स्वातंत्र्यदिन. ध्वजवंदनाचा समारंभ जनसागराच्या वेढ्यात राहून बघत असताना माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले.”

# प्रकरण ३

# फावडे, तुरुंग आणि मतपेटी

स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी भारतात अस्थिरता होती. फाळणीच्या वेळच्या भीषण रक्तपातामुळे लक्षावधी नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त झाल्यामुळे जनता कमालीची अस्वस्थ होती. या कालखंडात भारतातील संस्थानिकांपैकी अनेकांची भूमिका राष्ट्रीय एकात्मतेस विरोधी होती. परंतु सरदार पटेल हे केन्द्रशासनात गृहमंत्री होते. त्यांनी संस्थानांचे विलीनीकरण घडवून आणले. याच काळात काश्मीरवर पाकिस्तानने हल्ला केला. परंतु भारतीय सेना आणि काश्मीरची जनता हे एकत्र आल्यामुळे पाकिस्तानचा काश्मीर जिंकण्याचा दुष्ट हेतू साध्य झाला नाही. त्या वेळी संपूर्ण काश्मीर भारतीय लष्कराला जिंकणे सहज शक्य होते. परंतु पंतप्रधान पं. नेहरूंनी युद्धबंदी स्वीकारली आणि काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्याच ताब्यात राहिला. या सर्व प्रचंड उलथापालथी होत असताना एस्. एम्. आणि त्यांचे सहकारी फार अस्वस्थ होते. परंतु ते कोणत्याही सत्तास्थानावर नसल्यामुळे देशापुढच्या विविध समस्यांबाबत भाषणांतून आणि लेखांतून मते मांडणे इतकेच त्यांना शक्य होते.

**म. गांधींची हत्त्या**

कलकत्त्यामध्ये ज्या वेळी हिंदू आणि मुसलमान यांच्यात भीषण दंगल झाली त्या वेळी गांधीजी तेथे गेले आणि खूप प्रयत्न करून त्यांनी दंगल शमवली. १५ ऑगस्टला ज्या वेळी देशभर स्वातंत्र्यदिनानिमित्त जल्लोष सुरू होता त्या वेळी गांधीजी कलकत्त्यातील एका झोपडपट्टीत राहात होते. तेथील दंगल त्यांनी थांबविली होती. तरी त्यांचे अंतःकरण विदीर्ण झाले होते. देशाची फाळणी आपण टाळू शकलो नाही, हा त्यांना व्यक्तिशः त्यांचा फार मोठा पराभव वाटत होता. त्यांचे हिंदू – मुस्लिम ऐक्याचे स्वप्न भग्न झाले होते. तरीही हे ऐक्य भारतात घडवून आणण्याचा गांधीजींचा निर्धार कायम होता. हिंदुत्ववादी पक्ष आणि कार्यकर्ते मात्र फाळणीबद्दल गांधीजींनाच सर्वस्वी जबाबदार धरीत होते. म. गांधींच्या विरोधी ही भावना महाराष्ट्रात पराकोटीला पोहोचली होती. अखेर याचा स्फोट होऊन नथुराम गोडसेने ३० जानेवारी १९४८ ला म. गांधींवर दिल्लीत गोळ्या झाडून त्यांची, ते प्रार्थनास्थळाकडे जात असताना, हत्त्या केली. एस्. एम्. जोशींना आणि त्याच्या सहकाऱ्यांना ही बातमी ऐकून जबरदस्त धक्का बसला. हिंदुत्ववादी मंडळींच्या विरुद्ध महाराष्ट्रात संतापाचा आगडोंब उसळला आणि अनेक ठिकाणी त्यांची घरे जाळण्यात आली. या वेळी राष्ट्र सेवादलातील अनेक ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी जाळपोळ

थांबविण्याचे प्रयत्न केले. सिद्धप्पा रानगे या एस्. एम्. जोशींच्या निष्ठावान अनुयायाने कोल्हापूरला स्वतःचा जीव धोक्यात घालून काही हिंदुत्ववादी व्यक्तींचे प्राण आणि घरे वाचविली. एस्. एम्. जोशी यांनी त्या वेळी राष्ट्र सेवादलाच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना म. गांधींच्या हत्येचा तीव्र निषेध केला. ती करणाऱ्या गोडसेंच्या रूपाने जी विकृत दृष्ट मनोवृत्ती व्यक्त झाली तिच्यावरही कठोर टीका केली आणि त्याचबरोबर जाळपोळीचाही निषेध केला. निरपराध व्यक्तींना वाचविण्यासाठी कोल्हापूरच्या सिद्धप्पा रानगेने आणि महाराष्ट्रातील राष्ट्र सेवादलाच्या ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांनी जे काम केले त्याबद्दल एस्. एम्. यांनी समाधान आणि अभिमान व्यक्त केला. साने गुरुजींनी या वेळी एकवीस दिवस उपोषण केले, तेव्हा एस्. एम्. म्हणाले, ‘साने गुरुजींच्या भावनेची तीव्रता आणि त्यांनी आत्मशुद्धीसाठी केलेले उपोषण यामुळे मी अंतर्मुख झालो. साने गुरुजींच्या उपोषणातून राष्ट्र सेवादलातील आम्हां सर्वांच्याच भावना व्यक्त झाल्या. त्यांनी आत्मक्लेषाचा जो मार्ग स्वीकारला त्यामुळे माझ्या मनातील किल्मिष धुवून गेले. आमच्या मनाला शुचितेचा पवित्र स्पर्श झाला.’

## समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर

स्वातंत्र्य मिळेपर्यंत काँग्रेस समाजवादी पक्ष आणि अनेक डाव्या विचारांचे कार्यकर्ते काँग्रेसमध्ये राहूनच काम

करीत होते. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात काँग्रेस हे एक व्यापक राष्ट्रीय व्यासपीठ होते. या व्यासपीठावर विविध राजकीय नेते असणारे देशभक्त नेते एकत्र आले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही दिवसांनी काँग्रेसने पूर्वीच्या घटनेत बदल करून काँग्रेस अंतर्गत संघटित गट वेगळा राहू शकणार नाही, असा निर्णय घेतला. यामुळे काँग्रेस समाजवादी पक्ष आणि शेतकरी कामगार पक्ष यांना आपले संघटित अस्तित्व विसर्जित करावयाचे, का काँग्रेसबाहेर पडावयाचे, याचा निर्णय घेणे भाग होते. १९४८ च्या मे महिन्यात काँग्रेस समाजवादी पक्षाचे नाशिक येथे अखिल भारतीय अधिवेशन झाले. तिथे या प्रश्नांची दीर्घकाल चर्चा करण्यात आली आणि अखेर समाजवादी पक्ष म्हणून यापुढे स्वतंत्रपणे काम करण्याच निर्णय घेण्यात आला. एस्. एम्. चे या परिषदेतील भाषण फार प्रभावी झाले. ते म्हणाले, ‘स्वातंत्र्य संग्रामाचा वारसा हा अमोल आहे. तो आमच्यापासून कोणी हिरावून घेऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे म. गांधींच्या विचारांचा आमच्या मनावर झालेला संस्कारही आम्हांला फार पवित्र वाटतो. तो आम्ही जतन करू.’ जयप्रकाश नारायण यांनी नव्याने स्थापन होणाऱ्या समाजवादी पक्षाचे सरचिटणीस पद स्वीकारताना केलेले भाषणही अत्यंत हृदयस्पर्शी होते. ते म्हणाले, “मी एका वेळी मार्क्सवादी होतो. परंतु लाहोर तुरुंगात मी जे चिंतन केले, डॉ. लोहियांबरोबर मी जी दीर्घकाल चर्चा केली त्यामुळे

आपल्याला मार्क्सच्या तत्त्वज्ञानापलीकडे गेले पाहिजे, अशा निष्कर्षाप्रत मी आणि डॉ. लोहिया आलो. म. गांधींचे विचार एका बाबतीत मार्क्सपेक्षा मूलतः भिन्न आहेत. मार्क्सच्या मते आपले साध्य उदात्त असेल तर कोणतीही साधने वापरून ते प्राप्त करून घेतले पाहिजे. या उलट म. गांधींची अशी भूमिका आहे की, साध्य आणि साधने ही एकमेकांना अनुरूपच असली पाहिजेत. साध्य उदात्त असेल तर साधनेही शुद्ध असली पाहिजेत. हा म. गांधींचा साधनशुचितेचा विचार मला मनोमन पटला. समाजवादी पक्ष या साधनशुचितेचे कटाक्षाने पालन करील.” एस्. एम्. जोशी यांनी या परिषदेनंतर पुण्यामध्ये केलेल्या भाषणात साधनशुचितेच्या भूमिकेचे जोरदार समर्थन केले.

## नवी राज्यघटना

१९४६ साली स्थापन झालेल्या घटना समितीने दीर्घकाल चर्चा करून भारताची राज्यघटना १९५० मध्ये संमत केली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेन्द्र प्रसाद हे होते आणि घटनेचा अंतिम मसुदा तयार करण्याच्या समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. २६ जानेवारी १९५० ला नवी राज्यघटना अस्तित्वात आली आणि भारत हे सार्वभौम लोकशाहीवादी प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले.

राष्ट्र सेवादलाच्या कार्यकर्त्यांसमोर भारतीय राज्यघटनेवर बोलताना एस्. एम्. म्हणाले, ‘आपल्या राज्यघटनेचा राष्ट्र सेवादलाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी अभ्यास केला पाहिजे. यासाठी तज्ज्ञांची बौद्धिके आपण आयोजित करू. आपल्या राज्यघटनेचा सरनामा (प्रीअम्बल) फार महत्त्वाचा आहे. कारण भारताच्या भविष्यातील चित्राला आधारभूत असणाऱ्या तत्त्वांचा या सरनाम्यामध्ये उल्लेख आहे. या घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत हक्क तुम्ही सर्वांनी समजून घेतले पाहिजेत.’ एस्. एम्. यांची या विषयावरील तीन व्याख्याने फारच उद्‌बोधक होती. एस्. एम्. म्हणाले, ‘नव्या राज्यघटनेत २१ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे ही घटना आपण सर्व नागरिकांनी आपणालाच अर्पण केली आहे. यापूर्वी येथे राजेशाही होऊन गेली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच्या हाताखाली अष्टप्रधान नेमले. परंतु अशोक, समुद्रगुप्त, शालिवाहन, अकबर, छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व सार्वभौम सत्ताधारी राजे होते. नव्या राज्यघटनेप्रमाणे मतदार हे सार्वभौम आहेत. ते प्रतिनिधी निवडणार आहेत. या लोकप्रतिनिधींमध्ये ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळेल, तो सत्ताधारी होईल. केन्द्रीय मंत्रिमंडळ लोकसभेला आणि राज्याचे मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार असेल. लोकसभेतील आणि विधानसभेतील लोकप्रतिनिधींची निवड

मतदार करणार असल्यामुळे मतदार हेच सार्वभौम राहतील.' एस्. एम्. पुढे म्हणाले,'घटनासमितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना सादर करताना केलेले भाषण मला फार महत्त्वाचे वाटते. ते म्हणाले की आपण राजकीय लोकशाही स्वीकारीत आहोत, परंतु याच्या जोडीला आपल्या देशात सामाजिक आणि आर्थिक समता नसेल तर लोकशाही प्रभावी होऊ शकणार नाही. सामाजिक आणि आर्थिक समतेचे अधिष्ठान असलेली लोकशाही आपण भारतात निर्माण केली पाहिजे.' एस्. एम्. भाषणाच्या शेवटी म्हणाले, "आर्थिक आणि सामाजिक विषमतेचे निर्मूलन हे आपल्यापुढील आव्हान आहे."

## सानेगुरुजी सेवापथक

११ जून १९५०ला साने गुरुजींनी त्यांची जीवनयात्रा संपवली. एस्. एम्. आणि त्यांचे सर्व सहकारी यांना फार दुःख झाले. साने गुरुजींनी मृत्यूपूर्वी मे महिन्यात राष्ट्र सेवादलाच्या शिबिरात जे भाषण केले होते त्यामध्ये 'श्रमदान पथक' ही कल्पना विस्ताराने मांडली होती. लोकांनी श्रम करून अनेक विधायक कामे केली पाहिजेत असा विचार साने गुरुजींनी मांडला होता. साने गुरुजींच्या निधनानंतर एस्. एम्. जोशी यांनी साने गुरुजींची स्मृती जागृत ठेवण्यासाठी त्यांच्या कल्पनेप्रमाणे साने गुरुजी सेवापथक सुरू केले. राष्ट्र सेवादलाचे ५० सर्ववेळ कार्यकर्ते एक वर्षभर

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी साने गुरुजी सेवापथकाची केन्द्रे चालवीत होते. एस्. एम्. स्वतः अनेक केन्द्रांवर गेले. ज्ञान आणि श्रम यांच्या साहाय्याने राष्ट्रनिर्मिती करणे, हीच साने गुरुजींना खरी श्रद्धांजली आहे, असे एस्. एम्. सतत सांगत. साने गुरुजी सेवापथकाच्या या प्रयोगास महाराष्ट्रातून उत्तम पाठिंबा मिळाला. एस्. एम्. यांना राष्ट्र सेवादलात काम करताना साफल्य वाटे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि तेजस्वी विचारांमुळे तरुण प्रभावित होत.

राष्ट्रसेवादलाच्या सैनिकांप्रमाणेच समाजवादी पक्षातील कार्यकर्त्यांनाही एस्. एम्. सतत मार्गदर्शन करीत. १९५२ साली नव्या राज्यघटनेनुसार पहिल्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या, तेव्हा महाराष्ट्रात समाजवादी पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रिपब्लिकन पक्षाबरोबर निवडणुकीत सहकार्य करण्याचे ठरविले. हा करार घडवून आणण्यासाठी समाजवादी पक्षाचे नेते म्हणून एस्. एम्. जोशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भेटले. या भेटीचा वृत्तांत एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत विस्ताराने लिहिला आहे. एस्. एम्. यांनी लिहिले आहे.

"बाबासाहेबांनी मला प्रश्न केला, 'काय रे, तू मार्क्सिस्ट आहेस का?' मी यावर मार्क्सचे कोणते सिद्धांत मला पटतात, ते सांगू लागलो. तेव्हा मला थांबवून ते म्हणाले, 'हे सैद्धान्तिक प्रतिपादन करण्यात काही तात्पर्य

नाही. तुला एक प्रश्न विचारतो त्याचे उत्तर दे. समज तुझा पक्ष उद्या सत्तेवर आला तर दुसऱ्या पक्षांना काम करू देणार की नाही?' मी म्हणालो, 'देणार.' यावर ते चटकन म्हणाले, 'म्हणजे तू मार्क्सिस्ट नाहीस." डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणाले, "मार्क्सला जी श्रमिकांची क्रांती अभिप्रेत आहे तशा प्रकारची क्रांती येथे होण्याची शक्यता मला मुळीच दिसत नाही. कारण येथील समाज आणि युरोपातील समाज यात फरक आहे. युरोपात केवळ वर्गीय समाज आहे. येथे वर्गाबरोबर वर्णही आहेत."

'हे अगदी खरे आहे', मी म्हणालो. बाबासाहेब पुढे सांगू लागले. श्रमजीवींची रशियासारखी क्रांती घडून आणावयाची हे ध्येय असले, तर खरे श्रमिक आम्हीच आहोत. अनुसूचित जाती आणि जमाती याच खऱ्या श्रमिक आहेत. 'श्रमिकांना आपल्या श्रृंखलांव्यतिरिक्त काहीही गमवावे लागणार नाही; असे जे मार्क्स सांगतो ते अनुसूचित जातींच्या बाबतीत दुपटीने खरे आहे. अनुसूचित जातींना सामाजिक विषमतेची श्रृंखला आणि आर्थिक विषमतेची श्रृंखला अशा दोन श्रृंखलांचा जाच सहन करावा लागतो. तेव्हा या लोकांना घेऊन मार्क्स म्हणतो तशी क्लासिकल क्रांती आपल्याला करता येणार नाही हे मी ओळखले आहे. दरडोई एक मत देण्याचा माझा हेतू हाच आहे. लोकांचे मतपरिवर्तन करीत रहाणे, त्यांचे शिक्षण करणे, याच मार्गाने

आपल्याला जावे लागेल. हा रस्ता बराच दूरचा आहे. परंतु याशिवाय दुसरा रस्ता नाही.'

डॉ. आंबेडकरांचे हे शब्द मला नेहमी आठवतात, असे एस्. एम्. यांनी त्या विवेचनाच्या अखेरीस लिहिले आहे.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी अशोक मेहता हे समाजवादी पक्षाचे निवडणूक – सूत्रधार होते. त्यांची समाजवादी पक्षाच्या लोकप्रियतेबद्दलची कल्पना भ्रामक आणि अवास्तव होती. त्यांच्या आग्रहामुळे देशात सर्व राज्यांमध्ये समाजवादी पक्षाने आपले उमेदवार उभे केले आणि त्यांचा प्रचंड पराभव झाला. एस्. एम्. जोशी यांना पुण्यातून लोकसभेसाठी उभे करण्यात आले. डिफेन्स वर्कर्सच्या ट्रेड युनियन्सचे नेतृत्व एस्.एम्.करीत होते. या ट्रेड युनियन्समध्ये ५० हजार कामगार होते. अशोक मेहतांचे गणित असे होते की या कामगारांच्या घरातील मते व अन्य मते मिळून दोन लाख मते मिळतील. हे गणित साफ चुकले. एस्. एम्. यांना फक्त ३४ हजार मते मिळाली. काकासाहेब गाडगीळ हे काँग्रेसचे उमेदवार होते. ते १ लाख २६ हजार मते मिळवून विजयी झाले. केशवराव जेधे हे शेतकरी कामगार पक्षातर्फे उभे होते. त्यांचा दुसरा क्रमांक आला. त्यांना ४२ हजार मते मिळाली. पं. नेहरूंच्या तेजोवलयांकित व्यक्तिमत्त्वाचा काँग्रेसला फायदा झाला. कम्युनिस्ट पक्षाने जेथे त्या पक्षाचे काम होते अशा निवडक मतदार संघातून उमेदवार उभे केले. त्यांचे धोरण यशस्वी झाले. लोकसभेत

काँग्रेसला प्रचंड बहुमत होते आणि कम्युनिस्ट पक्ष दुसऱ्या क्रमांकावर होता. महाराष्ट्र विधानसभेतही काँग्रेसला मोठे बहुमत मिळाले. समाजवादी पक्षाला मुंबई प्रांतामध्ये फक्त ९ जागा मिळाल्या.

## तुरुंग आणि मतपेटी

यानंतर काही दिवसांनी अन्नधान्याची टंचाई, शिधावाटप केन्द्रांतून मिळणारे खराब धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाढते भाव यांविरुद्ध एस्. एम्. यांनी सत्याग्रह करण्याचे ठरविले. मे महिन्यात झालेल्या या सत्याग्रहाचे नेतृत्व एस्. एम्. यांनी केले. आणि महाराष्ट्रभर हा सत्याग्रह गाजला. अनेक स्त्री-पुरूष कार्यकर्त्यांनी या सत्याग्रहात भाग घेतला. एस्. एम्. यांना दोन महिन्यांची शिक्षा झाली. यानंतर काहीच दिवसांनी पुण्यातून शुक्रवार पेठ वॉर्डातून विधानसभेवर निवडून गेलेल्या बाबासाहेब घोरपडे यांची लोकसेवा आयोगावर नियुक्ती झाल्यामुळे या जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली. समाजवादी पक्षातर्फे एस्. एम्. जोशी यांना उभे करण्यात आले. काँग्रेसचे उमेदवार थोर शिक्षणतज्ज्ञ बाबुराव जगताप हे होते. निवडणूक जाहीर होऊन एस्. एम्. यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या वेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती. ती अधिकच बिघडली आणि एस्. एम्. यांना ससून हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. एस्. एम्. स्वतः प्रचारासाठी नसताना समाजवादी पक्षाच्या

पुण्यातील कार्यकर्त्यांनी नेटाने प्रचारकार्य केले आणि एस्. एम्. विजयी झाले. एस्. एम्. यांच्या या विजयानंतर समाजवादी पक्षाचे थोर विचारवंत नेते डॉ. लोहिया त्यांचे अभिनंदन करण्यासाठी पुण्यामध्ये आले. अभिनंदनासाठी जमलेल्या कार्यकर्त्यांच्या सभेत डॉ. लोहिया म्हणाले, 'मी मे महिन्यात समाजवादी पक्षाच्या पंचमढी येथील अधिवेशनात असे म्हणालो होतो की, भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी आपल्याला फावडे, तुरुंग आणि मतपेटी असा त्रिशूल वापरावा लागेल. एस्. एम्. जोशी यांनी सानेगुरुजी सेवापथक सुरू करून शेकडो तरुणांना फावडे वापरून विधायक काम करायला लावले. धान्य भाव वाढीच्या विरोधात सत्याग्रह करून एस्. एम्. अनेक कार्यकर्त्यांना घेऊन तुरुंगात गेले आणि या पोटनिवडणुकीत लोकशिक्षण करून मतपेटीद्वारा ते लोकप्रतिनिधी झाले. म्हणजे मी सांगितलेला त्रिशूल एस्. एम्. ने प्रभावीपणे वापरला. मी मांडलेला विचार एस्. एम्. यांनी साकार केला. या त्रिशूलाबद्दल आज आपण त्यांचा गौरव करीत आहोत. समाजवादी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी हा त्रिशूल वापरून नवभारताची निर्मिती करावयाची आहे —

प्रकृती सुधारताच एस्. एम्. नी आमदार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी विधानसभेत अनेक प्रश्न विचारून सरकारला धारेवर धरले. त्या वेळचे महसूलमंत्री भाऊसाहेब हिरे, एस्. एम्. यांना म्हणाले, 'एस्. एम्., तुम्ही

इतके प्रश्न आणि तेही ग्रामीण भागातले – अगदी दुर्गम अशा खेड्यातले, विचारता याचं मला आश्चर्यच वाटतं.' एस्. एम्. जोशी सतत दौरे करीत. साने गुरुजी सेवापथकामुळे ग्रामीण भागातील तरुण कार्यकर्ते त्यांना फार मानीत आणि त्यांच्या अडचणीही ते सांगत. त्यामुळेच त्यांच्याबद्दलचे प्रश्न विचारणे एस्. एम्. यांना शक्य झाले. ते हिरे यांना कसे समजणार?

त्या वेळीही अंदाजपत्रकात 'मुख्यमंत्री निधी' असे. मुख्यमंत्र्यांना जनतेला साहाय्य करण्यासाठी अनामत म्हणून कुठलाही तपशील न देता, प्रचंड रक्कम देण्याची तरतूद अंदाजपत्रकात करण्यास एस्. एम्. यांनी आक्षेप घेतला. त्या वेळचे विधानसभेचे सभापती नानासाहेब कुंटे यांनी हा आक्षेप मान्य केला आणि अंदाजपत्रकातील ही मागणी वगळावयास सांगितली. हा विरोधी पक्षाने मिळविलेला विजय होता. एस्. एम्. यांच्या दक्षतेमुळे हे घडू शकले. एस्. एम्. विधानसभेचे अधिवेशन संपल्यांवर समाजवादी पक्षातील कार्यकर्त्यांचे बौद्धिक घेताना म्हणाले, 'विधानसभेत काही आमदार उत्तम वक्ते होते. काही आमदारांनी कामकाजांच्या नियमांचा अभ्यास केला असल्यामुळे त्यांना लक्षवेधी सूचना, हक्कभंग आदी संसदीय आयुधे प्रभावीपणे वापरता येत. मी सभागृहाचे नियम नीट वाचले होते. परंतु तेवढ्यावर माझे समाधान नव्हते. तुमच्यामार्फत माझा चळवळीशी जो संबंध होता त्याचे प्रतिबिंब माझ्या असेंब्लीतील कामात उमटले. विधानसभेतील कामकाज म्हणजे नुसती भाषणे, चर्चा नाही.

तो राजकीय चळवळीचा सत्ता – संघर्षाचा भाग आहे. हे मी कधी विसरलो नाही. असेंब्लीतील काम आणि जनतेतील चळवळी यांचा अतूट संबंध आहे. तुम्ही समाजवादी कार्यकर्ते संघर्ष करता म्हणून मी विधानसभेत यशस्वी होतो. यशाचे मानकरी तुम्ही आहात. अन्यायाविरुद्ध लढणारी जनता हीच खरी यशाची मानकरी आहे’ या भूमिकेमुळेच एस्. एम्. आमदार म्हणून प्रभावी झाले.

•

# प्रकरण ४

## संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन

एस्. एम्. जोशींच्या राजकीय जीवनात संयुक्त महाराष्ट्राचे त्यांनी केलेले नेतृत्व हा सर्वोच्च बिंदू होता. हे सारे कसे घडले याचे निरीक्षण केल्यावर, एक जबरदस्त आव्हान पुढे ठाकल्यावर एस्. एम्. यांच्या अंगभूत गुणांचा आणि त्यांच्या सुप्त शक्तींचा आविष्कार झाला हे समजून येते. समर्पण वृत्तीने जगणारा, तत्त्वांच्या बाबतीत कधीही तडजोड न करणारा, नैतिक मूल्यांचे पालन करताना स्वजनांचीही अप्रियता सहज स्वीकारणारा आणि प्रतिपक्षांच्या विखारी टीकेचीही तमा न बाळगणारा, जनतेला कधीही धोका न देणारा आणि ध्येय साध्य झाल्यावर अनासक्त वृत्तीने सत्तास्थानाकडे पाठ फिरविणारा, एक उत्तुंग व्यक्तिमत्वाचा नेता — अशी एस्. एम्. यांची प्रतिमा मराठी माणसांच्या मनात निर्माण झाली. पंतप्रधान पं. नेहरूंसारख्या तेजोवलयांकित नेत्याला आणि केंद्र शासनाच्या सत्तेला विरोध करून, संयुक्त महाराष्ट्राची मराठी माणसाची आकांक्षा पूर्ण करणे, हे एक जबरदस्त आव्हान होते. एस्. एम्. यांनी हे आव्हान केवळ व्यक्तिशः स्वीकारले नाही; महाराष्ट्रातील जनतेला शांततेच्या मार्गाने पण खंबीरपणे संघर्ष करण्याची प्रेरणा त्यांनी दिली. प्रदीर्घ संघर्ष करून

महाराष्ट्रातील जनतेने आपली न्याय्य मागणी अखेर पं. नेहरूंना मान्य करावयास लावली. या अग्निदिव्यातून मराठी जनता तावून सुलाखून निघाली आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे स्वप्न साकार झाल्यावर नव्या आत्मविश्वासाने वाटचाल करू लागली. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील फक्त काही महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख केला आणि त्या प्रत्येक कसोटीच्या प्रसंगी एस्. एम्. यांनी कोणते निर्णय निर्भयपणे घेतले, हे सांगितले तरी या अपूर्व जनआंदोलनाची आणि एस्. एम्. जोशी यांच्या असामान्य नेतृत्वाची कल्पना येऊ शकेल. हे सारे पुढीलप्रमाणे घडले :

**भाषावार राज्य – पुनर्रचना**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळातच १९२० साली अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने, ‘भावी काळात भारताचे ब्रिटिशांनी त्यांच्या राज्यकारभाराच्या सोयीसाठी केलेले बहुभाषिक इलाखे रद्द करून भारताची भाषावर पुनर्रचना करून नवीन भाषावार प्रांत निर्माण करावेत’, अशी मागणी एका ठरावाद्वारे केली होती. काँग्रेसने स्वतःच्या संघटनात्मक कार्यामध्ये भाषावार प्रदेश काँग्रेस कमिट्या स्थापन केल्या होत्या. स्वातंत्र्य समीप आले, ही जाणीव झाल्यावर १९४६ साली बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनता मराठी भाषिक प्रांताची मागणी करण्यात आली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि १९५० साली भारताची

नवी राज्यघटना अंमलात आल्यानंतर अनेक राजकीय नेत्यांना राज्य पुनर्रचना व्हावी, असे तीव्रतेने वाटू लागले. महाराष्ट्रात काँग्रेससह सर्व राजकीय पक्ष एकत्र आले आणि त्यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली. शंकरराव देव हे या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष झाले. पंतप्रधान नेहरूंचा मात्र भाषावार पुनर्रचनेस पाठिंबा नव्हता. हैद्राबाद संस्थानात तेलगू भाषिक, मराठी भाषिक आणि कन्नड भाषिक प्रदेश एकत्र होते. ते तसेच रहावेत, अशी पं. नेहरूंची भूमिका होती. परंतु आंध्रमधील तेलगू भाषिकांना मात्र त्यांचे एक भाषिक राज्य हवे होते. या मागणीसाठी १९५३ साली आंध्रचे एक स्वातंत्र्य सैनिक पोट्टी श्रीरामलू यांनी आमरण उपोषण केले आणि उपोषणातच त्यांचा अंत झाला. यानंतरच्या प्रक्षुब्ध परिस्थितीत पं. नेहरूंनी तेलगू भाषिकांच्या आंध्र प्रदेशाची मागणी मान्य केली. त्यानंतर या प्रश्नावर पाहणी करून शिफारशी करण्यासाठी फाजलअल्ली, कुंझरू आणि पणिक्कर, असे तीन सदस्यांचे कमिशन नेमण्यात आले.

**महाराष्ट्रावर अन्याय**

१० ऑक्टोबर १९५५ला, फाजलअल्ली कमिशनने राज्य पुनर्रचनेबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला. कमिशनने अन्य ठिकाणी भाषावर राज्ये मान्य केली असली तरी महाराष्ट्र आणि पंजाब यांच्याबाबत मात्र वेगळे निर्णय घेण्यात

आले. पंजाबी सुभ्याची मागणी नाकारण्यात आली. मुंबईसह सर्व मराठी भाषिक प्रदेशांचे एक राज्य व्हावे, ही मागणीही अमान्य करून फाजलअल्ली कमिशनने विदर्भ वगळून उर्वरित महाराष्ट्र आणि गुजरात, असे द्वैभाषिक राज्य करण्याची शिफारस केली. शंकरराव देव यांना विदर्भ स्वतंत्र न ठेवता या राज्यास जोडल्यास द्वैभाषिक मान्य करावे असे वाटत होते. परंतु एस्. एम., डांगे, अत्रे आदींनी शंकरराव देवांच्या भूमिकेस विरोध केला आणि त्यांचा ठराव फेटाळून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा, ही मागणी आग्रहाने मांडली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या या ठरावानंतर केंद्र शासनाने मुंबईचे स्वतंत्र राज्य, विदर्भासह महाराष्ट्राचे राज्य आणि महागुजरात अशी त्रिराज्य योजना जाहीर केली. हा महाराष्ट्रावर केलेला घोर अन्याय होता. त्यामुळे मराठी जनतेत तीव्र असमाधान निर्माण झाले. एस्. एम्. जोशी त्या वेळी मुंबई विधानसभेचे सदस्य होते. त्या वेळी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी राज्य पुनर्रचनेचा ठराव मांडल्यावर एस्. एम्. जोशींनी उपसूचना मांडून मूळ ठरावास प्रखर विरोध केला आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. एस्. एम्. जोशींचे भाषण अत्यंत प्रभावी झाले.

## मुंबई पेटली

मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याच्या निर्णयामुळे मुंबईत असंतोषाचा भडका उडाला. मिरवणुका, मोर्चे निघाले. लाठीमार, अश्रुधूर यानेही लोक दबले नाहीत. त्या वेळी मोरारजी भाईंच्या आदेशाप्रमाणे पोलिसांनी निर्घृणपणे गोळीबार केला आणि नंतर जणू रस्त्यारस्त्यांतून लढाईच सुरू झाली. सरकारने प्रबोधनकार ठाकरे, नाना पाटील आदी २९ नेत्यांना पकडले. १६ तारखेस रात्री ठाकुरद्वारजवळ दंगल उसळली. बंडू गोखले नावाचा विद्यार्थी आणि अन्य चारजण ठार झाले आणि मग मुंबई पेटलीच. हे अग्निकुंड विझवणे जरूर होते. एस्. एम्. रस्त्या-रस्त्यात फिरून लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करीत होते. २९ तारखेस ते दादरमधल्या त्यांच्या घरातून निघून दादर स्टेशनजवळ आले. तेथे मोठा जमाव प्रक्षुब्ध झाला होता. फुलांच्या करंड्या पेटवीत होता. तेवढ्यात पोलिस इन्स्पेक्टर अडवानी तेथे आले. पोलिसांची लॉरी पुढे होती. एस्. एम्. यांच्या लक्षात आले की जमाव अडवानींना वेढू पाहतोय व तो त्यांना मारल्याशिवाय राहणार नाही. एस्. एम्. एकदम पुढे झाले. दोन्ही हात पसरून त्यांनी इन्स्पेक्टर अडवानींना पाठीशी घातले आणि जमावाला उद्देशून ते म्हणाले, ‘लोकहो, आधी मला ठार केल्यानंतरच तुम्ही त्यांच्या अंगाला स्पर्श करू शकाल.’ जमाव हे शब्द ऐकून थबकला. तेवढ्यात अडवानी पोलिसांच्या लॉरीत बसू शकले. एस्. एम्. होते म्हणूनच त्यांचे प्राण वाचले. एस्.

एम्. च्या जीवनातला हा विलक्षण समर प्रसंग. दुसऱ्या दिवशी देशभरच्या वर्तमानपत्रांनी 'एस्. एम्. जोशींनी इन्स्पेक्टर अडवानींना वाचवले' ही बातमी ठळकपणे छापली. स्वतःचे प्राण धोक्यात घालायला तयार असलेला नेताच हिंसक जमावाला आवरू शकतो, हे एस्. एम्. यांनी दाखवून दिले. या दंगलीत एकूण १०५ हुतात्मे झाले.

## संयुक्त महाराष्ट्र समिती

या नंतर काँग्रेसचे सर्व नेते चळवळीपासून दूर झाले. लोकांना चळवळ हवी होती आणि चळवळीचे नेतृत्व कोणी तरी करणे आवश्यक होते. ६ फेब्रुवारी १९५६ला एस्. एम्. जोशी यांनी पुण्यात टिळक स्मारक मंदिरात कार्यकर्त्यांचा मेळावा बोलावला. मेळाव्याचे अध्यक्षस्थान केशवराव जेधे यांनी स्वीकारले. तीनशे कार्यकर्ते मेळाव्यास हजर होते. धनंजयराव गाडगीळ आणि दा. वि. गोखले हेही मेळाव्यास मुद्दाम उपस्थित राहिले. याच मेळाव्यात संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. रात्री शनिवारवाड्यापुढील प्रचंड सभेत संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाल्याचे आणि एस्. एम्. जोशी हे समितीचे सरचिटणीस झाल्याचे जाहीर करण्यात आले. काँग्रेसच्या नेत्यांनी समितीत सामील न होण्याचा निर्णय घेतला. स्थानबद्धतेतून सुटून येताच कम्यूनिस्ट नेते भाई डांगे आणि अत्रेही समितीत हिरिरीने भाग घेऊ लागले. संयुक्त महाराष्ट्र

समितीने सत्याग्रह सुरू केला. ९ मार्च १९५६ ते ४ एप्रिल १९५६ पर्यंत मुंबई राज्यात तेरा हजारांहून अधिक कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करून कारावास भोगला.

चिंतामणराव देशमुख हे त्या वेळी केंद्रात अर्थमंत्री होते. त्यांचा त्रिराज्य योजनेस विरोध होता. महाराष्ट्रावर अन्याय होत आहे, असे लोकसभेतील भाषणात सांगून त्यांनी अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला. परंतु नंतर ज्या वेळी त्रिराज्य योजना बाजूस सारून विशाल द्वैभाषिकाचा ठराव पुढे आला तेव्हा त्याला देशमुखांनी पाठिंबा दिला. विशाल द्वैभाषिकाची योजना संसदेने संमत केली. मोरारजीभाईंना हा पर्याय मान्य होता. परंतु गुजरातचा त्याला विरोध होता. महागुजरात समितीने सत्याग्रह सुरू केला. त्याला एस्. एम्. जोशींनी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे पाठिंबा दिला. या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी समाजवादी कार्यकर्त्या अनुताई लिमये यांच्या नेतृत्वाखाली एक सत्याग्रही तुकडी पाठविण्यात आली.

एस्. एम्. जोशींना त्यांच्या प्रजा समाजवादीपक्षाच्या केंद्रीय नेत्यांपैकी काही जणांचा विरोध होता. परंतु आचार्य नरेंद्र देव यांनी एस्. एम्.ना खंबीर पाठिंबा दिला. पक्षांतर्गत विरोधाचे वादळ शमले. २९ सप्टेंबरला द्वैभाषिक – विरोधी परिषद मुंबईत घेण्यात आली. ती खूप गाजली. परिषदेस महागुजरातचे प्रतिनिधीही आले होते. या परिषदेपुढे एस्. एम्. जोशी यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस

म्हणून कामाचा आढावा सादर केला. महाराष्ट्र आणि गुजरात मिळून एकूण १२५ जण हुतात्मे झाले. मार्च ते सप्टेंबर अखेर ४५ हजार स्त्री – पुरुषांनी सत्याग्रह केला. ३२ आमदारांनी द्वैभाषिकाला विरोध म्हणून राजीनामे दिले. एस्. एम्. यांनी त्यांच्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न नक्की साकार होईल, असा आत्मविश्वास प्रगट केला, तेव्हा श्रोत्यांनी टाळ्यांचा गजर केला. आता निवडणुका जवळ येऊ लागल्या. १९५६च्या ऑक्टोबर महिन्यात यशवंतराव चव्हाण हे मुख्यमंत्री झाले.

## निवडणुकीतील मतदारांचा कौल

१९५७च्या निवडणुकीसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने आपल्या सर्व नेत्यांना आणि प्रमुख कार्यकर्त्यांना उभे केले. एस्. एम्. जोशींना पुण्याला शुक्रवार पेठेतून विधानसभेसाठी उभे करण्यात आले. काँग्रेसचे तेथील उमेदवार पुण्याचे महापौर बाबुराव सणस हे होते. पुण्यातून लोकसभेसाठी काकासाहेब गाडगीळ हे उभे होते. नानासाहेब गोरे गोव्याच्या तुरुंगातून नुकतेच सुटून आले होते. संयुक्त महाराष्ट्र समितीने गोरे यांना लोकसभेसाठी पुण्यातून उभे केले. एस्. एम्. यांच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष होते, कारण ती निवडणूक जिंकणे फार अवघड होते. शुक्रवार, वेताळ गंज, भवानी या पेठांतील घराघरांतील प्रौढ माणसे, कर्ते पुरुष काँग्रेसला, सणसांना पाठिंबा देत होते. तरुणवर्ग मात्र संयुक्त

महाराष्ट्राच्या बाजूचा होता. हे तरुण एस्. एम्. ना पाठिंबा देत होते. अखेर या अटीतटीच्या सामन्यात एस्. एम्. जोशी विजयी झाले. 'समितीचा एक्का, निवडून येणार पक्का' ही त्या निवडणुकीत गाजलेली घोषणा खरी झाली.

ना. ग. गोरे यांनी काकासाहेब गाडगीळ यांचा पराभव केला. एस्. एम्. यांच्या विजयानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रभर जल्लोष केला. पश्चिम महाराष्ट्रात समितीने १११ जागा जिंकल्या. तर काँग्रेसला फक्त ३६ जागा मिळाल्या. विदर्भात मात्र काँग्रेसला ५५ आणि समितीला ८ जागा मिळाल्या. अर्थात, या द्वैभाषिकात काँग्रेसलाच बहुमत मिळाले. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले आणि एस्. एम्. हे विरोधी पक्ष नेते झाले. यशवंतराव चव्हाणांनी फार कुशलतेने राज्य केले. मोरारजी देसाईंच्या काळातील कटुता खूप कमी झाली.

## प्रतापगड मोर्चा

यशवंतराव चव्हाणांनी यानंतर आणखी एक डाव टाकला. प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवून पंतप्रधान पं. नेहरूंना या पुतळ्याचे अनावरण करण्यास १९५८ च्या नोव्हेंबरमध्ये चव्हाणांनी बोलविले. या वेळी एस्. एम्. यांनी या समारंभाविरुद्ध संयुक्त महाराष्ट्र समितीने निदर्शने करावीत, अशी सूचना केली.

समितीतही यावर एकमत नव्हते. एस्. एम्. यांच्या नेतृत्वाची ही आणखी एक कसोटी होती. एस्. एम्. त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिले. अखेर निदर्शने करण्याचा निर्णय झाला. वाईला हजारो निदर्शक २९ नोव्हेंबरला जमले. प्रचंड सभा झाली. आचार्य अत्रे, भाई डांगे यांची भाषणे झाली. एस्. एम्. शेवटी बोलले. त्यांनी लोकांना शांततापूर्ण निदर्शने करण्याची विनंती केली. ठरल्याप्रमाणे पं. नेहरू वाई – पांचगणी मार्गे प्रतापगडाकडे गेले तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूस निदर्शक उभे होते आणि घोषणा देत होते; 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' वाईपासून पसरणीच्या घाटापर्यंत पं. नेहरूंच्या कानावर निदर्शकांच्या या घोषणा येत होत्या.

## संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार

यानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीने नोव्हेंबर १९५९ मध्ये अंतिम लढा सुरू करावयाचा असा निर्णय घेतला. ३ ऑगस्टला समितीतर्फे विधानसभेवर मोर्चा आणावयाचा, त्याच वेळी समितीतर्फे सभागृहात सभातहकुबीचा प्रस्ताव मांडावयाचा आणि तो फेटाळला जाताच संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आमदारांनी सभात्याग करून मोर्चात सामील व्हावयाचे ही एस्. एम्. यांची सूचना सर्वांनी मान्य केली. याच वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीत कम्युनिस्टांनी एस्. एम्. च्या विरुद्ध आघाडी उघडली. परंतु एस्. एम्. डगमगले नाहीत. ते स्पष्टपणे म्हणाले, 'सत्ता संपादन हे माझे उद्दिष्ट

नाही, मला संयुक्त महाराष्ट्र मिळवावयाचा आहे.’ पं. नेहरूंनाही लोकमताची कल्पना आली आणि अखेर संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. १ मे १९६० ला संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. ज्या वेळी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मान्य झाला त्या वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकीत एस्. एम्. म्हणाले, ‘आपली मागणी केवळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे’ अशी नव्हती. आपली मागणी ‘मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणी, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे’ अशी होती, याचा आपल्याला विसर पडता कामा नये असे मला वाटते. आपण तडजोड न स्वीकारता आपल्या संपूर्ण मागणीचा प्रश्न आत्ताच धसाला लावला, अशी माझी भूमिका आहे. कर्नाटक राज्यात ज्या मराठी भाषिकांना सक्तीने घालण्यात आले आहे. त्यांच्यावरील अन्याय दूर होईपर्यंत आपण तडजोड स्वीकारू नये.’ परंतु एस्. एम्. यांच्या या भूमिकेस संयुक्त महाराष्ट्र समितीत पुरेसा पाठिंबा मिळाला नाही. एस्. एम्. जीव तोडून सांगत होते की आपण आत्ता या प्रश्नाचा निकाल लावून घेतला नाही तर कदाचित तो दीर्घकाल लोंबकळत पडेल आणि सीमा भागातील आपल्या बांधवांशी आपण प्रतारणा केली, असे होईल. परंतु त्यांचे म्हणणे त्या वेळी कोणी ऐकले नाही.

## यशाचे श्रेय मराठी माणसांना

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे नेतृत्व केल्याबद्दल एस्. एम्. यांचा गौरव करणारे उद्गार बॅ. जयकर यांनी काढले. त्या वेळी एस्. एम्. म्हणाले, ‘आमच्या यशाचे खरे मानकरी महाराष्ट्रातील लोक आहेत. जनतेच्या पाठिंब्यामुळे, त्यागामुळे हा लढा यशस्वी झाला. शिवाय आचार्य अत्रे यांची लेखणी तरवारीसारखी प्रतिपक्षावर तुटून पडत होती. समितीतील भाई डांगे, उद्धवराव पाटील आदी सहकाऱ्यांमुळेच आम्ही संयुक्तपणे लढा दिला.’ समितीच्या अंतर्गत वादांचा एस्. एम्. यांनी कधी उल्लेखही केला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रातील कॉंग्रेसजन, “यशवंतराव चव्हाणांनी संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्णकलश आणला”, असे म्हणू लागले. एका वृत्तपत्राने एस्. एम्.ना याबद्दल विचारले असता ते फक्त हसले आणि म्हणाले, ‘सत्याची जाहिरात करावी लागत नाही!’ एस्. एम्. जोशींचे हे आत्मविश्वासपर उद्गार अहंकाराने काढलेले नव्हते. ते एका भाषणात म्हणाले, “प्रत्येक चळवळीला नेता लागतो. संयुक्त महाराष्ट्रांच्या लढ्यात भाई डांगे, आचार्य अत्रे, उद्धवराव पाटील, मी आणि समितीच्या कार्यकारिणीतले आमचे सहकारी संयुक्तपणे नेतृत्व करीत होतो. त्याचबरोबर लोकांनी आम्हांला उत्स्फूर्तपणे प्रचंड पाठिंबा दिला म्हणून आमचे नेतृत्व प्रभावी ठरले. मराठी जनतेने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली लढून संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्णकलश आणला. सिंहासनावर कोण बसले आहे याचे

मला महत्व वाटत नाही.' एस्. एम्. च्या उद्गारांना प्रचंड टाळ्या देऊन श्रोत्यांनी प्रतिसाद दिला. परंतु सत्तेच्या राजकरणात सिंहासनाला, खुर्चीला महत्व असतेच. यशवंतराव चव्हाण हे संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. सुरुवातीस त्यांनी ग. त्र्यं. माडखोलकरांना उत्तर देताना आपली व्यापक भूमिका स्पष्ट केली. यशवंतराव म्हणले की, 'महाराष्ट्र हे सर्व मराठी जनतेचे राज्य असेल. महाराष्ट्र कधी संकुचित होऊ शकणार नाही, हे स्पष्ट करून यशवंतराव चव्हाणांनी माडखोलकरांच्या 'महाराष्ट्र' हे मराठ्यांचे राज्य असेल का? या खोडसाळ प्रश्नाचा खरपूस समाचार घेतला. यशवंतराव हे कुशल प्रशासक आणि मुत्सद्दीही होते. १९५७च्या निवडणुकीनंतर द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री असताना, त्यांनी विरोधी नेत्यांशी आणि आमदारांशी सौजन्याने वागून स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले. १९६० नंतर मात्र त्यांनी धूर्तपणे सत्तेच्या राजकारणातील डावपेच खेळण्यास सुरुवात केली. 'महाराष्ट्राचे भविष्य घडवताना मला कर्तबगार सहकारी हवेत. बहुजन समाजातील कर्तबगार व्यक्तींनी विरोधाचे नकारात्मक राजकारण करण्याऐवजी सत्तेत सहभागी होऊन महाराष्ट्राचे हित साधावे' असे स्पष्ट आवाहन त्यांनी केले आणि शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष यांमधील यशवंतराव मोहिते, रामभाऊ तेलंग, भाऊसाहेब शिरोळे आदी अनेक तडफदार कार्यकर्ते विरोधी पक्ष सोडून काँग्रेस पक्षात गेले.

## राजकारणाचे बदलते रंग

१९५७ च्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीमुळे एस्. एम्. जोशी यांनी बाबुराव सणस यांच्यासारख्या लोकप्रिय कॉंग्रेस उमेदवारावर नेत्रदीपक विजय मिळविला होता. परंतु १९६२ला सर्व चित्र पालटले होते. १९५७ साली शुक्रवार पेठेत एस्. एम्. च्या प्रसार मोहिमेतील एक नेते, स्वातंत्र्य चळवळीत एस्. एम्. बरोबर कार्य केलेले कार्यकर्ते आणि एक वर्षापूर्वीच समाजवादी पक्षातर्फे पुण्याच्या महापौरपदी निवडून आलेले नगरसेवक – रामभाऊ तेलंग यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला होता आणि कॉंग्रेसने त्यांनाच एस्. एम्. जोशींविरुद्ध उभे केले होते. निवडणूक चुरशीची झाली आणि रामभाऊ तेलंग हे एस्. एम्.चा पराभव करून निवडून आले. अनेकांना मोठा धक्का बसला. नानासाहेब गोरेही लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाले आणि कॉंग्रेसचे शंकरराव मोरे निवडून आले. एस्. एम्. आणि गोरे यांच्या पराभवामुळे समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना फार दुःख झाले. परंतु निवडणुकीच्या निकालानंतर पुण्यामध्ये झालेल्या समाजवादी पक्षाच्या प्रांतिक कार्यकर्त्यांच्या बैठकीच्या वेळी एस्. एम्. मात्र नेहमीप्रमाणे उत्साही आणि आनंदी होते. ते कार्यकर्त्यांना म्हणाले, “राजकारणात यशाने हुरळून जाता कामा नये. आपण सर्वजण समाजवादी समाजरचना व्हावी

म्हणून झगडतो आहोत. पाच वर्षं या उद्दिष्टासाठी मी असेंब्लीत आणि नानासाहेबांनी पार्लमेंटमध्ये काम केले. परंतु समाजवादासाठी कार्य करण्याच्या त्याच केवळ जागा नाहीत. तुमच्यापैकी बहुसंख्य – जवळजवळ सर्व कार्यकर्ते – आमदार खासदार नसताना श्रमिकांचे लढे लढवता. आता आम्ही दोघेही तुमच्याबरोबर काम करू. निराश झालात तर कामावर परिणाम होईल. ते होऊन चालणार नाही. सामाजिक न्यायासाठी आपण सुरू केलेली लढाई चालूच राहिली पाहिजे.” बैठकीच्या शेवटी खानदेशातील लोढूभाऊ फेगडे बोलले. ते म्हणाले, “एस्. एम्. आणि मी फैजपूर काँग्रेसपासूनचे दोस्त. एस्. एम्. पडल्याचे मला रावेरला कळले तेव्हा माझ्या डोळ्यात पाणी आले. मला पुण्याच्या मतदारांचा संताप आला. ज्या माणसाने संयुक्त महाराष्ट्र मिळवून देण्यासाठी प्राण पणाला लावले त्याची मतदारांना कदर नाही. यामुळे मला त्या रात्री जेवण गेले नाही. पण आज मी एस्. एम्. चे भाषण ऐकले. मी आता पुन्हा जोराने कामाला लागणार. फैजपूर काँग्रेसच्या वेळी प्रचार मोहिमेत एका गावात लोकांनी आमची हुर्यो केली. मी निराश झालो. एस्. एम्. मात्र जोशात होते. ते म्हणाले, “लोढूभाऊ, चल पुढच्या गावात लोक आपली वाट पहात असतील आणि तसच झालं. त्या वेळी आणि आजही मला कळलं की आपला हा सेनापती कधी रणांगण सोडणार नाही. तेव्हा एस्. एम्.नी जे सांगितले तेच मी आज सांगतो.

लढाई हरली म्हणून थांबायचं, पळायचं नसतं. कारण आपल्याला युद्ध जिंकायचं असतं. आपण निवडणुकीची लढाई आज हरलो आहोत. पण समाजवादाचं युद्ध जिंकणार आहोत. कारण आपला सेनापती आहे एस्. एम्.”

लोढूभाऊंनी सगळ्या कार्यकर्त्यांच्या मनातली भावना बोलून दाखवली. एस्. एम्.नी पुन्हा उत्साहाने कामाला सुरुवात केली आणि त्यांचे समाजवादी पक्षातील कार्यकर्ते गीत म्हणू लागले.

‘समाजवादी साथी गाती एका आवाजात,
ध्येयाचे हे गीत घुमवू अवघ्या अवकाशात।
कसणाराची आता होऊ दे धरणी,
श्रमणाराची आता होऊ दे गिरणी
ध्येय आमुचे हे ठरले,
कार्य दुसरे ना उरले
क्षणभर आता राहू न आम्ही शांत
कधी ना शांत, कधी ना शांत
समाजवादी साथी गाती एका आवाजात,
ध्येयाचे हे गीत घुमवू अवघ्या अवकाशात।

•

## प्रकरण ५

# तीन क्षेत्रांतील कार्य

## १. विधानसभेतील आणि लोकसभेतील कामगिरी

एस्. एम्. १९५३ साली पोटनिवडणुकीत मुंबई विधानसभेत निवडून आले आणि १९६२ पर्यंत ते विधानसभा सदस्य होते. विधानसभेत ते एक खंबीर विरोधी पक्ष आमदार म्हणून सुरुवातीपासूनच मानले जात. अन्यायावर तुटून पडणे हा त्यांचा स्वभाव होता. प्रसिद्धीची त्यांना हाव नव्हती. परंतु विधानसभेत ते सत्ताधारी पक्षावर जी घणाघाती टीका करीत त्यामुळे त्यांच्या भाषणांना प्रसिद्धी मिळत असे. मात्र विरोध म्हणजे वैर नव्हे हे पथ्य त्यांनी सतत पाळले. यशवंतराव चव्हाण हे १९५३ साली कॉँग्रेस मंत्रिमंडळातील प्रमुख सदस्य होते आणि १९५७ ते १९६२ या काळात ते मुख्यमंत्री होते. एस्. एम्. बद्दल त्यांनी लिहिले आहे, "एस्. एम्. विरोध तीव्रतेने करी. परंतु त्यात द्वेषाची भावना कोठेही दिसून आली नाही. एस्. एम्. यांच्या विधायक टीकेमुळे त्यांचा सभागृहात नैतिक प्रभाव होता. ते भाषण करीत असताना सभागृहातील सर्व सदस्य एकाग्र चित्ताने त्यांचे विवेचन ऐकत. कारण त्यांच्या भाषणात, ते तात्त्विक विवेचन करतानाही लोकांच्या दैनंदिन जीवनात त्यांनी जे पाहिले त्याची उदाहरणे देत." एस्. एम्. अभ्यास करून बोलत

आणि त्या बोलण्यामागे स्पष्ट वैचारिक भूमिका असे. त्यांच्या विधानसभेच्या १९५३ ते १९६२ या काळात त्यांनी अठ्ठावीस विधेयकांच्या चर्चेत भाग घेऊन अनेक दुरुस्त्या सुचविल्या. एस्. एम्. यांनी शेतीविषयक विधेयकांवर बोलताना कुळांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांनी शेतीच्या पुनर्रचनेबाबत अशासकीय प्रस्ताव मांडला. परंतु सत्तारूढ पक्षाने तो अमान्य केला. एस्. एम्. यांनी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांना जमीन मिळाली पाहिजे, अशी भूमिका आग्रहाने मांडली. त्यावर रिपब्लिकन पक्षाचे आमदार दादासाहेब गायकवाड म्हणाले, 'कसेल त्याची जमीन हे बरोबर आहे. पण, ज्यांना कसायलाही जमीन नसेल त्यांचे काय?' गायकवाड यांच्या प्रश्नाने एस्. एम्. अस्वस्थ झाले. आणि लागलीच उभे राहून म्हणाले, 'दादासाहेबांचा प्रश्न बरोबर आहे. दलितांना, भूमिहीन शेतमजुरांना अग्रक्रमाने न्याय दिला पाहिजे हे मला मान्य आहे.'

'Tennancy and Agricultural Lands' या विधेयकावर बोलताना एस्. एम्. यांनी सूचना केली की सारा न दिल्यामुळे अगर अन्य कोणत्याही कारणाने जमीन सरकारकडे गेली तरी कुळांचा जमिनीवरील अधिकार अबाधित राहिला पाहिजे आणि त्याला ती जमीन काही दिवसांनी परत हवी असल्यास ती घेता आली पाहिजे. एस्. एम्. यांची ही सूचना सरकारने नवीन विधेयकात अंतर्भूत केली. १९ एप्रिलला सरकारने मांडलेल्या जमीन सुधारणा

विषयक विधेयकावर बोलताना एस्. एम्. म्हणाले, ‘आपल्या राज्यात पडणाऱ्या पावसाचे जे पाणी समुद्रात वाहून जाते ते अडवून शेतीसाठी उपयोगात आणण्याचा प्रयत्न करावा. विशेषतः दुष्काळी भागातील नद्यांचे पाणी अडवून ते शेतीला द्यावे आणि शेतजमीन सुधारण्यासाठी ज्या विकासयोजनांची कार्यवाही झाली असेल त्यांच्या खर्चापैकी सत्तर टक्के तरी खर्च सरकारने करावा.’ एस्. एम्. यांनी महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी कर्जबाजारी आहेत, हे कटू सत्य सतत मांडले आणि शेती किफायतशीर होईल यासाठी उपाय योजण्याची सरकारला विनंती केली.

**‘कामगारांना न्याय हवा’**

कामगार क्षेत्रात काम करीत असल्यामुळे कामगारांच्या प्रश्नांवरील विधेयकांवर एस्. एम्. अधिकारवाणीने बोलत. कामगारांचे शोषण भांडवलदार करीत असताना सरकारने कामगारांना संरक्षण दिले पाहिजे, अशी भूमिका एस्. एम्. यांनी विधानसभेत मांडली. पाचोरा येथील डालडाचा कारखाना बंद झाल्यामुळे ७०० कामगार बेकार झाले. त्या प्रमाणे चाळीसगाव, जळगाव आणि सोलापूर येथील कापड गिरण्यांतल्या कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड पडली होती. या विरुद्ध एस्. एम्. यांनी विधानसभेत आवाज उठवून सरकारने बंद गिरण्या ताब्यात घेऊन त्या पुन्हा सुरू कराव्यात असे सुचविले. मुख्यमंत्री

यशवंतराव चव्हाण यांनी एस्. एम्. यांची ही सूचना स्वीकारण्याचा निर्णय घेतला आणि महाराष्ट्रात बंद गिरण्या सरकारने सुरु केल्या. कामगार विधेयकांबाबत बोलताना एस्. एम्. यांनी, कामगारांनी संप मागे घेतल्यावर त्यांना कामावर घेण्यात यावे, पुन्हा अर्ज करावयास लावू नये, अशी सूचना केली आणि सरकारने ती स्वीकारली. कामगारांची बाजू मांडतानाच एस्. एम्. यांनी कामगार शक्तीची कार्यक्षमता वाढून देशाच्या उत्पादनात वाढ झाली पाहिजे, असाही विचार सडेतोडपणे मांडला. अंदाजपत्रकावर भाषण करण्यापूर्वी एस्. एम्. अर्थक्षेत्रातील तज्ज्ञ मित्रांबरोबर प्रथम चर्चा करीत. त्यामुळे त्यांची भाषणे कधीही उथळ झाली नाहीत.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य झाल्यानंतर विधानसभेत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी जेव्हा राज्य पुनर्रचना विषयक विधेयक मांडले त्या वेळी एस्. एम्. जोशी यांनी प्रदीर्घ भाषण करून अनेक दुरुस्त्या सुचविल्या. त्या दुरुस्त्या आणि सूचनांपैकी फक्त नव्या मराठी-भाषिक राज्याला मुंबई राज्य या ऐवजी 'महाराष्ट्र' हे नाव द्यावे, ही सूचना मान्य झाली. १९६० साली त्या वेळचे सहकारमंत्री बाळासाहेब भारदे यांनी सहकारविषयक विधेयक मांडले; तेव्हा एस्. एम्. यांनी त्या विधेयकाचे स्वागत केले. लोकशाही विकेंद्रीकरणासाठी शासनाने नेमलेल्या समितीच्या अहवालानंतर बोलताना एस्. एम्. म्हणाले,

‘सत्तेचे लोकशाही पद्धतीने विकेंद्रीकरण केले पाहिजे. त्याशिवाय आपल्या देशात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रभावी होणार नाही. आपल्याला जनतेचे राज्य स्थापन करून सत्ता सर्वसामान्य लोकांच्या हातात दिली पाहिजे.”

## सडेतोड खासदार

एस्. एम्. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पुणे शहरातून लोकसभेवर निवडून गेले. लोकसभेत ते हिंदीमध्येच बोलत. दक्षिणेकडील राज्यांमधील समस्येवर चर्चा असेल तरच इंग्रजीमध्ये बोलत. हिंदी भाषेवर त्यांचे उत्तम प्रभुत्व होते आणि हिंदीबद्दल त्यांना अभिमान वाटत असे. लोकसभेत मांडल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या समस्यांच्या संदर्भातील ठरावांवरील आणि विधेयकावरील चर्चेत एस्. एम्. नेहमी भाग घेत. शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव असावा, शेतकऱ्यांची कर्जातून आणि दारिद्र्यातून मुक्तता व्हावी आणि जमीनदारी रद्द करण्याच्या कायद्याची नीट कार्यवाही करून भूमिहीन शेतमजुरांना आणि दलितांना जमीन द्यावी, हे विचार एस्. एम्. हिरिरीने मांडत असत. सरकारने नद्यांच्या पाणी वाटपाबाबतचे दुरुस्ती विधेयक आणले तेव्हा एस्. एम्. जोशींनी त्या विधेयकाचे स्वागत करून त्याला पाठिंबा दिला.

१९६८च्या डिसेंबर महिन्यात अटलबिहारी वाजपेयी यांनी लोकसभेत खासगी (नॉर्न ऑफिशिअल) ठराव मांडून

३७० कलमानुसार काश्मीरला जे विशेषाधिकार दिले होते ते रद्द करण्यासाठी घटनेतील ३७० कलम रद्द करावे, अशी सूचना केली. एस्. एम्. जोशी या ठरावाला विरोध करताना म्हणाले, “३७०वे कलम रद्द केल्यास विघटनवादी प्रवृत्ती डोके वर काढतील. म्हणून देशाची एकात्मता टिकविण्यासाठी ३७०वे कलम कायम ठेवावे.’ राष्ट्राची एकात्मता आणि अखंडता अबाधित रहावी यासाठी वाजपेयी यांनी त्यांच्या भूमिकेच्या फेरविचार करावा, अशी एस्. एम्. यांनी विनंती केली. कोठारी आयोगाच्या शिफारशी लागू केल्या नाहीत म्हणून दिल्ली टीचर्स असोसिएशनने संप केला. त्या वेळी एस्. एम्. यांनी शिक्षकांच्या मागणीचे समर्थन केले. ते म्हणाले, ‘The Future of Education and consequently that of the nation is at stake. I believe that we can and should find the funds needed.’

त्या वेळी हरियानातील आयाराम गयाराम प्रकरणानंतर पक्षांतराला आळा घालण्यासाठी एक विधेयक मांडले गेले. त्यावर बोलताना एस्. एम्. म्हणाले, ‘१९६० साली ज्या वेळी विरोधी पक्षांनी पक्षांतरावर बंदी घालण्याचा ठराव आणला होता तेव्हा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले, ‘आता महाराष्ट्राचा बदलाचा काळ आहे. राजकीय निष्ठा बदलत आहेत म्हणून लोकांना पक्ष बदलू दिला पाहिजे. आता ना. यशवंतराव चव्हाण बदलत्या राजकीय निष्ठांना विरोध करीत आहेत हे स्वागतार्ह आहे.’ एस्. एम्.

पुढे म्हणाले, ‘काँग्रेसने प्रलोभने दाखवून विरोधी पक्षातील सदस्यांना फोडून काँग्रेसमध्ये घेऊ नये.’ एस्. एम्. यांनी राजकारणात साधनशुचिता अत्यंत आवश्यक आहे असा विचार लोकसभेत सतत मांडला.

नोव्हेंबर १९६८ मध्ये विरोधी पक्षांतर्फे सत्ताधारी काँग्रेस पक्षाविरुद्ध अविश्वासाचा ठराव जेव्हा मांडला गेला तेव्हा एस्. एम्. त्या ठरावाला पाठिंबा देताना म्हणाले, ‘वटहुकूम काढून कामगारांचा संप चिरडून टाकणे अवैध आहे. सरकारच्या या अवैधानिक प्रवृत्तींविरुद्ध हा ठराव आहे.’ एस्. एम्. लोकसभेचे सदस्य असताना जाणकार अभ्यासू आणि सामाजिक न्यायासाठी हिरिरीने भांडणारे सदस्य म्हणून ओळखले जात. महाराष्ट्र विधानसभेत आणि लोकसभेतही विधायक विरोध कसा करावा ते एस्. एम्. यांनी दाखवून दिले. १९७१ मध्ये लोकसभा इंदिरा गांधींनी बरखास्त केली. त्या वेळी कार्यकर्त्यांच्या एका सभेत एस्. एम्. म्हणाले, ‘गेली चार वर्ष मी लोकसभेत विरोधी पक्ष सदस्य म्हणून तळमळीने काम केले. सभागृहात माझे मन रमत असे. परंतु दिल्लीत मात्र माझे मन रमले नाही. दिल्लीतील राजकीय वातावरण माझ्या स्वभावाला मानवणारे नाही. तळागातल्या कार्यकर्त्यांच्या समवेत काम करताना मला खरे समाधान मिळते.

## २. ट्रेड युनियन चळवळीतील कार्य

राजकीय कार्य हे एस्. एम्. जोशींच्या जीवनाचे प्रधान अंग होते. परंतु केवळ संसदीय कार्य वा सत्तेचे राजकारण यांनाच महत्व आहे, असे एस्. एम्. यांनी मानले नाही. राजकीय कार्य हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. अशी एस्. एम्. ची भूमिका होती. आपल्या समाजातील विषमता कमी झाली पाहिजे, लोकांच्या न्याय्य हक्कांचे रक्षण झाले पाहिजे, यासाठी प्रस्थापित धनिक वर्गाशी सतत संघर्ष करावा लागणारच, याची एस्. एम्. यांना तीव्र जाणीव होती. हा संघर्ष संघटित कामगार वर्ग प्रभावीपणे करू शकेल हे एस्. एम्. अनुभवातून शिकले. समाजवादी होण्यापूर्वीच एस्. एम्. यांचा या कामगार चळवळीशी संबंध आला होता. १९३० साली जी. आय्. पी. रेल्वेच्या संपामध्ये पुणे विभागाचे मार्गदर्शन काकासाहेब गाडगीळ करीत होते. काकासाहेब या वेळी यूथ लीगचे अध्यक्ष होते आणि एस्. एम्. यूथ लीगचे एक आघाडीचे कार्यकर्ते होते. म्हणून ते काकासाहेबांना हा संप लढविण्याच्या कार्यात मदत करू लागले. संप यशस्वी झाला नाही, परंतु एस्. एम्. यांना अनुभव मात्र खूप मिळाला आणि कामगार चळवळीशी त्यांचे नाते जुळले.

## ट्रेड युनियन कार्याला सुरुवात

१९३० आणि १९३२ साली एस्. एम्. यांनी तुरुंगात कार्ल मार्क्सच्या ग्रंथांचे वाचन केले आणि ते विचाराने समाजवादी बनले. १९३४ साली अखिल भारतीय कापड

कामगार परिषद मुंबईस भरली होती. त्या वेळी पुण्याच्या कामगारांचे प्रतिनिधी म्हणून एस्. एम्. यांनी मुंबईच्या परिषदेत भाग घेतला. १९३६ साली तुरुंगातून सुटून आल्यानंतर एस्. एम्. कामगारांच्या चळवळीत जाणीवपूर्वक भाग घेऊ लागले. पुण्यामध्ये तांब्या-पितळेची भांडी बनविण्याचे लहान लहान कारखाने होते. त्या कारखान्यातील कामगारांची संघटना दत्तोबा लाड यांच्या मदतीने एस्. एम्. यांनी बांधली आणि पगारवाढ व इतर मागण्यांसाठी या भांडी कामगारांनी संप केला. त्या वेळी जेधे बंधूंचा पुण्यात भांड्यांचा कारखाना होता. तरीदेखील केशवराव जेधे यांनी मध्यस्थी केल्यामुळे कामगारांच्या काही मागण्या मान्य झाल्या. दत्तोबा लाड हे मुळचे कुंडलचे धडाडीचे कार्यकर्ते होते. एस्. एम्. ची त्यांच्याशी दोस्ती जमली. दत्तोबा लाडांच्यामुळे एस्. एम्. विडी कामगारांच्या युनियनमध्येही काम करू लागले.

## संरक्षण कामगारांची संघटना

स्वातंत्र्यपूर्व काळात मिलिटरीच्या डेपोमधील कामगारांना युनियन काढण्याचा अधिकार नव्हता. स्वराज्य मिळाल्यानंतर तो मिळाला. पुण्यामध्ये अम्युनिशन फॅक्टरी आणि अन्य मिलिटरी डेपो होते. त्यांतील काही कामगारांनी नानासाहेब गोरे आणि विनायकराव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या कामगारांना संघटित करून युनियन्स

सुरू केल्या. अखिल भारतीय पातळीवर सुरुवातीस अरुणा असफअल्ली आणि पुढे जयप्रकाश नारायण डिफेन्स वर्कर्स युनियनचे अध्यक्ष झाले. एस्. एम्. यांनी नेतृत्व करावे, असा पुण्यातील कामगारांनी आग्रह धरला. त्यामुळे 'पाचशे बारा कमांड वर्कशॉप' च्या युनियनचे एस्. एम्. अध्यक्ष झाले. के. एम. मॅथ्यू या केरळमधून आलेल्या कामगार कार्यकर्त्याची जनरल सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. अधिकारी वर्गाला युनियन नको असल्यामुळे युनियनचा चिटणीस झालेल्या मॅथ्यूला आकसाने बडतर्फ करण्यात आले. एस्. एम्. या अन्यायाविरुद्ध उपोषणास बसले. एस्. एम्. च्या उपोषणास नऊ दिवस झाल्यामुळे अच्युतराव पटवर्धन यांनी मध्यस्थी केली आणि सत्यशोधन कमिटी नेमल्यावर एस्. एम्. यांनी दहाव्या दिवशी उपोषण सोडले. सत्यशोधन समितीने मॅथ्यू यांना कामावर परत घेण्याची शिफारस केली आणि शासनाने ती स्वीकारली. 'युनियनचा विजय झाला' असे एस्. एम्. म्हणाले. तेव्हा मॅथ्यू त्याच सभेत म्हणाला, 'एस्. एम्. यांचाच नैतिक विजय आहे.' संरक्षण कामगारांची तीन फेडरेशन्स होती. एस्. एम्. ची भूमिका अशी होती की, ट्रेड युनियन चळवळीत कामगारांच्या हिताच्या आड राजकीय मतभेद येऊ देता कामा नयेत. त्यांनी त्यांची भूमिका आग्रहाने मांडली आणि तिन्ही फेडरेशन्स मिळून एक फेडरेशन निर्माण करण्यात आले. डॉ. मैत्रेयी बोस – अध्यक्ष, एस्. एम्. जोशी – जनरल सेक्रेटरी आणि कॉ. एस्.

एम्. बॅनर्जी – सहचिटणीस झाले. यामुळे कॉंग्रेस, सोशलिस्ट आणि कम्युनिस्ट असे तीन प्रवाह डिफेन्स कामगारांच्या चळवळीत एकत्र आले. पुणे आणि देहूरोड भागांतील डिफेन्स डेपोतील कामगारांच्या संघटनेकडेच एस्. एम्. यांनी मुख्यतः लक्ष दिले. ते सांभाळून ते इतरत्रही कामगार चळवळीत काही भाग घेत. १९६० साली केंद्रीय सरकारच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांना महागाईच्या प्रमाणात महागाई भत्ता मिळावा, अशी कर्मचाऱ्यांची मागणी होती. यासाठी त्यांनी कौन्सिल ऑफ ॲक्शन बनविले आणि एस्. एम्. त्याचे अध्यक्ष झाले. संप यशस्वी झाला नाही. हजारो कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले. या संदर्भात एस्. एम्. जोशी यांनी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे, 'संप मोडल्यानंतर काढून टाकलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरीवर घ्यायला अधिकाऱ्यांना राजी करणे हाच आमचा कित्येक दिवसांचा उद्योग होऊन बसला. आमची अगदी नामुष्की झाली. झोप येत नाही, अशी माझी कधीच तक्रार नसते; परंतु त्या वेळी एक दोन दिवस मला झोपही आली नाही.' मात्र संप यशस्वी झाला नाही तरी पंतप्रधान पं. नेहरूंनी इंग्लंडमधील व्हिटले कौन्सिलच्या धर्तीवर 'जॉईंट कन्सलटेटिव्ह कमिटी' अशी यंत्रणा तयार केली. त्यामुळे कामगारांच्या अनेक रास्त मागण्या मान्य झाल्या. एस्. एम्. जोशी यांनी दीर्घकाळ कामगार चळवळीत काम केले. या

प्रदीर्घ अनुभवानंतर १९८२ साली कार्यकर्त्यांच्या एका मेळाव्यासमोर त्यांनी पुढील आशयाचे विचार मांडले :

**चळवळीचे फलित**

‘संघटित कामगार चळवळीने कामगारांना, कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करायला शिकविले आणि त्यांना अनेक बाबतींत न्याय मिळवून दिला. हे कामगार चळवळ संघटित करणाऱ्या कम्युनिस्ट आणि सोशलिस्टांचे यश होते. आम्ही अनेकदा भांडवलदारांना तसेच शासनालाही नमवू शकलो. त्यामुळे कामगारांना आत्मविश्वास प्राप्त झाला आणि भांडवलशाहीला, आपण हवे तसे आणि हवे तितके शोषण करू शकणार नाही, हे समजून आले. परंतु हे मान्य केले पाहिजे की आम्ही कामगारांच्यात त्यांच्या कर्तव्याचा आणि समतेचा विचार रुजविण्यात अपुरे पडलो. सामाजिक समतेचा दृष्टिकोनही आम्ही कामगारवर्गात निर्माण करू शकलो नाही. एका व्यवसायात एक युनियन हे तत्त्व मान्य मान्य झाले असते तर कामगारांना समाजवादी चळवळीचा व्यापक दृष्टिकोन देणे शक्य झाले असते, असे मला वाटते. परंतु कामगार संघटना एकमेकांपासून अलग राहिल्या. पुढे तर ट्रेड युनियन क्षेत्रातील राजकीय पक्षांनी आणि काही व्यक्तींनी ट्रेड युनियनचा उपयोग आपापले सत्ताकेंद्र असा केला. त्यामुळे ट्रेड युनियन्सचे मूळ स्वरूपच बदलले. ट्रेड युनियनने केलेले

काम महत्वाचे आहे. परंतु या चळवळीतून व्यापक समतावादी आंदोलन निर्माण झाले नाही. कामगार हा क्रांतीचा अग्रदूत झाला नाही. ही कामगार चळवळीची अपूर्णता मान्य केलीच पाहिजे, असे मला वाटते.' एस्. एम्. यांच्या प्रांजळ भाषणानंतर ट्रेड युनियन क्षेत्रात त्यांच्यावर टीकाही झाली. त्यावर एस्. एम्. म्हणाले, 'इष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार, हे माझे ब्रीद आहे'.

## ३. भारतातील भूमि – समस्येचे आव्हान

कॉलेजमध्ये शिकत असताना बी. ए.ला अर्थशास्त्र हा विषय घेतल्यामुळे एस्.एम्.ना समाजाच्या आर्थिक प्रश्नांची जाणीव झाली. परंतु प्रत्यक्ष ग्रामीण भागाशी त्यांचा विशेष संबंध आला नव्हता. चळवळीत पडल्यावर मार्क्सवादी साहित्याच्या वाचनानंतर समाजवादी विचारांचा प्रभाव एस्. एम्.वर पडला. तसेच कामगार चळवळीतही त्यांनी अनेक वर्षे कार्य केले. परंतु भारतातील भूमि – समस्येच्या तीव्रतेची तशी कल्पना त्यांना सुरुवातीस आली नव्हती. पं. नेहरूंच्या आत्मचरित्रामध्ये त्यांनी त्या वेळच्या संयुक्त प्रांतातील (आताच्या उत्तर प्रदेशातील) किसानांचा जो लढा लढविला, त्याचे वर्णन वाचून तिकडे जमीनदारी पद्धतीमुळे शेतकरी फार गरीब आहे, याची एस्. एम्.ना थोडीफार कल्पना आली. फैजपूर काँग्रेसच्या वेळी खानदेशात जेव्हा प्रचार दौरा काढला त्या वेळी प्रथम ग्रामीण भागाशी एस्.

एम्.चा निकटचा संबंध आला आणि शेतकरी व शेतमजूर यांच्या गरिबीची काहीशी कल्पना त्यांना आली. स्वातंत्र्य चळवळीत असताना काँग्रेस समाजवादी पक्षाने उद्याचे स्वराज्य हे श्रमिकांसाठी असले पाहिजे, अशी भूमिका मांडली होती. पंडित नेहरूंच्या आग्रहामुळे ८ ऑगस्ट १९४२ च्या 'चले जाव' ठरावातही शेतात घाम गाळणारे शेतकरी आणि कारखान्यात श्रमणारे मजूर यांचा स्पष्टपणे उल्लेख होता. पुढे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ साली तेलंगणातील शेतकऱ्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली तेथील जमीनदारांविरुद्ध सशस्त्र आंदोलन केले. एस्. एम्. या विषयावरील चर्चेत समाजवादी कार्यकर्त्यांना म्हणाले, 'कम्युनिस्ट पक्षाशी आपले वैचारिक मतभेद आहेत. स्वतंत्र भारतात अन्याय दूर व्हावा, यासाठी सत्याग्रहाच्या मार्गाने लढले पाहिजे, अशी माझी भूमिका आहे. त्यामुळे तेलंगणात जो सशस्त्र लढा चालू आहे तो मला मान्य नाही. परंतु असे असले तरी तेलंगणातील शेतकरी जिवावर उदार होऊन लढत आहेत याचा अर्थ त्यांचा प्रश्न अत्यंत तीव्र असला पाहिजे. आपण त्यांचा प्रश्न, त्यांचे दुःख जाणून घेतले पाहिजे.' एस्. एम्. १९५० साली एका भाषणात म्हणाले. 'रशियातील कम्युनिस्ट क्रांती आणि चीनमध्ये झालेली कम्युनिस्ट क्रांती यांच्यातील फरक महत्त्वाचा आहे. चीन हा औद्योगिक दृष्ट्या मागासलेला देश आहे. तेथे माओने शेतकऱ्यांना जागृत करून त्यांचा लाँग मार्च काढला आणि

कम्युनिस्ट क्रांती यशस्वी केली. माओ केवळ पढिक मार्क्सवादी नाही. त्याच्या देशाच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्याने क्रांतीसाठी शेतकऱ्यांना जागृत केले. प्रस्थापित राज्यकर्त्यांबरोबर दीर्घकाळ लढा करून शेतकरी क्रांती विजयी करून दाखविली. सशस्त्र क्रांतीचा मार्ग आपल्याला मान्य नसला तरी भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये शेतकऱ्यांना संघटित करताना आपल्याला चीनमधील क्रांतीचा अभ्यास करावाच लागेल.

**जमीनदारीची समस्या**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंतप्रधान पं. नेहरूंनी भारतातील जमीनदारी नष्ट झाली पाहिजे, या स्वातंत्र्यपूर्वकाळातील भूमिकेनुसार कायदे झाले पाहिजेत, असा आग्रह धरला. हा प्रश्न भारतात ज्या राज्यांमध्ये जमीनदारी पद्धत होती तेथे फार तीव्र होता. विशेषतः उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये जमीनदारांकडून कुळांचे भीषण शोषण होत होते. त्या राज्यांनी कमाल जमीनधारणा विषयक कायदे केले. परंतु त्या राज्यातील राजकीय आणि सामाजिक जीवनावर जमीनदारांचीच जबरदस्त पकड असल्यामुळे कायदा करताना अनेक पळवाटा ठेवण्यात आल्या. त्यामुळे जमीनदारांनी त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावावर वेगवेगळ्या जमिनी करून प्रत्यक्षात सर्व जमिनी पूर्वीप्रमाणे स्वतःकडेच ठेवल्या.

## भूदान आंदोलन

आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण या दोघांनाही जमिनीचे फेरवाटप होऊन ‘भूमिहीनांना जमीन मिळावी’, असे वाटत होते. आचार्य विनोबा भावे यांनी १९५१ साली पदयात्रा सुरू केली आणि १८ एप्रिल१९५१ ला पोचमपल्ली या आंध्रमधील गावी रामचंद्र रेड्डी या जमीनदाराने त्याच्याकडील जमिनीचा सहावा हिस्सा भूमिहीनांच्यासाठी विनोबाजींना दिला. त्याच्या या कृतीमुळेच आचार्य विनोबा भावे यांना भूदानाचा मार्ग सुचला आणि हा भूदानाचा संदेश घेऊन गावोगाव भूमिहीनांच्यासाठी जमीन द्यावी, असे आवाहन ते जमीनदारांना आणि धनवान शेतकऱ्यांना करू लागले. या अभिनव कल्पनेस सुरुवातीस मोठाच प्रतिसाद मिळाला. भूदान चळवळीमुळे एक नवे आशादायी वातावरण निर्माण झाले. जयप्रकाश नारायण हे भूदान आंदोलनामुळे फार प्रभावित झाले आणि त्यांनी समाजवादी पक्षाचा त्याग करून भूदान आंदोलनाला जीवनदान देण्याचे ठरविले. एस्. एम्. जोशींना जयप्रकाशजींचा हा निर्णय मान्य नव्हता. जयप्रकाश नारायण यांच्याबरोबर ते आणि नानासाहेब गोरे यांची प्रदीर्घ चर्चा झाली. जयप्रकाश नारायण म्हणाले, ‘पं. नेहरूंच्या आदेशानुसार वेगवेगळ्या राज्यांतील काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी जमीनदारी नष्ट करण्यासाठी कायदे केले. परंतु ते इतके सदोष होते की त्यामुळे उत्तर प्रदेश, बिहार

आदी राज्यांमध्ये जमीनदार वर्गाची पकड कायमच राहिली. महाराष्ट्रात रयतवारी पद्धत आहे. त्यामुळे तुमच्याकडे ‘कसेल त्याची जमीन’ हा कायदा पूर्वीच केला गेला. महाराष्ट्रात उत्तरेसारखा जमीनदार वर्गच नाही. मी अशा निर्णयाप्रत आलो आहे की राजकीय मार्गाने जमिनीचा प्रश्न सुटू शकणार नाही. राजकारणात आपण समाजाची रचना बदलू पाहतो. परंतु माणूस बदलत नाही तोपर्यंत रचना बदलता येणार नाही आणि रशियाप्रमाणे रचना बदलली तरी त्यामुळे मानव मुक्त होणार नाही.’

एस्. एम्. म्हणाले, ‘मला राजकारणाच्या मर्यादा माहीत आहेत. म. गांधींनाही त्या माहीत होत्याच. त्यांनी माणूस बदलण्याचा सतत प्रयत्न केला आणि त्याचबरोबर राजकीय चळवळही केली. भूदान आंदोलनाचा समाजमानसावर परिणाम होईल हे मी मानतो. परंतु त्या आंदोलनाच्या जोडीस राजकीय चळवळही पाहिजे. आज पंतप्रधान पं. नेहरूंनाही भूमिहीनांना जमीन मिळावी असे वाटत असल्यामुळे ते कायदे करून भूदान आंदोलनास मदत करतील. परंतु यामुळे जमिनीचा प्रश्न सुटेल, असे मला वाटत नाही. गांधीजींनी ध्येय गाठण्यासाठी सतत संघर्ष केले. विनोबाजींच्या सर्वोदयामध्ये संघर्षाला स्थानच नाही. ही मला भूदान आंदोलनाची फार मोठी अपूर्णता वाटते.’ नानासाहेब गोरे म्हणाले, ‘जयप्रकाशजी, तुम्ही भूदानाचे कार्य करण्यास माझा विरोध नाही. परंतु भूदान आंदोलन हा

भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग आहे. केवळ याच मार्गाने तो प्रश्न सुटेल, असे मला वाटत नाही. माझा तुमच्या जीवनदानाच्या निर्णयाबद्दल आणखीही एक आक्षेप आहे. समाजवादी चळवळीत तुमचे अनन्य- साधारण स्थान आहे. तुमच्या व्यक्तिमत्वामुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळाली असून ते आज समाजवादी पक्षात सर्ववेळ काम करताहेत. ते जीवनदानीच आहेत. त्यांना तुम्ही प्रवाहाच्या मध्येच सोडता आहात, हे मला मान्य नाही. सर्वोदयातील कार्यकर्त्यांपेक्षा समाजवादी पक्षातील कार्यकर्ते यत्किंचित कमी आहेत असे मला वाटत नाही. तुम्ही पक्ष सोडण्यामुळे आमचे काम अधिक बिकट होणार आहे.” जयप्रकाशजी यावर म्हणाले. “मला असे वाटत नाही. मी समाजवादी पक्षाचा त्याग करीत आहे कारण राजकीय पक्षांच्या मार्गाने देशापुढील प्रश्न सुटणार नाहीत या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.” एस्. एम्. म्हणाले, ‘मी तुमच्या सांगण्याप्रमाणे महाराष्ट्रात भूदानाला काही वेळ निश्चित देईन परंतु मी आणि नानासाहेब समाजवादी पक्षाचे काम करीतच राहू. राजकारण सोडून समाजपरिवर्तन घडवून आणता येईल असे मला मुळीच वाटत नाही. नानासाहेब म्हणाले, ‘गांधीजींना राजकारणाच्या मर्यादा पूर्णपणे ठाऊक होत्या. परंतु ते शासनसंस्था नाकारीत नसत. State is a neessary evil हे मान्य करून गांधीजींनी आयुष्यभर माणूस बदलण्याचे प्रयत्न करनातानाच राजकीय कार्यही चालू ठेवले.’

जयप्रकाशजी शेवटी म्हणाले, ‘तुम्ही मला समजून घ्यावे, इतकीच माझी अपेक्षा आहे.’ चर्चेनंतर एस्. एम्. आणि गोरे या दोघांनीही १९५३-५४ सालात त्यांच्या परीने भूदान आंदोलनात महाराष्ट्रात भाग घेतला. एस्. एम्. त्यानंतर म्हणाले, ‘भूदान पदयात्रेत फिरल्यामुळे माझा ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्त्यांशी संबंध आला. भूमिहीनांचा प्रश्न किती बिकट आहे, किंबहुना आपल्या समाजातील समस्या किती गुंतागुंतीच्या आहेत ते मला पूर्वीपेक्षा अधिक स्पष्टपणे समजले. माझा भूदान आंदोलनाच्या कार्यपद्धतीबाबत मतभेद आहे. भूदानात मिळणारी जमीन भूमिहीन शेतमजुरांना मिळते, हे पाहणे जरूर आहे. यासाठी त्या गावात कार्यकर्त्यांनी दीर्घकाल थांबून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून भूमिहीन शेतमजुरांना कसण्यासाठी मालकी-हक्काने जमीन मिळते, हे पाहिले पाहिजे. सभेत एखाद्याने भूदानाला जमीन देण्याचे जाहीर केल्यावर ती जमीन खरोखरच त्याच्या मालकीची आहे का, याची पाहणी करून, जमिनीवरचा मालकी हक्क मूळ मालकाला सोडायला लावणे हे काम फार कठीण आहे. भूदान आंदोलनात हे नीट केले जात नाही, असे मला वाटते. आचार्य विनोबा भावे यांना यासंबंधी विचारले असताना ते म्हणाले, ‘भूदान हा धर्मविचार आहे. मी या विचाराचे बी पेरत जाणार.’ एस्. एम्. पुढे म्हणाले, ‘मला विनोबाजींचे मोठेपण मान्य आहे. परंतु भूदानाचा विचार पेरीत जाणे पुरेसे नाही. भूदानात

मिळालेल्या जमिनीचे हस्तांतर होऊन समाजरचनेत पूर्वी भूमिहीन असलेल्यांना नवे स्थान मिळवून दिले पाहिजे. हे न केल्यास भूदान आंदोलन अपयशी होईल.'

## पूर्णिया जिल्ह्यातील सत्याग्रह

पुढे एस्. एम्. यांना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे नेतृत्त्व करावे लागले. त्यानंतर त्यांचे राजकीय कार्य चालूच होते. जयप्रकाश नारायण यांच्याबरोबर त्यांचे निकटचे संबंध होते. त्यामुळे ते अनेकदा बिहारला जात.

१९६९ साली संयुक्त सोशलिस्ट पार्टीच्या अध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यावर बिहारमध्ये काही विधायक कार्य करावे असे एस्. एम्. यांनी ठरविले. सेवादलाच्या शाखा काढाव्यात किंवा भूमिसेना उभी करून काही विधायक काम करावे, असा त्यांचा विचार होता. त्यांनी कार्यकर्त्यांची तीन—चार शिबिरे घेतली. भारत-नेपाळ सरहद्दीवर असलेल्या पूर्णिया जिल्ह्यात १९७०च्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात एस्. एम्. अनेक गावांत गेले. त्याच सुमारास प्रजा समाजवादी पक्ष आणि संयुक्त समाजवादी पक्ष या दोन्ही पक्षांनी संयुक्तपणे भूमिहीनांच्या प्रश्नाला धार आणण्यासाठी 'जमीन बळकाव' सत्याग्रह करण्याचे ठरविले. पूर्णियात मोहनबाबू नावाचा जमीनदार होता. त्याने त्याच्या मालकीची हजारो एकर जमीन त्याच्या सर्व नातेवाईकांच्या नावाने केली होती. कितीतरी जमीन

नुसती पडून होती. त्याच्या १८ एकर जमिनीत भूमिहीन संथाळांना बरोबर घेऊन एस्. एम्. जोशींनी ‘जमीन बळकाव’ सत्याग्रह केला. संथाळ शेतकरी आपले नांगर घेऊन आले होते. जमीन गाळपेर होती. ती नांगरून तिच्यामध्ये सत्याग्रहींनी उडीद पेरले. सत्याग्रह पाहण्यास प्रचंड गर्दी झाली होती. पोलिसांनी एस्. एम्. जोशी, जयप्रकाशजींचे सेक्रेटरी कालिकाबाबू, जगदीशभाई अशा पंधरा लोकांना अटक केली. एस्. एम्. आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अंडरट्रायल म्हणून एका तुरुंगात ठेवले. तुरुंग किळसवाणा होता. एस्. एम्. लोकसभेचे सदस्य होते. पंचवीस दिवसांनी ते आणि त्यांचे सहकारी यांना बिनशर्त सोडण्यात आले. महिन्याभराने पुनः एस्. एम्. पूर्णिया जिल्ह्यात सत्याग्रह केलेल्या गावी गेले. उडदाची हिरवीगार रोपे डुलत होती. कापणीची वेळ आली. जमीनदार मोहनबाबू पीक आपले आहे म्हणू लागला. एस्. एम्. म्हणाले, ‘आम्ही तुम्हाला पीक देणार नाही. मग ते उडदाचे भारे त्यांनी पोलिस चौकीवर नेऊन ठेवले, आणि अखेर ते संथळांनाच मिळाले. असा हा बिहार पाहून एस्. एम्. फार उद्विग्न झाले. ते पुण्याला आल्यावर कार्यकर्त्यांच्या समोर बोलताना म्हणाले, ‘नक्षलवाद्यांची चळवळ बंगालच्या उत्तरेकडील जिल्ह्यात सुरू झाली तेव्हा मला त्या हिंसक चळवळीला विरोध करावा असे वाटले. परंतु पूर्णिया जिल्ह्यातील भूमिहीन संथाळांच्यामध्ये फिरताना मला या प्रश्नाची दुसरी बाजू

समजली. जमीनदारांच्या जुलमाखाली चिरडले जाणारे भूमिहीन शेतमजूर जुलूम असह्य झाल्यावर संतापून उठणारच. खरे म्हणजे बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल येथील जमिनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या होत्या. ते गावातील तलाठ्याकडे शेतसारा भरीत. ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल सुरू झाल्यावर लॉर्ड कॉर्नवालिसने जास्त जमीन असणाऱ्या काही जणांच्याकडे धारा वसुलीचे काम सोपविले. हातात सत्ता आल्यावर हे बडे शेतकरी पुढे जमीनदार झाले. कुळे पूर्वीप्रमाणेच जमीन कसत होती. पण सारा वसूल करण्याच्या अधिकाराचा दुरुपयोग करून हे जमीनदार शिरजोर बनले. जुलूम वाढत गेला. सावकार जमीनदारांचेच पक्षपाती. १८५७ नंतरही ही परिस्थिती चालूच राहिली. पूर्व बंगालमध्ये जमीन कसणारे सर्व मुसलमान होते आणि बहुतेक सर्व जमीनदार हिंदू होते. हे जमीनदार डाक्यामध्ये, कलकत्त्यामध्ये, अन्य शहरांत राहत. काहीजण कुळांना चांगले वागवीत. काहीजण जुलूम करीत पण आर्थिक शोषण होतेच. कुळांना वाटे आपण राबराब राबतो आणि तरी जमीनदाराच्या मोहब्बतीवरच जगतो, हे का? फाळणीच्या वेळी पूर्व बंगालमध्ये जे दंगे झाले त्यात हिंदू – मुसलमानांमधील तेढ होतीच. त्याचबरोबर जमीनदारांच्या कचाट्यातून या निमित्ताने सुटता येईल असेही अनेक मुसलमान कुळांना वाटत होते. माझ्याबरोबर १९४२ च्या चळवळीत बिवलकर हा तरुण होता. तो फाळणीच्या पूर्वी पूर्व

बंगालमध्ये गेला होता. बिवलकरने ‘सुनीता’ ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीत मुसलमान शेतमजुरांचे, त्यांच्या पिळवणुकीचे आणि त्यातून उद्‌भवलेल्या दंग्यांचे फार भेदक वर्णन बिवलकरने केले आहे.’ एस्. एम्. पुढे म्हणाले, ‘बिहारमध्ये मला असे दिसले की या कुळांना संघटित करून त्यांचे लढे लढविणारे कार्यकर्त्यांचे गट आहेत. अशा तरुण कार्यकर्त्यांपैकी मला नक्षत्रमालाकार म्हणून एकजण भेटला होता. तो नक्षलवाद्यांचे समर्थन करीत होता. बिहारमधील भूसमस्या फार बिकट आहे. स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली. परंतु जमिनीची रेकॉर्ड्‌स् नाहीत. सातबाराच्या उताऱ्यांचा पत्ता नाही. ‘बळी तो कान पिळी’ अशी अवस्था आहे. मला असे वाटते की, आम्ही डाव्या पक्षांनी- कम्युनिस्टांनी, सोशलिस्टांनी शहरातल्या कामगाराला संघटित करून ट्रेड युनियन चळवळ चालविली. ते आवश्यक होते. परंतु भारतातील भूमिहीनांचा, शेतमजुरांचा आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविणे हे खरे समाजवाद्यांपुढील आवाहन आहे. भूदान आंदोलन अपुरे पडले. नक्षलवादी अगर तत्सम कार्यकर्ते मर्यादित क्षेत्रात काही काळ काम करू शकतात. परंतु आज शासनाकडे जे शस्त्रबळ आहे, त्यामुळे हिंसक प्रयत्नांतून जन-आंदोलन निर्माण होऊ शकत नाही. जमीनदारांना काही ठिकाणी दहशत बसविण्यापलीकडे नक्षलवाद्यांच्या चळवळीत अधिक काही साध्य झाले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात बिहारमध्ये

स्वामी सहजानंदांच्या नेतृत्वाखाली काम करणारी किसान सभा होती. किसानांचे व्यापक आंदोलन उभे करणे सोपे नाही.’ ‘जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली १९७३मध्ये आंदोलन सुरू झाले. ते किसानांचे आंदोलन नव्हते. त्यात मुख्यतः मध्यमवर्गीय तरुणांचा पुढाकार होता. जयप्रकाशजींना मात्र असे वाटत होते की या आंदोलनातून संपूर्ण क्रांतीकडे वाटचाल सुरू होईल आणि भूमि-समस्येची न्याय्य रीतीने सोडवणूक हा त्या संपूर्ण क्रांतीचा एक प्रमुख भाग असेल.

●

## प्रकरण ६

# समाजवादी चळवळीची वाटचाल

एस्. एम्. जोशी हे समाजवादी पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते आणि आयुष्यभर समाजवादी चळवळीत त्यांनी समर्पण भावनेने काम केले. कॉलेजमध्ये शिकत असताना फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी आग्रहाने मांडल्या गेलेल्या स्वातंत्र्य-समता आणि बंधुत्व तत्त्वांबाबतचे थोर विचारवंतांनी केलेले विवेचन वाचताना एस्. एम्. फार प्रभावित झाले. आयुष्यभर या तीन तत्त्वांच्या आधारे ते जगले.

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेताना त्यांच्या मनाला साफल्य लाभले. आपल्या देशातील आर्थिक आणि सामाजिक विषमतेविरुद्ध आपण लढले पाहिजे, असे त्यांना स्वातंत्र्यलढ्यात काम करतानाही तीव्रतेने वाटे. स्वातंत्र्याला समतेची जोड नसेल तर ते केवळ राजकीय स्वातंत्र्य ठरेल, हा विचार मनोमन पटल्यामुळेच समाजवादी पक्षाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. समाजवादी चळवळीत आचार्य नरेन्द्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया, युसूफ मेहेरअल्ली, नानासाहेब गोरे यांच्या समवेत एस्. एम्. यांनी दीर्घकाळ वाटचाल केली. यांच्यापैकी काही जणांशी त्यांचे मतभेद झाले. समाजवादी चळवळीत फाटाफूट झाली. परंतु

या सहकाऱ्यांशी असलेला स्नेह मात्र अविचल आणि दृढ राहिला. आचार्य नरेन्द्र देव आणि एस्. एम्.यांच्यामध्ये वैचारिक मतभेदही कधी झाले नाहीत. आचार्य नरेन्द्र देव, एस्. एम्.ना धाकट्या भावाप्रमाणेच मानत असत. जयप्रकाशजींच्या बरोबर एस्. एम्. यांचे पूर्ण मनोमीलन झाले होते. जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी पक्ष सोडून भूदान आंदोलनाला सर्वस्वी वाहून घेणे एस्. एम्. यांना मान्य नव्हते. परंतु जयप्रकाश नारायण आणि एस्. एम्. आयुष्यभर एकमेकाचे जिवलग मित्रच राहिले. युसूफ मेहेरअल्ली यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली. त्यांच्या मृत्यूनंतर एस्. एम्. म्हणाले, 'माझ्या जीवनाचा एक मोठा आधार नाहीसा झाला.'

## डॉ. लोहियांचे प्रखर विचार

डॉ. राम मनोहर लोहिया हे समाजवादी चळवळीतील प्रतिभावान विचारवंत एस्. एम्. यांना डॉ. लोहिया यांच्या वैचारिक झेपेबद्दल फार मोठा आदर होता. एस्. एम्. नेहमी म्हणत, डॉ. लोहियांनी मांडलेल्या विचारांमुळे भारतीय समाजवादी चळवळीला नवा आशय प्राप्त झाला. इतकेच नव्हे तर त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे भारताच्या राजकीय जीवनातही एक मंथन झाले. १९५३ साली समाजवादी पक्षाच्या अधिवेशनात डॉ. राम मनोहर लोहिया यांनी सांगितले, 'भांडवलशाही आणि कम्युनिस्ट व्यवस्था हे दोन

ध्रुव मानले जातात, परंतु या दोनही समाज – रचनांनी मोठ्या यंत्राच्या साहाय्याने समाजाचे औद्योगिकीकरण केले आहे. भांडवलशाही श्रमिकांच्या आर्थिक शोषणावर आधारलेली आहे. हे शोषण नष्ट करण्यासाठी कम्युनिस्ट राजवटीने सर्व मूलभूत उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले. परंतु दोनही समाजरचनांमधील उत्पादन व्यवस्था मोठ्या यंत्रावरच आधारलेली आहे. अशा उत्पादन व्यवस्थेमुळे अर्थसत्तेचे आणि राजसत्तेचे केन्द्रीकरण होते आणि उत्पादक श्रमिक वर्ग हा कधीच बंधमुक्त होत नाही. आपण आपल्या देशाला अनुरूप अशा छोट्या यंत्राच्या आधारे आपली उत्पादन व्यवस्था विकेन्द्रित केली पाहिजे.

## समाजवादाला नवी दिशा

डॉ. लोहिया यांनी मांडलेल्या या विचारांनी एस्. एम्. फार प्रभावित झाले. ते एकदा कार्यकर्त्यांच्यासमोर भाषण करताना म्हणाले, "आम्ही एका वेळी ठोकळेबाज मार्क्सवादी होतो. उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची केली की समाजवाद येईल असे आम्हांला वाटत होते. डॉ. लोहिया १९४६ साली ज्या वेळी 'आपण मार्क्सच्या पलीकडे गेले पाहिजे' असे म्हणाले त्या वेळी त्यांच्या म्हणण्यातून आपण गांधीजींच्या विचारांचीही दाखल घेतली पाहिजे, इतकेच उमगले. परंतु लोहियांच्या पंचमढीच्या भाषणामुळे माझ्या विचाराला नवी दिशा मिळाली. भारतात बेकारीचा प्रश्न

भीषण आहे. अशा वेळी सर्वांच्या हाताला काम देणारे, सर्वांच्या श्रमाचा वापर करणारे छोट्या यंत्रावर आधारलेले तंत्रविज्ञानच भारताला अनुरूप होईल हा डॉक्टर लोहिया यांचा विचार फार मौलिक आहे. कम्युनिस्ट पक्ष कामगार वर्गाच्या हुकूमशाहीचा पुरस्कार करतो आणि आपण लोकशाही समाजवादी आहोत हा विचार मी मांडत असे. परंतु कम्युनिस्टांनी स्वीकारलेली, मोठ्या यंत्रावर आधारलेली उत्पादनपद्धती ही भांडवलशाही उत्पादन पद्धतीपेक्षा वेगळी नाही, हा विचार समाजवादी पक्षात डॉ. लोहियांनीच मांडला. समाजवादी समाजरचनेत मानवाची मुक्ती हा केन्द्रबिंदू असला पाहिजे आणि त्यासाठी आपण राजसत्तेच्या व अर्थसत्तेच्या केन्द्रीकरणाला विरोध केला पाहिजे, ही जाणीव आम्हांला डॉ. लोहिया यांनी दिली. समाजवादी चळवळीला नवी दिशा डॉ. लोहियांच्या विचारांमुळे मिळाली आहे.' एस्. एम्. पुढे म्हणाले, 'राजकीय पक्षाने आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रभावी साधने वापरली पाहिजेत, असे आपण म्हणतो. डॉ. लोहिया यांनी ही कल्पना स्पष्ट करताना फावडे, तुरुंग आणि मतपेटी ही लोकशाही समाजवादी चळवळीची तीन प्रभावी साधने आहेत, असे सांगून आपल्याला योग्य मार्गदर्शन केले आहे. नवभारताच्या निर्मितीसाठी आपण श्रमिकांची सेना (लॅण्ड आर्मी) उभी केली पाहिजे, हा डॉ. लोहियांचा विधायक मार्ग मला फार मोलाचा वाटतो.'

## अशोक मेहतांची भूमिका

अशोक मेहता हेही समाजवादी पक्षाचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी समाजवादावर लिहिलेल्या ग्रंथातील विश्लेषण अत्यंत उद्बोधक होते. १९४७ ते १९५२ या काळात अशोक मेहता यांनी मुंबईमध्ये ट्रेड युनियन क्षेत्रात धडाडीने काम केले, केवळ मुंबईतच नव्हे तर समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय पातळीवरील ते एक मान्यवर नेते होते. १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकीत समाजवादी पक्षाने देशात जास्तीत जास्त जागा लढवाव्यात असा त्यांचा आग्रह होता. बिहारमध्ये समाजवादी पक्षाच्या हातात सत्ता येईल आणि काँग्रेसला पर्याय देऊ शकेल असा पक्ष म्हणून समाजवादी पक्षाला भारतात सार्वत्रिक निवडणुकीनंतर मान्यता मिळेल, असा विचार अशोक मेहता मोठ्या आत्मविश्वासाने मांडीत असत. एस्. एम्. जोशींना असे वाटे की अशोक मेहतांना जनमानस नीटसे कळले नाही. एस्. एम्. ज्या वेळी अशोक मेहतांना म्हणाले की मुंबई प्रांतात समाजवादी पक्षाला २५च्या वर जागा मिळू शकणार नाहीत त्या वेळी अशोक मेहता नाराज झाले. प्रत्यक्षात समाजवादी पक्षाला फक्त ९ जागा मिळाल्या. अशोक मेहतांचे प्रभावक्षेत्र मानल्या जाणाऱ्या मुंबईत तर पक्षाचा साफ धुव्वा उडाला. या पराभवानंतर अशोक मेहतांनी समाजवादी पक्षाला मिळालेल्या मर्यादित जागांपेक्षा मतांची टक्केवारी लक्षात घेणे महत्वाचे आहे आणि

या टक्केवारी प्रमाणे समाजवादी पक्ष हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे असे समर्थन केले. परंतु हे दुबळे समर्थन होते.

## समाजवादी पक्षातील फाटाफूट

१९५२च्या निवडणुकीतील पराभवानंतर अशोक मेहतांनी समाजवादी पक्षासमोर त्यांचा नवीन राजकीय सिद्धांत मांडला. अशोक मेहतांचे म्हणणे असे होते की, अविकसित देशातील मागास अर्थव्यवस्थेमुळे काही गोष्टी अपरिहार्य ठरतात आणि त्यांच्यांतील सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे अधिकाररूढ पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी एकमत होणारी क्षेत्रे शोधून त्या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्याने काम करून देशाचा विकास साधला पाहिजे. अशोक मेहतांच्या या भूमिकेला डॉ. लोहिया आणि मधू लिमये यांनी कडाडून विरोध केला. डॉ. लोहिया यांच्या मते विरोधी पक्ष म्हणून समाजवादी पक्षाने कॉँग्रेस विरोधाची धार अधिकाधिक तीव्र केली पाहिजे. समाजवादी पक्ष जर काही बाबतीत कॉँग्रेसशी सहकार्य करू लागला तर त्या पक्षाच्या अस्तित्वाला अर्थच उरणार नाही आणि समाजवादी पक्षाला काही दिवसांनी कॉँग्रेसमध्ये विलीनच व्हावे लागेल. अशोक मेहता आणि डॉ. लोहिया यांच्यात तीव्र वैचारिक मतभेद असले तरी प्रजासमाजवादी पक्ष फुटू नये असे एस्. एम्. जोशी आणि गोरे यांना वाटत होते. परंतु हे दोघेजण असा समझौता

पक्षात घडवून आणू शकले नाही. ते प्रजासमाजवादी पक्षातून बाहेर पडून डॉ. लोहिया, मधू लिमये, विनायकराव कुलकर्णी आदींनी समाजवादी पक्ष स्थापन केला आणि त्याचे कार्य सुरू केले. अशोक मेहतांवरील डॉ. लोहिया यांची टीका कटू वाटली तरी अशोक मेहतांच्या भूमिकेमुळे प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यावर विपरीत परिणाम झाला हे कटू सत्य होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या वेळीही अशोक मेहता आणि एस्. एम्. यांच्यामध्ये मतभेद झाले. मुंबईच्या समाजवादी पक्षामध्ये बहुसंख्य कार्यकर्त्यांनी एस्. एम्. यांच्याच भूमिकेस पाठिंबा देऊन संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या लढ्यात हिरिरीने भाग घेतला. १९६३ साली अशोक मेहतांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि डॉ. लोहिया यांचे भाकित खरे ठरले. यानंतर प्रजासमाजवादी पक्ष आणि समाजवादी पक्ष यांची एकजूट होऊन संयुक्त समाजवादी पक्ष स्थापन झाला. परंतु हे ऐक्यही अल्पकालीन ठरले. १९६५ साली वाराणसी अधिवेशनात पुन्हा फूट पडून प्रजासमाजवादी पक्ष आणि संयुक्त समाजवादी पक्ष एकमेकांपासून दूर झाले. एस्. एम्. जोशी आणि ना. ग. गोरे हे शाळेपासूनचे एकमेकांचे मित्र. यूथ लीगमध्ये दोघांनी बरोबर काम केले आणि स्वातंत्र्य लढ्यातही दोघांनी बरोबरच उडी घेतली. दोघांच्या विचारांवर मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला आणि दोघांनीही १९३४ साली समाजवादी पक्षाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. १९४२च्या

चले जाव आंदोलनात एस्. एम्. आणि गोरे या दोघांनाही ब्रिटिश सरकारने महाराष्ट्र कटाच्या खटल्यातील प्रमुख आरोपी केले होते. कारावासातून दोघांची बरोबरच सुटका झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ साली जेव्हा समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला तेव्हा दोघेही समाजवादी पक्षाचे पदाधिकारी झाले. १९५४ साली गोरे यांनी गोव्यात सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा एस्. एम्. यांनी त्यांना पाठिंबा दिला. संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणुका लढविण्याचे ठरविले त्या वेळी गोरे गोव्याच्या तुरुंगात होते. तरी देखील एस्. एम्. यांनी गोरे यांना पुण्यातून लोकसभेसाठी उभे करण्याचा निर्णय घेतला. गोरे सुटून आले आणि निवडणुकीत गोरे लोकसभेवर आणि एस्. एम्. विधानसभेवर निवडून आले. १९६५ पर्यंत दोघेजण एकत्र होते. परंतु बनारसला मात्र एस्. एम्. जोशी यांनी पक्षात फूट पडता कामा नये, अशी भूमिका घेऊन प्रजासमाजवादी पक्षातील नानासाहेब गोरे, बॅ. नाथ पै आदींना पक्षातून बाहेर पडू नये असे आग्रहाने आणि आर्जवानेही सांगितले. गोरे यांचे म्हणणे असे होते की डॉ. लोहिया यांची 'नॉन काँग्रेसिझम' ही भूमिका आणि तिच्यामुळे जनसंघ आणि कम्युनिस्ट यांच्याबरोबर आघाडी करण्याच्या त्यांचा पवित्रा प्रजा समाजवादी पक्षातील बहुसंख्य कार्यकर्त्यांना अमान्य होता. एस्. एम्. यांचे म्हणणे होते की धोरणविषयक मतभेद एकत्र बसून संपविता येतील. परंतु

गोरे यांना ते मान्य झाले नाही आणि प्रजासमाजवादी व संयुक्तसमाजवादी पक्ष एकमेकांपासून दूर झाले. एस्. एम्. जोशींनी संयुक्त समाजवादी पक्षातच राहण्याच्या निर्णय घेतला. त्या वेळी त्यांच्या प्रजा समाजवादी पक्षातील सहकाऱ्यांना फार वाईट वाटले. परंतु फूट टळू शकली नाही. समाजवादी चळवळीतली ही अत्यंत दुर्दैवी घटना झाली. महाराष्ट्रात या दोन नेत्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या फाटाफुटीमुळे तीव्र दुःख झाले. समाजवादी पक्षातील या फाटाफुटीनंतर एस्. एम्. आणि नानासाहेब गोरे एकमेकांपासून दूर होऊन दोन समाजवादी पक्षांचे अध्यक्ष झाले, यावर विशेषतः महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांनी कठोर टीका केली. एका मान्यवर संपादकांनी त्यांच्या या विषयावरील अग्रलेखाचा शेवट पुढील संस्कृत श्लोकाने केला.

यथा काष्ठंच काष्ठं च
समेयातां महोदधौ ॥
समेत्य च व्यपीयाताम्
तद्वत् भूतसमागमः ॥

## नॉन काँग्रेसिझम्

१९६७च्या निवडणुकीपूर्वी डॉ. लोहिया यांनी बहुसंख्य विरोधी पक्षांची आघाडी घडवून आणली. या आघाडीत जनसंघापासून डाव्या व उजव्या कम्युनिस्ट पक्षांपर्यंतचे

प्रमुख पक्ष, संसोपाबरोबर सामील झाले. प्रजासमाजवादी पक्षाने मात्र स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. डॉ. लोहिया यांच्या काँग्रेसविरोधी आघाडीस उत्तरेकडील काही राज्यांमध्ये चांगले यश मिळाले. मात्र लोकसभेत काँग्रेसलाच बहुमत मिळाले. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश या राज्यांमध्ये डॉ. लोहिया यांच्या पुढाकाराने संयुक्त विधायक दलाचे शासन सत्तारूढ झाले. दुर्दैवाने डॉ. लोहिया यांचे याच वेळी निधन झाले. आघाडीच्या या प्रयोगाचे नेतृत्व अन्य कोणी करू शकले नाही. आघाडीतील पक्षापक्षांचे मतभेद वाढत गेले आणि अल्पकाळातच संयुक्त विधायक दलाची सरकारे कोसळली. पुढे १९६९ साली पंतप्रधान इंदिरा गांधी आणि काँग्रेसमधील मोरारजी देसाई, कामराज, संजीव रेड्डी आदींचा गट एकमेकांपासून दूर झाले. इंदिरा गांधींनी राष्ट्रपतींच्या निवडणुकीत व्ही. व्ही. गिरी यांना पाठिंबा दिला आणि ते संजीव रेड्डींचा पराभव करून निवडून आले. यानंतर इंदिरा गांधी या अधिकाधिक आक्रमक होऊ लागल्या. १९७१ च्या निवडणुकीत इंदिरा गांधींना भरघोस यश मिळाले.

१९७१ च्या निवडणुकीनंतर प्रजा समाजवादी पक्ष आणि संयुक्त समाजवादी पक्ष यांनी पुन्हा समाजवादी ऐक्य करण्यास निर्णय घेतला आणि १९७२ मध्ये समाजवादी पक्षाची पुनर्निर्मिती करण्यात आली. एस्. एम्. आणि गोरे यांच्यात वैचारिक मतभेद झाले, तरी दोघांचा व्यक्तिगत स्नेह

कायम होता. १९६८ साली एस्. एम्. यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी फक्त एक दिवसाचा लाक्षणिक संप केला तरी सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारून तो बेकायदा ठरविला होता. एस्. एम्. यांनी पुण्यामध्ये उपोषण सुरू केले. त्या वेळी नानासाहेब गोरे रोज त्यांच्याकडे येत असत. 'जनता' या इंग्रजी साप्ताहिकात नानासाहेबांनी एस्. एम्. यांच्या उपोषणाबद्दल जो लेख लिहिला तो अत्यंत हृदयस्पर्शी होता. १९७२ साली ज्या वेळी समाजवादी पक्षात एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांचा मोठा मेळावा झाला तेव्हा या दोघांना पुन्हा एका व्यासपीठावर आलेले पाहून सर्व समाजवादी कार्यकर्त्यांना फार समाधान वाटले. एस्. एम्. भाषणात म्हणाले. 'लोकशाही समाजवाद कृतीत उतरविणाऱ्या समाजवादी पक्षाच्या झेंड्याखाली आपण सर्वांनी बंधुभावाने काम केले पाहिजे.'

## समाजवादी चळवळीचे मूल्यमापन

भारतातील समाजवादी चळवळीचे एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत आणि काही लेखांमधून जे मूल्यमापन केले आहे ते अत्यंत उब्दोधक आहे. ते पुढीलप्रमाणे आहे:

'आज १९८४ सालात भारतातील समाजवादी आंदोलनाची ५० वर्षे पूर्ण होत असताना त्या आंदोलनातील गुणदोषांचा, आमच्या कमाईचा आणि चुकांचा तटस्थ मनाने मी जेव्हा विचार करू लागतो तेव्हा बळकट, दृढनिश्चयी असा

समाजवादी पक्ष उभा करण्यात आम्ही अयशस्वी झालो हे मान्य करावे लागते. समाजवादी विचारांचा प्रचार आणि प्रसार ही एक वेगळी गोष्ट आहे. हे काम आम्ही आयुष्यभर निष्ठापूर्वक केले. परंतु खंबीर समाजवादी पक्ष आम्हाला उभारता आला नाही.

‘लोकशाही समाजवाद हा विचार मी स्वीकारला, तो प्रत्यक्षात यावा म्हणून आयुष्यभर धडपड केली कारण लोकशाही समाजवाद हाच मानवजातीला सर्वांत अधिक हितकारक विचार आहे असे मला मनोमन वाटते. लोकशाही ही जीवनपद्धती आहे. ‘मी माझे मत आग्रहाने मांडेन. ते मांडण्याचा मला हक्कच आहे. परंतु माझ्या विरोधी जर कोणाला मत मांडायचे असेल तर त्यालाही तो तितकाच अधिकार आहे. कोणी जर त्याला तो नाकारीत असेल तर मी त्याच्या हक्कासाठी त्याच्या बाजूने भांडेन.’ हा लोकशाहीचा आशय आहे. लोकशाहीमध्ये १८ वर्षांवरील सर्व स्त्री – पुरुषांना आपण मताचा अधिकार दिला कारण प्रत्येक माणसाला सत् काय आणि असत् काय ते समजते असा आपला विश्वास आहे. लोकशाही राज्यपद्धतीतील दोष, अपूर्णता यांची मला जाणीव आहे. तरीदेखील मानवाला कल्याणप्रद अशीच लोकशाही ही जीवनपद्धती आहे असा माझा दृढ विश्वास आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी सामाजिक, आर्थिक समतेवरच ती आधारलेली असली पाहिजे. सामाजिक समता आणि आर्थिक समता यांवर

आधारलेला समाज आपण निर्माण करू शकलो नाही. त्यामुळेच लोकशाहीचा फायदा आपल्या समाजातील दलितांना आणि गरिबांना मिळू शकला नाही.'

'समाजवाद म्हणजे काय याचे विस्ताराने तात्विक विवेचन मी येथे करणार नाही. मार्क्सने मांडलेल्या विचाराला त्याच्या चकालाचा संदर्भ होता. बदलत्या परिस्थितीत काही गोष्टी बदलतात, परंतु जीवनमूल्ये मात्र चिरकालीन असतात. प्रत्येक स्त्री – पुरुषाला प्रामाणिकपणे शारीरिक वा बौद्धिक कष्ट करून त्याच्या जीवनावश्यक गरजा भागविता आल्या पाहिजेत आणि स्वाभिमानाने जगता आले पाहिजेत आणि स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्त शक्तींचा पूर्ण विकास करण्याची त्याला संधी मिळाली पाहिजे. सूत्ररूपाने हा समाजवादाचा आशय आहे. लोकशाही समाजवादाला नैतिक अधिष्ठान आहे. आणि समता हे नैतिक मूल्य चिरकालीन आहे. मला अभिमानपूर्वक नमूद करावेसे वाटते की नैतिक मूल्यांची समाजवाद्यांनी जेवढी जपणूक आणि जोपासना केली तेवढी अन्य कोणत्याही पक्षाने केलेली नाही. समतेच्या मूल्याचे बियाणे समाजवाद्यांनी जपले ही त्यांची समाजवादी आंदोलनाला फार मोठी देणगी आहे असे माझे प्रांजळ मत आहे. आमच्या अपयशाचे कारण आमचे नेतृत्व कमी पडले हे आहे. अच्युतराव पटवर्धन यांनी राजकारणाचा संन्यास घेतला आणि समाजवादी पक्ष सोडून ते बाजूला

झाले. भूदान हा विचार महान आहे; परंतु जयप्रकाशजींनी भावनाप्रधान होऊन समाजवादी पक्ष सोडून भूदानाला जीवनदान करण्याची आवश्यकता नव्हती. मात्र व्यक्तिगत नैतिक आचरणाच्या दृष्टीने फार मोठे आदर्श जयप्रकाशजींनी घालून दिले. पुण्यात १९५३ मध्ये २१ दिवस प्रायश्चित्त म्हणून उपोषण करताना जयप्रकाशजींनी सांगितले, 'हिंदुस्थानातील परिस्थिती बघितल्या नंतर माझे असे स्पष्ट मत झाले आहे की मानवी जीवनाच्या म्हणून ज्या ऊर्मी आहेत, आकांक्षा आहेत, त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने मार्क्सचा द्वंद्वात्मक विरोध विकासवाद पुरेसा नाही कारण माणसाने चांगले का व्हावे याचे उत्तर त्यात मिळत नाही. चांगला माणूस आपण का व्हावे याचे उत्तर गांधीजींच्याच शिकवणुकीतून आणि त्यांच्या चरित्रातून मिळते.'

एस्. एम्. यांनी १९८४ साली एका भाषणात सांगितले, "भारतातील समाजवादी चळवळीत आर्थिक समतेच्याच विचाराला प्राधान्य मिळाले. आणि तो विचारही संघटित कामगारांच्या संदर्भातच अधिक मांडला गेला. आपल्याकडे असंघटित कामगारांचा तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचा आणि भूमिहीन शेतमजुरांचा मोठा वर्ग आहे. त्यांची गरिबी दूर झाली पाहिजे. हा विचार समाजवादी चळवळीने मांडला. परंतु त्यांना न्याय देण्यासाठी आम्ही व्यापक चळवळ करू शकलो नाही. याचा अर्थ हा की आपल्याकडे आर्थिक समतेचा विचार अंशतःच रुजला आहे.

त्याचबरोबर आपल्या देशातील आर्थिक विषमतेचे मूळही मुख्यतः सामाजिक विषमतेमध्ये आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आपल्याकडे जातींची जी उतरंड आहे त्यामुळे आपण शूद्रातिशूद्रांना ज्ञानाचे दरवाजेही शतकानुशतके बंद ठेवले आणि त्यामुळे दलित हे सर्वांत अधिक दरिद्री राहिले. आपल्या देशात आदिवासी, भटक्या विमुक्त जाती आणि जमाती यांची लोकसंख्या प्रचंड आहे. तळागाळांतील माणसांना वर आणण्यासाठी मागास समाजातील दलितांना, आदिवासींना शिक्षणामध्ये खास सवलती आणि नोकऱ्यांमध्ये राखीव प्रवेशांबाबत जागा द्याव्याच लागतील. सामाजिक समतेचा विचार अत्यंत प्रखरपणे महात्मा फुले, आगरकर आणि डॉ. आंबेडकर यांनी मांडला. परंतु तो समाजमानसात रुजला असे म्हणणे धाष्ट्याचे होईल. बाबा आढावांच्या 'एक गाव एक पाणवठा' या चळवळीत काम करताना सामाजिक विषमता अद्याप किती खोलवर गेली आहे ते मी पाहिले आहे. तसेच आपल्या पुरुषप्रधान समाजात स्त्रियांच्यावरील अन्यायही चालू आहेत. सामाजिक समतेचा विचार रुजण्यासाठी आपल्याला अद्याप कितीतरी संघर्ष करावे लागतील.'

एस्. एम्. पुढे म्हणाले, 'रचना आणि संघर्ष यांची फारकत होऊ नये अशी माझी भूमिका आहे. संघर्षवादी कार्यकर्त्यांइतकीच मला विधायक कार्यकर्त्यांबद्दलही आत्मीयता वाटते. स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींनी संघर्ष

आणि रचना यांची फारकत होऊ दिली नाही. राजकीय आंदोलन संपल्यावर गांधीजींचे निष्ठावान अनुयायी खेड्यांमध्ये जात. ग्रामसफाई, खादीप्रचार, दारुबंदी आदी विधायक कार्यक्रम हाती घेत. या कामांतूनच संघटना टिके आणि पुढे दहा वर्षांनी पुन्हा स्वातंत्र्य आंदोलन सुरू होई तेव्हा हे कार्यकर्ते त्यात धडाडीने भाग घेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रचना आणि संघर्ष हे दोन प्रवाह एकमेकांपासून अलग झाले. सर्वोदयातील कार्यकर्ते केवळ विधायक काम करीत राहिले. समाजवादी पक्षातील काही कार्यकर्त्यांनी 'अपना बाजार' सारखी ग्राहक सहकारी चळवळ उभी केली. देवरुखला मातृमंदिराचे काम चालते. पण समाजवादी कार्यकर्ते मुख्यतः संघर्षातच समील झाले. विधायक काम करणारे अनेक जण राजकारणापासून दूर झाले, हे बरोबर नव्हते.' एस्. एम्. भाषणाच्या शेवटी म्हणाले, 'संघर्षामुळेच विचारांना धार येते आणि जेव्हा तत्वांसाठी माणसे सर्वस्व देतात. त्याच वेळी परिवर्तनाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. समाजवादी पक्ष आणि त्यांनी केलेल्या चळवळीच्या यशापयशाचा ज्या वेळी मी विचार करतो त्या वेळी मी स्वतःलाच प्रश्न विचारतो की समाजवादासाठी आमचा पक्ष प्राण पणाला लावून लढला का? जो विचार आम्ही जीवननिष्ठा म्हणून स्वीकारला त्याचे आचरण करताना आम्ही अग्निदिव्य केले का? आणि मी शरमिंदा होऊन स्वतःला उत्तर देतो की आमच्यातील काही

थोर नेते आणि काही निष्ठावान कार्यकर्ते हे समाजवादी समाज निर्माण करण्यासाठी आयुष्यभर जीव ओतून प्रयत्न करीत होते. परंतु आमच्या चळवळीचा साकल्याने विचार केला तर आम्ही स्वातंत्र्य चळवळीत जसे लढलो तसे समाजवादी चळवळीत लढलो नाही. काही वेळा आमचे आपापसांत मतभेद झाले. काही वेळा थोडा काळ तरी सत्ता मिळावी म्हणून आम्ही तत्त्वे गुंडाळून ठेवून तडजोडी केल्या. आम्ही असे वागल्यामुळे समाजवादी चळवळ यशस्वी होण्याची शक्यताच मावळली. परिस्थिती बिकट आहे, काम सोपे नाही हे खरे असले तरी आमच्या चळवळीने समाजातील प्रस्थापितांपुढे जबरदस्त आव्हान उभे केले का, की क्षणिक क्षोभ निर्माण करण्यातच स्वतःला धन्य मानले, या प्रश्नाचे स्पष्ट आणि प्रामाणिक उत्तर आम्हांला दिलेच पाहिजे. समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक ती संघटना उभी करून आम्ही आपले सर्वस्व जेव्हा समाजवादी चळवळीला अर्पण करू त्याचवेळी समाजवादाचा विचार यशस्वी होण्याची शक्यता निर्माण होईल.’

# प्रकरण — ७

## ‘आणीबाणी’ विरुद्ध संघर्ष आणि जनता पक्ष

एस्. एम्. जोशी आणि जयप्रकाश हे जिवाभावाचे मित्र होते. एस्. एम्. यांना जयप्रकाशजींच्या बद्दल प्रेम आणि आदर वाटे. त्याचबरोबर ते योग्य वेळी जयप्रकाशजींना सुनावीतही असत. १९७३ साली देशातील भ्रष्टाचाराबद्दल जयप्रकाशजींनी तीव्र असमाधान व्यक्त करणारे लेख लिहिले. शासनावर त्यांनी कठोर टीकाही केली. त्यामुळे अनेक तरुणांना भ्रष्टाचार विरोधी आंदोलन करावे असे वाटू लागले. ११ सप्टेंबर १९७३ला मुंबईला ‘मणिभवन’मध्ये भरलेल्या सभेत जयप्रकाशजींना उद्देशून एस्. एम्. म्हणाले, “जयप्रकाशजी, आपणाला पक्षविरहित अशी लोकशाही या देशात यावी असे वाटते. ती जेव्हा केव्हा अवतरणार असेल तेव्हा अवतरो. पण तूर्तास, जी लोकशाही अस्तित्वात आहे ती ठीक रहावी असे आपणाला वाटते की नाही? वाटत असेल तर ती ठीक ठेवण्यासाठी आपले काही कर्तव्य उरते. देशात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे, असे इशारे आपण करता आणि मग त्यांचे नेतृत्व करण्यासाठी मात्र जाग्यावर नसता. लेख लिहून आपण लोकांना जागृत केल्यावर त्यांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी आपण स्वीकारावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.”

एस्. एम्. यांनी या भाषणात जयप्रकाशजींना जे खडे तात्त्विक बोल ऐकविले त्याचा योग्य तो परिणाम झाला. एस्. एम्. यांना काय म्हणायचे आहे ते जयप्रकाशजींच्या लक्षात आले आणि त्यांनी जनआंदोलनाचे नेतृत्व करावयाचा निर्णय घेतला. १९७४ साली गुजरातेत विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन करायचे ठरविले. तांदुळाची चोरटी निर्यात होत होती. मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांनी तेलगिरण्यांचे राष्ट्रीयीकरण लांबणीवर टाकण्यासाठी काही लाख रुपये घेतले, असा जाहीर आरोप केला जात होता. कॉलेजच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा भोजनखर्च एकाएकी तीस टक्क्यांनी वाढला. त्यामुळे ते एकदम बिथरले. ही अशांत परिस्थिती पाहून गुजरातमधील ज्येष्ठ सर्वोदयी नेते रविशंकर महाराज यांनी जयप्रकाशजींना तिकडे बोलावून घेतले. युवाशक्तीचा आविष्कार जयप्रकाशजींना दिसला, तेव्हा त्यांनी गुजरातेतील युवकांना भ्रष्टाचाराविरुद्ध व्यापक आंदोलन करण्यास सांगितले. आंदोलन सर्वत्र पसरले. चिमणभाई पटेलांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. विधानसभाही विसर्जित झाली.

## जन आंदोलन

त्याच सुमारास बिहारमधील वेगवेगळ्या राजकीय प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. तेथील काँग्रेस शासनाने हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी लाठीमार आणि

गोळीबार केला. तेव्हा विद्यार्थी, गफूर सरकारने राजीनामा द्यावा, अशी मागणी करू लागले. जयप्रकाशजींनी तरुणांना अहिंसक आंदोलन करण्याचा आदेश दिला. ८ एप्रिल १९७४ ला पाटण्यात त्यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या अभूतपूर्व अहिंसक शांती मोर्चात बिहारमधील ख्यातनाम लेखक, कवी, विचारवंत आणि कलावंत सामील झाले.

१९७४च्या एप्रिलमध्ये रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाला. ५ जूनला निघालेल्या पाटण्यातील अहिंसक मूक मोर्चावर इंदिरा ब्रिगेडच्या लोकांनी गोळीबार केला. या छर्रेबाजीचा आचार्य विनोबा भावे यांनी निषेध न केल्यामुळे जयप्रकाशजी फार अस्वस्थ झाले. या वेळी एस्. एम्. सतत जयप्रकाशजींबरोबर होते. ते दोघेजण वर्धा येथील सर्व सेवा संघाच्या संमेलनास गेले. सर्वोदयाच्या नेत्यांमध्ये मतभेद झाले. एस्. एम्. म्हणाले, ‘अन्याय आणि भ्रष्टाचार, या विरुद्ध लढावयास आम्हांला महात्मा गांधींनीच शिकवले. जयप्रकाशजी आज तरुणांना तेच सांगत आहेत.’ सर्व सेवा संघाच्या कार्यकर्त्यांमध्ये एकमत होईना. तेव्हा आचार्य विनोबा भावे म्हणाले, ‘ज्यांना कुरूक्षेत्रावर लढण्यासाठी जायचे असेल त्यांनी पाटण्यास जावे. ज्यांना युद्ध करावयाचे नसेल त्यांनी सर्वोदयास वाहून घ्यावे.’ एस्. एम्. यावर म्हणाले, ‘आम्ही आता पाटण्यास जाऊन जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली जन आंदोलन सुरू करणार आहोत.’

१९७५ च्या फेब्रुवारी महिन्यात जयप्रकाशजींनी विरोधी पक्षांच्या सर्व पुढाऱ्यांची बैठक बोलावली. त्यांनी एस्. एम्. यांना लिहिले, ‘या बैठकीस तू येणे आवश्यक आहे’ एस्. एम्. प्रथम दिल्लीस गेले आणि १५ फेब्रुवारीस पाटण्यात विरोधी पक्ष नेत्यांच्या बैठकीस हजर राहिले. जयप्रकाशजींनी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन भ्रष्टाचार विरोधी लढा करावा, असे सांगितले. तेव्हा चौधरी चरणसिंग आणि अन्य काही नेत्यांनी विनंती केली की, जयप्रकाशजींनी पुढाकार घेऊन तेथे जमलेल्या सर्व पक्षांना आपापले पक्ष बरखास्त करावयास लावावेत आणि सर्वांचा मिळून एक पक्ष बनवावा. यावर जयप्रकाशजी म्हणाले, ‘हे माझे काम नाही. हे सर्व तुमचे राजकारण आहे. मला केवळ राजकीय लढा द्यावयाचा नाही. मला समाजपरिवर्तन करावयाचे आहे.’ एस्. एम्. यांनी जयप्रकाशजींच्या भूमिकेस पाठिंबा दिला. बैठकीहून पुण्यास परत आल्यावर एस्. एम्. यांनी ‘साधना’ या साने गुरुजींनी सुरू केलेल्या साप्ताहिकात लिहिले की, समाजपरिवर्तनाच्या चळवळीला केवळ सत्तासंघर्षाचे रूप आले तर आपले उद्दिष्ट सफल होणार नाही. एस्. एम्. यांनी त्या लेखात लिहिले, ‘‘जे. पीं. चे ध्येय विरोधी पक्ष उभा करणे, हे नाही. त्यांना तो उपद्व्याप करायला सांगणे म्हणजे ज्या रांजणाला तळाशी छिद्र आहे तो भरायला सांगण्यासारखे आहे. इंदिराबाईंच्या राज्यातील भ्रष्टाचाराला जयप्रकाशजींचा आणि माझा विरोध आहे. या अधःपाताला

त्या जबाबदार आहेत. परंतु केवळ त्यांना सत्तेवरून हटवून समाजपरिवर्तन होणार नाही, हे विसरू नका.'

जयप्रकाश नारायण यांनी ६ मार्चला दिल्लीत भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला. मोर्चाच्या प्रचारासाठी एस्. एम्. दिल्लीत गेले. चंद्रशेखर आणि मोहन धारिया हे दोघेही काँग्रेसमध्ये होते. त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या भ्रष्टाचार विरोधाच्या भूमिकेस पाठिंबा दिला. तेव्हा इंदिरा गांधींनी २ मार्चला धारियांना मंत्रिमंडळातून काढून टाकले. ६ मार्चचा मोर्चा फारच प्रचंड होता. या मोर्चाने जनतेच्या मागण्यांची सनद लोकसभेला आणि राज्यसभेला सादर केली.

## संपूर्ण क्रान्ती

जयप्रकाशजींना आमूलाग्र समाजपरिवर्तन हवे होते. राजकारणामुळे होणाऱ्या भ्रष्टाचाराला त्यांचा तीव्र विरोध होता. त्याचप्रमाणे आपल्या समाजातील सामाजिक विषमतेला, जातींच्या उतरंडीला, अस्पृश्यतेला त्यांचा विरोध होता. जयप्रकाशजींना पाठिंबा देणाऱ्यांमध्ये ज्याप्रमाणे समाजवादी विचारांचे तरुण होते, त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही कार्यकर्ते होते. एस्. एम्. आंदोलनात येणाऱ्या तरुणांना विचारीत, 'जयप्रकाशजी ज्या वेळी संपूर्ण क्रांतीची भाषा बोलतात, त्या वेळी ते जातिव्यवस्थेचे निर्मूलन झाले पाहिजे, असे सांगतात. हे

करण्याची तुमची तयारी आहे का?' अस्पृश्यतेचे निमूर्लन झाले पाहिजे, हे सर्व तरुणांना मान्य होते. परंतु 'जानवी तोडा', 'हुंडा घेऊ नका' आदी गोष्टी चळवळीत नकोत, असे संघातील प्रमुख कार्यकर्त्यांनी एस्. एम्. यांना सांगितले. ६ मार्चला दिल्ली येथे झालेल्या मोर्चामुळे जयप्रकाशजींचे आंदोलन बिहारपुरते मर्यादित न राहता देशव्यापी झाले. अनेक विचारवंत जयप्रकाशजींच्या आंदोलनाला पाठिंबा देत होते. अशा विचारवंतांमध्ये सुप्रीम कोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश बॅ. तारंकुडे हेही होते. जयप्रकाशजी आणि तारकुंडे यांची चर्चा झाल्यावर 'सिटीझन्स फॉर डेमॉक्रसी' अशी संस्था काढून नागरी हक्काच्या संरक्षणाचे कार्य या संघटनेने करावे, असे ठरले. बॅ. तारकुंडे आणि एस्. एम्. हे शाळेपासून एकमेकांचे मित्र होते. एस्. एम्. बॅ. तारकुंडे यांना म्हणाले, 'महाराष्ट्रात मी तुम्हाला सिटीझन्स फॉर डेमॉक्रसीच्या कामासाठी धडाडीचे कार्यकर्ते मिळवून देईन.' एस्. एम्. यांनी महाराष्ट्रातील विचारवंतांना नागरी हक्काच्या संरक्षणासाठी स्थापन झालेल्या या संघटनेत येण्याचे आवाहन केले आणि समाजवादी पक्षातली काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांवर ही संघटना वाढविण्याचे काम सोपविले.

मे १९७५ मध्ये पुण्याजवळ हडपसर येथे देशातील प्रमुख समाजवादी कार्यकर्त्यांचे एक शिबिर झाले. शिबिरात एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, मधू लिमये, कर्पूरी ठाकूर, हरभजनसिंग, मधु दंडवते आदी नेत्यांनी भाग

घेतला. इंदिरा गांधींनी सर्व राजकीय विरोधकांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला असल्यामुळे अल्पावधीत संघर्ष सुरू होईल, असे सर्वांचे मत पडले. एस्. एम्. जोशी चर्चेत म्हणाले, 'मला केवळ राजकीय संघर्षात रस नाही. इंदिरा गांधींना विरोध केला पाहिजे. राजकीय लढा टाळता येणार नाही. टाळूही नये. परंतु तो करताना या देशातील गरिबांना आणि दलितांना न्याय मिळवून देणे, हे आपले आद्य कर्तव्य आहे याचा विसर पडून चालणार नाही.'

१२ जूनला अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींना सहा वर्षे निवडणुकीस उभे राहण्यास अपात्र ठरविण्याचा निर्णय दिला. हा निर्णय अनपेक्षित होता. एस्. एम्. यांनी या निर्णयानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले, 'इंदिरा गांधींनी राजीनामा देणे त्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य होईल. त्यामुळे न्यायसंस्थेच्या आब सत्तारूढ पक्ष राखतो, हेही दिसून येईल.' परंतु इंदिरा गांधींनी राजीनामा दिला नाही.

२५ जूनला दिल्लीत रामलीला मैदानावर इंदिरा गांधींचा राजीनामा मागण्यासाठी जयप्रकाशजींनी जाहीर सभा घेतली. या विराट सभेत भाषण करताना जयप्रकाश नारायण यांनी लष्करातील शिपायांना उद्देशून सांगितले, "लष्करी शिपायांना कायद्याच्या विरोधी असलेला हुकूम कोणी दिला तर तो त्यांनी नाकारावा."

या त्यांच्या भाषणाच्या आधारे, जयप्रकाशजी लष्करात बंडखोरी माजवू बघतात, असा आरोप करून त्यांना अटक करण्यात आली आणि इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. मोरारजी देसाई, चंद्रशेखर, अटलबिहारी बाजपेयी, चौधरी चरणसिंग, मधू लिमये, मधु दंडवते, आदी नेत्यांनाही अटक करण्यात आली. एस्. एम्. यांना मात्र अटक करण्यात आली नव्हती. नानासाहेब गोरे हे त्या वेळी अमेरिकेत गेले होते. ते राज्य सभेचे सदस्य होते. त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधींना तार केली. 'जर अजूनही आपण मला आपला मित्र मानीत असाल, तर आणीबाणी जाहीर करण्याचे पाऊल मागे घ्या.' नानासाहेब लागलीच अमेरिकेतून भारतात परत आले. त्यांनाही अटक करण्यात आली नाही.

## 'साधना'चे अग्निदिव्य

आणीबाणी सुरू झाल्यावर 'साधना' साप्ताहिकाचे काय करावयाचे, हा प्रश्न एस्. एम्. पुढे आला. कारण ते 'साधना ट्रस्ट'चे कार्यकारी विश्वस्त होते. सानेगुरुजींनी १५ ऑगस्ट १९४८ला 'साधना' साप्ताहिक सुरू केले.

साने गुरुजींच्या निधनानंतर आचार्य जावडेकर, रावसाहेब पटवर्धन यांनी 'साधने'ची जबाबदारी सांभाळली आणि १९५७ पासून यदुनाथ थत्ते यांनी सानेगुरुजींचा वारसा समर्थपणे चालविला होता. विश्वस्तांच्या सभेत एस्. एम्.

म्हणाले, ‘साने गुरुजी आज जसे वागले असते त्याप्रमाणे ‘साधने’चे स्वरूप आपण ठेवले पाहिजे.’ यावर यदुनाथ थत्ते म्हणाले, ‘मला एस्. एम्. यांचे म्हणणे संपूर्णतया मान्य आहे. मला असे वाटते की, आपण आणीबाणीचा तीव्र निषेध करणारा एकदम जहाल अंक काढावा आणि सरकारने छापा टाकून तो जप्त केला तर ‘साधने’चे प्रकाशन बंद करावे.’’ अच्युतराव पटवर्धन यांनी मात्र, ‘खालच्या पट्टीत विरोध सुरू करा आणि मग विरोध वाढवीत न्या, असा सल्ला दिला; आणि ते त्यांचे म्हणणे एस्. एम्. यांना मान्य झाले. संपादक म्हणून यदुनाथ थत्ते यांचे नाव पूर्ववत् ठेवायचे, अंकातील लेखन कोणत्याही नावाने छापायचे नाही आणि ‘साधना’मधील सर्व लेखनाबद्दल यदुनाथ थत्ते हेच जबाबदार असल्याची भूमिका घ्यायची, असा निर्णय झाला. प्रथम मुखपृष्ठ तेवढे काळे छापले आणि ‘साधना’ च्या अंकात ‘गजाआडून आलेली पत्रे’ मिस्किल टवाळी करणाऱ्या कविता, विधान सभेचे आणि लोकसभेचे वृत्त, अशी सदरे सुरू केली. त्याचप्रमाणे आणीबाणीच्या विरोधी अनामिकांच्या मुलाखतीही ‘साधना’त प्रसिद्ध होऊ लागल्या. पुण्याचे डे. पोलिस कमिशनर हे पोलिसांना घेऊन ‘साधना’वर धाड घालण्यासाठी आले. एस्. एम्. यांनी तत्काळ फोन केला, ‘साधना प्रेस म्हणजे केवळ साप्ताहिकांचे कार्यालय नाही. तेथे ‘आन्तरभारती’ कार्यालय आहे. ‘साधना प्रकाशन’चेही ते कार्यालय आहे. आम्ही पुस्तके छापतो आणि विकतो. तो व्यापारी छापखाना

आहे. एस्. एम्. च्या या फोनमुळे ‘साधना प्रेस’ बंद होण्याचे टळले. जयप्रकाश नारायण यांनी तुरुंगात जी डायरी लिहिली होती तिचा अनुवाद कंपोज करण्याचे काम ‘साधना’ प्रेसमध्ये चालू असताना ‘साधना’ची झडती घेण्यासाठी पोलिस आले. त्या वेळी ‘साधना ट्रस्ट’चे विश्वस्त सचिव नाना डेंगळे यांनी झडती घेऊ दिली. परंतु त्याचवेळी जयप्रकाशजींच्या ‘स्वगत’चा मजकूर जुळविण्याचे काम ‘साधना प्रेस’मध्ये चालू होते हे पोलिसांना समजलेच नाही. ‘साधना’मध्ये गांधीजयंतीस गांधींच्या लेखनातील स्वातंत्र्याचे समर्थन करणारे, ‘निर्भय बना’ हा संदेश देणारे, उतारे छापले होते. त्या वेळच्या संदर्भात तो सर्व मजकूर सरकारला आणीबाणीच्या विरोधातील वाटला. सरकारने साधना प्रेसला टाळे ठोकले. ‘साधना’ने हायकोर्टात जाण्याचे ठरविले. ‘साधना’ कार्यालयास टाळे लावण्यास हायकोर्टाने स्टे दिला आणि पुढे लागतीच तो खटला सुरू झाला. त्या वेळी ‘सिटीझन्स फॉर डेमॉक्रसी’ या संस्थेत काम करणारे ॲड. सी. आर. दळवी, ॲड. एम. ए. राणे या नामवंत कायदेपंडितांनी ‘साधना’ साप्ताहिकाची बाजू समर्थपणे हायकोर्टात मांडली आणि न्यायमूर्ती तुळजापूरकर यांनी ‘साधना’च्या संपादकांच्या बाजूने निर्णय देताना ‘साधना’ साप्ताहिकातील मजकूर देशहिताच्या विरोधी नाही, असा स्पष्ट अभिप्राय दिला. हा ‘साधना’चा आणि ती भूमिका घेणाऱ्या एस्. एम्. आणि यदुनाथ थत्ते यांचा विजय होता.

नागरी स्वातंत्र्याच्या लढ्यातील तो महत्त्वाचा विजय होता. पुढे सरकारने ‘साधना’ साप्तहिकावर बंदी घातली. तेव्हा ‘कर्तव्य’ या नावाखाली ‘साधने’चे कार्य चालू ठेवण्यात आले.

## जनजागृती

नानासाहेब गोरे यांनी राज्यसभेत निर्भयपणे आणीबाणी वर टीका केली आणि लोकशाही पुन्हा प्रस्थापित करावी, अशी आग्रहाने मागणी केली. एस्. एम्. त्या वेळी खेड्यापाड्यांत जाऊन आणीबाणीसंबंधीचे विचार लोकांना समजून सांगत. एकदा सासवडजवळच्या एका खेड्यात ते गेले आणि त्यांनी इंदिरा गांधींचे सरकार अन्याय कसा करते ते सांगितले. सभा संपल्यावर एक शेतकऱ्याने एस्. एम्. च्या घरी चहा प्यायला बोलाविले, म्हणून ते त्याच्याकडे गेले. तो शेतकरी एस्. एम्. ना म्हणाला ‘आम्हांला तुमचं म्हणणं पटतं पण तुम्ही लोक पन्नास पक्षांत वाटलेले आहात, त्यामुळे तुम्हांला मत देऊन उपयोग होत नाही. त्यामुळे दारुडा नवराही बाईला खपवून घ्यावा लागतो, तसं आमचं झालंय. तुम्ही थोडी आशा दाखवली की काँग्रेसचा पराभव होऊ शकेल, तर आम्ही तुम्हांला मत देऊ.’ एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत हा अनुभव सांगून शेवटी लिहिले आहे. ‘एका चहाच्या कपाबरोबर केवढी चालना दिली त्या शेतकऱ्याने माझ्या विचारांना. मी त्याचे प्रबोधन करायला

गेलो होतो. पण मीच प्रबोधित होऊन आलो. आणीबाणी घालवायची असेल तर आपल्याला असे काही करावे लागेल या दिशेने माझ्या विचारांना चालना मिळाली.'

एस्. एम्. आणि नानासाहेब गोरे हे दौरे काढून नागरिकांचे स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित झाले पाहिजे, असे सांगत. कार्यकर्ते या बैठका आयोजित करीत. शहरात सभा घेणे शक्य होत नसे. आणीबाणीला सहा महिने झाल्यावर, एस्. एम्. नानासाहेब, डॉ. मंडलिक आणि प्रभुभाई संघवी यांनी, ज्या कुटुंबांतील मिळवत्या पुरुषाला 'मिसा' खाली तुरूंगात डांबण्यात आले होते, त्या कुटुंबांत प्रापंचिक खर्चासाठी दरमहा पैसे पाठविण्याचा निर्णय घेतला. अशा मदतीसाठी फक्त 'साधना' आणि 'भूमिपुत्र' या वर्तमानपत्रांतून आवाहन केले गेले. एस्. एम्., गोरे, आचार्य वि. प्र., लिमये, दादा धर्माधिकारी यांनी हे आवाहन केले आणि काही मित्रांना पत्रे लिहिली. लागलीच मदतीचा ओघ सुरू झाला. पैसे गोळा करणे, ते योग्य ठिकाणी पोहोचविणे, पैशांचा हिशोब ठेवणे ही कामे प्रभुभाई संघवी, लालजी कुलकर्णी, वामन भिडे, एकनाथ कोपर्डे, राजा चिंबुलकर आदींनी चोखपणे केली. एस्. एम्. म्हणाले, 'आपण हे केले पण जेलमध्ये आपल्या मित्रांची बौद्धिक भूकही आपण भागवली पाहिजे. त्यांना वाचण्यासाठी पुस्तके पाठवली पाहिजेत.' हे काम राष्ट्र सेवादलाचे विठूभाऊ वैद्य आणि त्यांची मुलगी मीना यांनी नियमाने केले. बंगलोरच्या तुरुंगात

मधु दंडवते, एस्. एन्., मिश्रा, लालकृष्ण अडवाणी ही मंडळी होती. दंडवत्यांना खूप पुस्तके हवी असायची. विठूभाऊंनी ती सारी पाठवली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनाही विठूभाऊंनी पुस्तके पाठविली. पुण्यातील एक प्रकाशकही या योजनेत हवी ती पुस्तके पाठवीत. एस्. एम्. आणि गोरे लखनौ, पाटण्यापासून देशातील सर्व प्रमुख तुरुंगांतील राजबंद्यांना भेटून आले. एस्. एम्. नेहमी म्हणत, "आम्हां राजकीय कार्यकर्त्यांचे एक कुटुंब आहे असे मी आयुष्यभर मानले." एस्. एम्. या आपल्या राजकीय कुटुंबीयांना सतत आधार देत, सल्ला देत, कधी त्यांची वडीलकीच्या नात्याने कानउघडणीही करीत, म्हणूनच कार्यकर्त्यांना ते आधारवड वाटत. आणीबाणीत आम्हां सर्वांना याचा उत्कट अनुभव आला.

५ नोव्हेंबर १९७५ला जयप्रकाशजींचे दोन्ही मूत्रपिंड निकामी झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. १२ नोव्हेंबरला त्यांना पॅरोलवर सोडण्यात आले आणि २३ नोव्हेंबरला मुंबईत जसलोक हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले. डॉ. मंडलीक एस्. एम्.ना म्हणाले, 'जयप्रकाशजी फार दिवस जगतील असे मला वाटत नाही.' एस्. एम्.ना हे ऐकून मोठा धक्काच बसला. जसलोकमधील डॉक्टरांचे हेच निदान होते. परंतु आठवड्यातून तीन दिवस 'डायलेसिस' करून ते कसेबसे वाचले. जे. पीं. च्या मूत्रपिंडाचे कार्य पार

पाडण्यासाठी यंत्र विकत घ्यायचे ठरले. एस्. एम्. आणि त्यांचे सहकारी यांनी ६ लाख रुपये जमविले. इंदिरा गांधींनी ९० हजार रुपयांचा ड्राफ्ट पाठविला. एस्. एम्., जे. पीं.ना म्हणाले, 'आपण हे पैसे स्वीकारू नयेत, असे मला वाटते.' जयप्रकाशजींनी त्यांचा सल्ला ऐकला. त्यांनी इंदिरा गांधींना आभाराचे पत्र लिहिले आणि पंतप्रधान निधीतील या पैशाचा उपयोग नैसर्गिक आपत्तीच्या वेळी करावा, असेही लिहिले.

जयप्रकाशजी आजारी असताना काही सर्वोदयवाद्यांनी सत्याग्रहाची चळवळ मागे घ्यावी, असे सुचविले. तेव्हा एस्. एम्. आणि गोरे यांनी या सूचनेला विरोध केला. त्या दिवशी संध्याकाळी एस्. एम्. आणि नानासाहेब गोरे, जयप्रकाशजींकडे गेले, तेव्हा जे. पी. म्हणाले, "एसेम्, आप सुबह कह रहे थे की हम लोगों तो कुछ करना चाहिये। मगर मैं आपसे यह पूछना चाहता हूँ कि इंदिराजी तो डेमॉक्रसी नही चाहती तो हमारा कोई कर्तव्य है या नही?" एस्. एम्. यावर म्हणाले, 'आपले कर्तव्य जरूर आहे. आपण उपक्रमशीलता दाखवून आपल्या बाजूने त्यांना एक पत्र लिहावे.' नानासाहेब गोऱ्यांनी पत्राचा मसुदा तयार केला आणि जयप्रकाशजींनी तो मान्य केला. त्यात त्यांनी लिहिले होते, 'मी एकटा काही चळवळ मागे घेण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. माझे जे सहकारी आहेत त्यांनी मला मदत केली, त्यांच्यापैकी काहींना मला भेटावे लागेल.' जयप्रकाशजींनी नंतर कोणाला भेटले पाहिजे, त्या नावांची

यादी दिली. जयप्रकाशजींनी आपण होऊन पत्र पाठविले, परंतु इंदिरा गांधींच्याकडून पत्राची साधी पोचही आली नाही.

१६ — १७ — १८ जानेवारीला १९७७ जयप्रकाशजींनी पाटण्याला बैठक घेतली. बैठकीत एस्. एम्., नानासाहेब गोरे आणि शंभर एक सर्वोदयवादी कार्यकर्ते आले होते. बैठकीचा निर्णय असा झाला की, दोन महिने दौरे करून सत्याग्रही नोंदवावयाचे आणि दोन महिन्यांनी पुनः सत्याग्रह मोहीम सुरू करावयाची. एस्. एम्. सभा आटोपून घरी आले आणि जयप्रकाशांनी त्यांना सांगितले की, मार्चमध्ये लोकसभेच्या निवडणुका घेण्याचे इंदिराजींनी आकाशवाणीवरून जाहीर केले. एस्. एम्. यावर आनंदाने म्हणाले, 'तर मग आपली योजना यशस्वी झाली असे म्हणावयास हवे. कारण आपण नव्याने सत्याग्रह करण्याचे ठरवीत होतो. आता ते करण्याचे कारणच नाही. आपण निवडणुकीद्वारेच सरकारशी लढू.'

## जनता पक्षाची स्थापना

श्रीमती गांधींनी आकाशवाणीवर निवडणुकीची घोषणा करण्यापूर्वी मोरारजीभाई प्रभृती सर्व नेत्यांची सुटका करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे सर्व नेत्यांची सुटका झाली. त्या आठवड्यात सर्व कार्यकर्तेही सुटले आणि अखेर आणीबाणी संपली. जयप्रकाशजी एस्. एम्. ना म्हणाले,

‘आपण सर्वांचा मिळून एक पक्ष करून निवडणूक लढवली पाहिजे.’ एस्. एम्. नी त्यांच्या सुचनेला पाठिंबा दिला आणि ते नेत्यांची मने वळविण्याच्या कामाला लागले. मोरारजी देसाई, चौधरी चरणसिंग आदी नेते प्रथम सावधपणे शंका व्यक्त करीत होते. परंतु जयप्रकाशजी त्यांच्या भूमिकेवर ठाम होते आणि त्यांच्या पाठिंब्याशिवाय निवडणुकीत यश मिळणार नाही, हे ओळखण्याइतके शहाणपण या नेत्यांजवळ होते. पक्षाच्या नावावर थोडी खळखळ झाली. अखेर सुरेन्द्र मोहन यांनी सुचविलेले ‘जनता पक्ष’ हे नाव सर्वांना मान्य झाले. ‘जनता पक्ष’ या नावाने निवडणुका लढविण्यात आल्या. महाराष्ट्रात जनता पक्ष कसा बनवायचा, याचा विचार झाला तेव्हा सर्वजण म्हणाले, ‘एसेमनी अध्यक्ष झाले पाहिजे. एस्. एम्. यांनी ते मान्य केले. एस्. एम्. आणि गोरे या दोन ज्येष्ठ नेत्यांनी निवडणुकीस उभे रहावयाचे नाही, असा निर्णय घेतला. निवडणुकीत जनता पक्षाला चांगली मते मिळतील इतकेच एस्. एम्. यांना वाटत होते. परंतु आणीबाणीच्या काळात अन्याय मूकपणे सोसणाऱ्या जनसामान्यांनी आणीबाणी असलेला त्यांचा विरोध मतपेटीद्वारा व्यक्त केला आणि निवडणुकीत ‘जनतापक्षा’स भरघोस पाठिंबा दिला. जनता पक्षाला–गजीवनरामबाबूंचा लोकशाहीवादी कॉंग्रेस पक्ष आणि अन्य मित्रपक्ष मिळून तयार झालेल्या आघाडीला लोकसभेच्या ५४४ पैकी ३७४ जागा मिळाल्या. त्यांपैकी उत्तर भारतात ३३० जागा मिळाल्या.

जयप्रकाश नारायण दक्षिण भारतात दौरा काढू शकले असते तर तेथेही अधिक जागा मिळाल्या असत्या. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला केवळ १५२ जागा मिळाल्या. इंदिरा गांधी यांचा निवडणुकीत राजनारायण यांनी पराभव केला. 'निवडणुतील विजय हे जयप्रकाशजींच्या विभूतिमत्वाला जनतेने केलेले अभिवादन आहे, असे उद्गार आचार्य दादा धर्माधिकारी यांनी काढले. निवडणुकीच्या निकालानंतर दिल्लीमध्ये सर्व घटक पक्षांच्या बैठकी झाल्या. 'संघटना काँग्रेस', 'लोकदल', 'समाजवादी पक्ष', 'लोकशाहीवादी काँग्रेस' आणि 'भारतीय जनता संघ' या सर्व पक्षांनी आपापले पक्ष बरखास्त करून जनता पक्षात विलीन व्हावयाचे, असा निर्णय घेतला. समाजवादी पक्षाच्या बैठकीत काही कार्यकर्त्यांनी, घटक पक्षांनी आपापले अस्तित्व कायम ठेवून जनता पक्ष हा 'फेडरल पक्ष' करावा, अशी सूचना केली, तेव्हा एस्. एम्. म्हणाले, 'आपण सर्वजण आणीबाणीविरुद्ध एकत्र लढलो. निवडणुका जनता पक्ष म्हणून लढविल्या. लोकशाहीच्या रक्षणासाठी आपण आता आपला पक्ष जनता पक्षात सर्मपण भावनेने विलीन केला पाहिजे.' एस्. एम्. तीव्रतेने बोलले आणि त्यामुळे कार्यकर्त्यांनी त्यांचे म्हणणे मान्य केले; परंतु अनेकांच्या मनात जनसंघ आपले अस्तित्व कायम ठेवील, अशी शंका होती. जनसंघाने जनता पक्षात विलीन होण्यास मान्यता दिली, परंतु त्या पक्षाच्या कामगारांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये काम

करणाऱ्या संघटनांचे स्वतंत्र अस्तित्व चालूच राहील, असेही जाहीर केले. जनता पक्ष १ मे १९७७ला अधिकृतरित्या अस्तित्वात आला.

जनता पक्षाच्या नेता निवडीच्या प्रश्नाबाबत एस्. एम्. आणि नानासाहेब गोरे या दोघांनाही जगजीवनरामबाबू यांनाच नेता निवडावे असे वाटत होते. परंतु हा प्रश्न जयप्रकाश नारायण आणि आचार्य कृपलानी यांच्या लवादाकडे सोपविण्यात आला. आचार्य कृपलानी यांनी मोरारजीभाई नेते झाल्याची घोषणा केली. याबाबत एस्. एम्. नी आत्मकथेत स्पष्टपणे पुढील प्रमाणे लिहिले आहे – "आज तटस्थ मनाने झालेल्या चुकांचा शोध घेत असता माझ्या दृष्टीने हिमालयाएवढी झालेली चूक म्हणजे नेत्याची रीतसर निवडणूक न करता लवादाने तो निर्णय दिला ही होय."

## पु. लो. आ. सरकार

महाराष्ट्रात जनता पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही, याचे मुख्य कारण शेतकरी कामगार पक्षाशी जागावाटपाबाबत समझोता करावा, हे एस्. एम्. यांचे म्हणणे जनता पक्षात मान्य झाले नाही. जनता पक्षाला बहुमत नव्हते तरी डॉ. बापू काळदाते यांना विधिमंडळपक्षाचे नेते केले असते तर मंत्रिमंडळ बनविण्याची शक्यता होती. परंतु तेथेही एस्. एम्. यांचा सल्ला डावलला गेला आणि काळदाते हे

लोकसभेचे सदस्य असल्यामुळे त्यांना विधिमंडळ पक्षाचा नेता करू नये, असा निर्णय जनता पक्षाच्या पार्लमेंटरी बोर्डाने घेतला. त्यानंतर वसंतदादा पाटील आणि तिरपुडे यांचे संमिश्र मंत्रिमंडळ काही काळ अधिकारूढ झाले. या मंत्रिमंडळात शरद पवार हे मंत्री होते. परंतु ते आणि त्यांचे काही सहकारी यांनी काँग्रेस पक्ष सोडण्याचे ठरविले. त्यामुळे वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ कोसळले. यानंतर जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, लोकशाही काँग्रेस आणि शरद पवार यांचा गट मिळून पुरोगामी लोकशाही आघाडी स्थापना झाली आणि शरद पवार नेते होऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. पक्ष सोडलेल्या शरद पवारांना पुरोगामी लोकशाही आघाडीचे नेते करण्याच्या निर्णयात एस्. एम्. यांचा मोठा वाटा होता. काही जणांच्या मताने एस्. एम्. यांनी शरद पवारांना मुख्यमंत्री करावयास नको होते. परंतु जनता पक्षाचे आमदार सत्तेवर येण्यास उतावीळ झाले होते आणि त्यांच्या आग्रहास एस्. एम्. यांनी मान्यता दिली. या त्यांच्या निर्णयात स्वार्थ नसला, तरी काहीशी तत्त्वच्युती होती असे मला वाटते. मात्र शरद पवार यांचा गट स्वतंत्र राहिला, जनता पक्षात विलीन झाला नाही. त्यामुळे पक्षांतर करणाऱ्या व्यक्तीस मुख्यमंत्री केल्याचा आक्षेप एस्. एम्. यांच्यावर कोणाला घेता आला नाही, हेही मान्य करावे लागेल.

दिल्लीमध्ये जनता पक्षाच्या घटक पक्षांमध्ये सतत कुरबुरी चालू होत्या कारण विलीनीकरण झाले तरी मनोमीलन झाले नाही. एस्. एम्. सत्तेच्या राजकारणापासून दूर असले तरी त्यांना या आपापसातील सत्तास्पर्धेबाबत चिंता वाटत होती.

### नाग बांधवाशी संपर्क

याच वेळी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी एस्. एम्. जोशींवर एक महत्वाची कामगिरी सोपविली. ईशान्येकडील राज्यांपैकी नागालँडमधील नेते फिझो यांचा भारतात विलीन होण्यासच विरोध होता. फिझो हे १९४२ पर्यंत राजकारणापासून दूर होते. परंतु १९४३ साली ते सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेचे सैनिक बनले. ब्रिटिश फौजांनी पुन्हा ब्रह्मदेश काबीज केल्यावर आझाद हिंद सेनेतील ज्यांना अटक केली त्यांमध्ये फिझो हे होते. त्यांची १९४५ साली तुरुंगातून मुक्तता झाली. १९४७ साली भारत स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र होत असताना, नागभूमी हे छोटे सार्वभौम करावे अशी भूमिका फिजो यांनी घेतली. १९४७ साली आसामचे राज्यपाल सर अकबर हैदरी यांनी जो करार केला त्यात नागांच्या सार्वभौम राष्ट्रास मान्यता दिलेली नव्हती; त्यामुळे फिझो हे नागा नॅशनल कौन्सिलमधून बाहेर पडले आणि त्यांनी ‘पीपल्स इंडिपेन्डन्स लीग’ची स्थापना केली. या संघटनेमार्फत त्यांनी आंदोलन सुरू केले. फिझो

भूमिगत झाले आणि आंदोलन हिंसक बनले. तेव्हा सुरक्षा दलाने त्यांचा बंदोबस्त केला. १९५७ साली फिझो नागभूमी सोडून पळाले. बंड शमले तरी नागभूमीत असंतोष चालूच राहिला. जयप्रकाशजींनी या समस्येत लक्ष घालून १९६४ साली काही प्रमाणात तणाव कमी केला. त्यांच्या शांति प्रस्तावातील शर्ती भारत सरकार आणि नाग बंडखोर यांनी मान्य केल्या. एस्. एम्. लोकसभेवर निवडून गेल्यावर १९६८ साली नागभूमीची समस्या समजून घेण्यासाठी कोहिमा येथे गेले. भूमिगत नागांच्या नेत्यांना ते भेटले. हे नागबांधव फिझोंना अनुकूल होते. एस्. एम्. त्यांना म्हणाले, 'छे छे, तूर्त आम्हाला विकासाची मुळीच गरज नाही. विकासाच्या नादी लागले की लोक ढिले पडतात, लोभी होतात. आम्हांला प्रथम आमचा राजकीय प्रश्न सोडवून घ्यावयाचा आहे.'

परंतु तो प्रश्न १० वर्षे सुटलाच नाही. १९७७ साली जनता सरकार सत्तारूढ झाल्यावर नागनेते जयप्रकाशजींच्याकडे आले आणि म्हणाले, 'आता तुमच्या हातात सत्ता आहे. तुम्ही आम्हाला मदत करा.' जयप्रकाश त्यांना म्हणाले, 'मी विकलांग झालो आहे. पण एस्. एम्. जोशींना तुमच्या प्रश्नात आस्था आहे. त्यांच्याशी तुम्ही बोलू शकता.' जयप्रकाशजींच्या सांगण्याप्रमाणे एस्. एम्. नागलॅण्डमध्ये गेले त्यांनी तेथील बुजुर्गांशी आणि युवकांशीही चर्चा केली. आदिवासींच्या पंचायती कशा

चालतात तेही पाहिले. नाग मंडळींनी त्यांची बाजू एस्. एम्. पुढे मांडली. त्यांच्या म्हणण्यात काहीसा अर्थ होता, असे एस्. एम्. यांना वाटले, भारतात स्वायत्त राज्य म्हणून राहण्यातच नागांचे हित आहे. हे एस्. एम्. यांनी सांगितले. परंतु त्या नाग नेत्यांना ते पटले नाही.

फिझो हे १९५७ पासून इंग्लंडमध्ये राहत होते. त्यांनी पंतप्रधान मोरारजींना पत्र लिहून भेटण्याची इच्छा प्रगट केली. १९७७ साली जूनमध्ये मोरारजी देसाई यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, ‘नागभूमी हा भारताचा भाग आहे, हे मान्य करून फिझो यांनी अजूनही स्वदेशी यावे त्यांचे स्वागतच होईल. परंतु ही भूमिका त्यांनी मान्य केली नाही तर त्यांची संभावना कशी करावयाची, ते भारत सरकार ठरवील.’ मोरारजी देसाई यांनी २० जून १९७७ला लोकसभेत या प्रश्नावर निवेदन केले. ते म्हणाले, ‘फिझो नागभूमीस परत आले तर ते मुख्यमंत्री होऊ शकतात, असेही मी त्यांना सांगितले आहे.’

या पार्श्वभूमीवर १९७९ साली एप्रिल महिन्यात फिझोंना भेटण्यासाठी एस्. एम्. लंडनला गेले त्या वेळी नानासाहेब गोरे हे भारताचे इंग्लंडमधील हायकमिशनर होते. त्यामुळे नानासाहेबांच्या निवासस्थानीच ९ एप्रिल आणि १२ ते १७ एप्रिल असे पाच दिवस, अशी एकूण ६ वेळा एस्. एम्. आणि नानासाहेब गोरे यांची फिझो यांच्याशी बोलणी झाली. या नंतर २७ एप्रिलला फिझोंनी ‘इंडियन एक्सप्रेस’च्या

प्रतिनिधीस जी मुलाखत दिली तिच्यामध्ये तिच्यामध्ये 'स्वतंत्र आणि सार्वभौम नागभूमी' हा शब्दप्रयोग करण्याचे कटाक्षाने टाळले. त्याप्रमाणे या भेटीनंतर जवळजवळ पाच वर्षे नागभूमीत हिंसाचार भडकला नाही. एस्. एम्. जोशींनी फिझो या नागांच्या नेत्यांशी केलेल्या वाटाघाटीचे हे मर्यादित फलित होते.

## विद्यापीठ – नामांतर

महाराष्ट्रात पुलोद आघाडीचे सरकार १२ जुलैस स्थापन झाले. त्यानंतर शरद पवार यांनी सर्वपक्षीय आमदारांची बैठक घेऊन 'मराठवाडा विद्यापीठा' चे नामान्तर करून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव देण्याबाबत सर्वांची मते अजमावली. या प्रश्नाला पार्श्वभूमी होती. १ मे १९७७ ला महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला. या समारंभास त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, काँग्रेस पक्षाचे वसंतराव दादा पाटील विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्या समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे कृतज्ञतापूर्वक स्मरण म्हणून 'मराठवाडा विद्यापीठा' ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, अशी मागणी करण्यात आली. त्यावर मुख्यमंत्री वसंतदादा पाटील म्हणाले, 'सूचना मान्य आहे. रीतसर मागणी करा.' या मागणीसाठी नंतर मराठवाड्यात दलित पँथर, युक्रांद,

युवक काँग्रेस, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनांनी आंदोलन सुरू केले. १७ जुलैस बॅकवर्ड क्लास युनिव्हर्सिटी अँन्ड कॉलेज टीचर्स या संघटनांतर्फे 'मराठवाडा विद्यापीठा' वर मोर्चा नेण्यात आला आणि नामान्तराची मागणी करण्यात आली. यानंतर १८ जुलैस 'मराठवाडा विद्यापीठा'च्या कार्यकारिणीची बैठक झाली. बैठकीपुढे, नामान्तर व्हावे अशी निवदने होती, त्याचप्रमाणे 'मराठवाडा विद्यापीठ' हेच नाव राहू द्यावे, असेही एक निवेदन होते. कार्यकारिणीने नामान्तरास मान्यता देणारा ठराव एकमताने संमत केला आणि तो मान्यतेसाठी प्रथम सिनेटकडे पाठवावा आणि नंतर शासनाकडे पाठवावा, असेही ठरविण्यात आले. कार्यकारिणीच्या या निर्णयानंतर उपकुलगुरू प्रा.डॉ. शिवाजीराव भोसले यांना अनेक विद्यार्थी भेटले आणि त्यांनी विद्यापीठाचे नामान्तर करू नये, अशी मागणी केली. यानंतर १८ ऑक्टोबरच्या सिनेटपुढे हा ठराव मांडणारे कमल किशोर कदम सिनेटच्या बैठकीस गैरहजर राहिल्यामुळे नामांतराचा ठराव सिनेटपुढे आलाच नाही. वसंतदादा पाटील यांनी नामांतराच्या सूचनेस पूर्वी अनुमती दिली होती. परंतु १९७८ साली निवडणूक होणार हे दिसताच त्यांनी सावध पवित्रा घेतला आणि शासनाने नामांतराच्या बाबतीत कोणताही निर्णय घेतला नाही, असे जाहीर केले. १९७८ साली निवडणुकीनंतर वसंतदादा पाटील हेच पुन्हा मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी पूर्वीची

भूमिका बदलून नामान्तरास नकार दिला. या सुमारास एस्. एम्. जोशी एकदा औरंगाबादेस गेले असताना त्यांना तेथील जनता पक्षाचे एक नेते ॲड. नावंदर यांनी 'नामांतर प्रश्नावर जनता पक्षाने कोणती भूमिका घ्यावी' असे विचारले. यावर एस्. एम्. त्यांना म्हणाले, 'विद्यापीठ कार्यकारिणीने एकमताने नामांतरास मान्यता दिली आहे. जनता पक्षानेही नामांतरास मान्यता द्यावी.'

पुढे पुलोद आघाडीचे सरकार स्थापन होऊन शरद पवार हे मुख्यमंत्री झाल्यावर नामांतराचा ठराव विधानसभेत आणि विधान परिषदेत मांडण्याचे ठरले. मुख्यमंत्री शरद पवार यांनी या बाबतीत सर्वांना बरोबर घेण्याचे धोरण ठेवून विद्यापीठाचे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे राहील आणि त्याचे रूपान्तर बौद्ध विद्यापीठात होणार नाही, ही तडजोड मान्य करण्यात आली. त्यानंतर २७ जुलैला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत नामांतराचा हा ठराव एकमताने मंजूर झाला. म्हणजे 'सर्वेषामविरोधेन' हा ठराव संमत झाला.

दुर्दैवाने विधिमंडळात ठराव होताच, मराठवाड्यात भीषण दंगल उसळली. दलितांच्या वस्त्यांवर हल्ले करण्यात आले. दोन दलितांचे बळी गेले. जाळपोळीत तीन कोटींच्या सार्वजनिक संपत्तीची हानी झाली. अनेक दलितांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली. दंगल झाली तेव्हा एस्. एम्. जोशी आणि शरद पवार दिल्लीत होते. मंत्रिमंडळाच्या

विस्ताराबाबतचा निर्णय घेण्यासाठी ते तेथे गेले होते. परंतु आल्यावर दलितांवर झालेल्या हल्ल्यांची वार्ता ऐकून एस्. एम्. यांना अतिशय दुःख झाले. त्यांनी मराठवाड्यात जाऊन दंगलपीडितांना धीर देण्याचे ठरविले. ते खासदार बापूसाहेब काळदाते यांच्या समवेत औरंगाबादला गेले. दुसऱ्या दिवशी डॉ. काळदात्यांच्या घरावर मोर्चा आला आणि त्यांनी एस्. एम्. यांना घेराव घातला. लोक म्हणू लागले, 'नामान्तराचा ठराव मागे घेतो', असे म्हणा म्हणजे घेराव उठवितो. कसोटीच्या क्षणी कधी न डगमगणारे एस्.एम्. त्यांना म्हणाले, 'तुम्ही जेवून या, मी न जेवता घेरावमध्ये दहा दिवस बसायला तयार आहे.' लोक घोषणा देऊ लागले. तेव्हा एस्. एम्. म्हणाले, 'विधिमंडळात एकमताने ठराव झाला त्या वेळी मराठवाड्याच्या एका तरी आमदाराने विरोध केला का?' त्यावर घेरावमधून आवाज आला, 'ती चूक त्यांना दुरुस्त करावी लागेल?' त्यावर एस्. एम्. शांतपणे म्हणाले, 'मग त्यासाठी आम्हांला घेराव कशाला?' मराठवाड्यातील आमदारांना आपले मत बदलायचे असेल तर ते बदलू शकतात. नामान्तराचा ठराव झाला, याचा अर्थ कायदा झाला असा नव्हे. नामान्तरासाठी कायदा करावाच लागेल. तसे विधेयक विधानसभेत किंवा विधानपरिषदेत मांडले जाईल त्या वेळी मराठवाड्यातील आमदारांना लोकशाहीच्या पद्धतीने दुरुस्ती करून घेण्याची संधी मिळणार आहे.' एस्. एम्. यांची लोकशाहीवादी भूमिका

ऐकून अनेकांचे आवाज खाली आले आणि दुपारी ३ वाजता त्यांनी घेराव उठवला.

दुसऱ्या दिवशी एस्. एम्. मुंबईस आले त्या वेळी नामान्तरवाद्यांनी बैठक आयोजित केली होती. एस्. एम्. बैठकीस हजर होते. 'विधेयक येईल त्या वेळी तुम्हांला विरोध करण्याची संधी मिळेल.' या एस्. एम्.च्या विधानावर नामान्तरवादी वक्त्यांनी टीकेची झोड उठवली. तेव्हा एस्. एम्. म्हणाले, 'लोकशाही पद्धतीप्रमाणे ही संधी त्यांना मिळणार आहे. हे सत्य मी सांगितले ते मी मागे घेणार नाही.' म्हणजे दुर्दैवाने नामान्तरवादीही एस्. एम्. यांना समजून घेऊ शकले नाहीत.

## पावित्र्याची विटंबना

नामान्तरप्रकरणी एस्. एम्. यांच्यावर नरहर कुरुंदकरांसारख्या विचारवंतानेही चिखलफेक केली आणि 'मराठवाड्यातील दंगलीस एस्. एम्.च जबाबदार आहेत' असे बेजबाबदार उद्गार काढले. सर्वांत निंद्य घटना उद्‌गीर येथे घडली. प्राचार्य डोळे यांच्या घरी एस्. एम्. उतरले होते. प्राचार्य डोळे म्हणाले, 'विद्यार्थी तुम्हांला निवेदन देऊ इच्छितात. तुम्ही ते घ्याल का?' एस्. एम्. म्हणाले, 'घेईन की.' प्रा. डोळ्यांचे घर लहान होते म्हणून एस्. एम्. आणि पन्नालाल सुराणा शेजारच्या मोठ्या घरात जाऊन बसले. पुढे

जे घडले त्याचे वर्णन एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत पुढीलप्रमाणे केले आहे.

"मी व पन्नालाल जाऊन बसलो, दहा बारा मंडळी आली. त्यांच्यातून विशीच्या आतील दोन तरुण उठले. निवेदन देण्यासाठी त्यांनी कागद पुढे केले व चट्‌कन एकाने प्रथम पन्नालाल सुराणा यांच्या गळ्यात व दुसऱ्याने माझ्या गळ्यात जोड्यांची एकेक माळ घातली. तो सगळाच प्रकार अकल्पित होता. माळा आम्हां दोघांच्या गळ्यात पडताच आलेल्यांनी चट्‌कन त्या काढून टाकल्या. ते दोघे तरुण उभेच होते. त्यांना बसावयास सांगून मी विचारले, 'तुम्ही हे हार घालून काय मिळवलेत?' ते तरुण पढल्याप्रमाणे म्हणाले, 'दंगलीस तुम्ही जबाबदार आहात' मग मी त्यांना थोडे सुनावलेच. मी म्हणालो, 'तुम्ही फार मोठी चूक केली आहे. तुम्ही तुमच्या प्राचार्यांचा – डॉ. डोळ्यांचा विश्वासघात केला आहे. हा अक्षम्य गुन्हा आहे. जोड्यांची माळ घातली, यात माझी बदनामी केलीत असे तुम्हांला वाटत असेल, तर तुमचे साफ चुकले आहे. माझा अपमान मी वाईट वागलो तरच होईल. माझा अपमान दुसरा कोणी करू शकत नाही. अरे वेड्यांनो, जोड्यांची माळ घालायची होती तर निदान नवीन जोडे तरी आणायचेत. मला ते उपयोगी पडले असते."

या सर्व घटनेबद्दल महाराष्ट्रात सर्व जाणकारांना फार दुःख झाले. अनेकांना तीव्र संताप आला. वस्तुतः ज्यांची घरे जाळली गेली, त्या दलितांना धीर द्यायला एस्. एम्. गेले

होते. अनेक दलित मंडळी त्यांना म्हणाली, ‘राखीव जागा हव्या तर काढून टाका, कारण खेडोपाडी आम्हांला संरक्षण कोण देणार?’ एक दंगलग्रस्त दलित एस्. एम्.ना म्हणाला, ‘आमचे गाडगे-मडक्याचे संसार तरी सुरक्षित असू देत.’ हे उद्गार ऐकून एस्. एम्.च्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. एस्. एम्.नी लिहिले आहे, ‘त्या दलिताचे उद्गार सहृदय माणसाचे काळीज कातरून टाकणारे होते.’

उद्‌गीर येथील दुर्दैवी घटनेनंतरही एस्. एम्. यांनी मराठवाड्यात खेडोपाडी जाऊन दलितांचे अश्रू पुसले. मुंबईस आल्यावर पत्रकार परिषदेत एस्. एम्. म्हणाले, ‘सरकारने मराठवाड्यातील दंगलीची न्यायालयीन चौकशी करावी. त्या चौकशीत दंगलीस मी जबाबदार आहे, असे ठरले तर मी देहान्त शासनही भोगण्यास तयार आहे.’

या अग्निदिव्यातूनही एस्. एम्. चे व्यक्तिमत्व उजळून निघाले. एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत लिहिलेल्या नामान्तर या प्रकरणात शेवटी लिहिले आहे, “या नामान्तर प्रकरणात मतपरिवर्तन झाल्याचे एक तरी उदाहरण दाखवा असे कोणी मला म्हणाले तर ते आव्हान मी आता सहज स्वीकारू शकतो. मला तो दिवस आठवतो. १९८० साली नामान्तराच्या प्रश्नावर मुंबईत मोर्चा निघून सत्याग्रह व्हायचा होता. आझाद मैदानापासून मोर्चा निघणार म्हणून सत्याग्रही तेथे जमू लागले. मी तेथे मैदानावरच होतो. एवढ्यात कोणीतरी तरुणाने पायाला स्पर्श करून मला नमस्कार

केला. या तरुणाचा चेहरा ओळखीचा दिसला, पण नावगाव आठवेना. मी त्याला कोण, कुठचे विचारल्यावर, तो म्हणाला, 'ओळखलं नाहीत? मीच तो उद्दीरला आपल्या गळ्यात जोड्यांची माळ घालणारा. आता मी तो पूर्वीचा उरलो नाही. त्या कृत्याचा मला पश्चात्ताप झाला. आज मी नामान्तराच्या लढ्यातला एक सत्याग्रही म्हणून इथं आलो आहे.' त्याचे ते मनापासून उच्चारलेले शब्द ऐकत असता मला वाटले, मराठवाड्यात आयुष्यातील सर्वांत मोठा पराभव मी पत्करला. ही गोष्ट खरी असली तरी पराभवाच्या मिट्ट काळोखात अशी एखादी पणती यथाशक्ती प्रकाश देण्याचं काम करीत आहे. ही काही कमी समाधानाची बाब नव्हे."

## अपेक्षापूर्ती

जनता पक्षाचे सरकार दिल्लीत अधिकाररूढ झाल्यावर लोकांच्या अपेक्षा खूपच वाढल्या होत्या. सुरुवातीस नव्या सरकारने अनेक चांगल्या गोष्टी केल्या. आणीबाणीच्या काळात घटनेची जी मोडतोड करण्यात आली होती. ती परत दुरुस्त करून देशातील लोकशाही पुन्हा धोक्यात येणार नाही, ही तरतूद जनता शासनाने तत्परतेने केली. ४२व्या घटना दुरुस्तीद्वारा लोकशाहीवर पुन्हा आघात होणार नाही अशी तरतूद करण्यात आली. लोकांचे जीवित आणि स्वातंत्र्य अबाधित राहील अशी तरतूद असणारी ४४वी

घटना दुरुस्तीही मंजूर झाली. रेल्वेमंत्री प्रा. मधु दंडवते यांनी रेल्वेच्या  अंदाजपत्रकात कोकण रेल्वेसाठी पैशांची तरतूद करून या उपेक्षित भागाला न्याय दिला. १९७८ – ७९ साली कृषी-उत्पादनाने उच्चांक गाठला आणि औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग ७ ते ८ टक्के राहिला. चलनवाढीचा वेगही कमी झाला.

**अपेक्षाभंग**

परंतु हे सारे होत असतानाच सत्तास्पर्धेमुळे जनता पक्षात कुरबूर सुरू झाली. काही दिवसात ही तेढ वाढत गेली. जयप्रकाशजी आणि एम्. एस्. यांनी दिलेल्या इशाऱ्यांकडे कोणी लक्ष दिले नाही आणि अखेर आपसांतील संघर्षामुळे जनता पक्षाचे सरकार कोसळले. नानासाहेब गोरे यांनी तात्काळ इंग्लंडमधील उच्चायुक्त पदाचा राजीनामा दिला. मंत्रिमंडळ पडल्यावर एस्. एम्. म्हणाले, ‘जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली आपण सर्वजण एकत्र आलो. परंतु सत्तेवर येताच अनेकांना जयप्रकाशजींचा सल्लाही नकोसा झाला. याचे पर्यवसान म्हणजे कोणीही खाली न खेचता सरकार भाऊबंदकीमुळेच कोसळले.’

नव्याने निवडणुका झाल्यावर इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाला लोकसभेत बहुमत मिळाले. केंद्रात इंदिरा गांधींचे सरकार आल्यावर काही दिवसांत महाराष्ट्राचे पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले आणि

निवडणुकीनंतर इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पक्षाचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले.

**जयप्रकाशजींचे निधन**

जयप्रकाश नारायण यांची प्रकृती खालावत चालली होती. अखेर ८ ऑक्टोबर १९७९ला त्यांचे निधन झाले. एस्. एम्. आणि जयप्रकाशजी यांच्यामध्ये एकमेकांबद्दल विलक्षण जिव्हाळा होता. १९३४ पासून दोघांमधील स्नेह अधिकाधिक दृढ होत गेला. जयप्रकाशजींच्या मृत्यूनंतर जे. पी.च्या इच्छेनुसार सर्व व्यवस्था करून एस्. एम्. जड अंतःकरणाने पाटण्याहून पुण्यास परतले.

जनता पक्षाचे केन्द्रातील आणि पुलोदचे महाराष्ट्रातील सरकार पडल्यानंतर एस्. एम्. यांचे शाळेपासूनचे निकटचे मित्र गोपीनाथ तळवलकरांची त्यांच्याशी भेट झाली तेव्हा तळवलकर म्हणाले, ‘जयप्रकाश आणि तू इतक्या कष्टाने उभा केलेला हा इमला कोसळला यामुळे तुला किती दुःख झाल असेल, हे मला समजतं.’ एस्. एम्. यावर हसले आणि म्हणाले, ‘जयप्रकाश माझ्यापेक्षा भावनाप्रधान होते त्यामुळे त्यांना जनता पक्षातील भांडणे पाहून फार दुःख झाले आणि ‘माझा बाग उद्ध्वस्त झाला’, असा त्यांनी जणू टाहोच फोडला. माझ्या आयुष्यात मी इतक्या बांबत अपयश सोसले आहे की माझे मन निबर झाले आहे. मला खरं वाईट हे वाटतं की, आपलं सरकार

असताना गरिबांना मदत करण्याची अधिक संधी मिळत असे. आता ते फारसं करता येत नाही, याच मात्र दुःख होतं.

## मुंबईतील संप

याच वेळी मुंबईत कापड गिरणी कामगारांचा संप डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ चालला होता. या संपातील बहुसंख्य कामगार महाराष्ट्रातील, विशेषतः कोकणातील होते. हा संप मिटणे उचित होईल असे एस्. एम्. यांना वाटत होते. म्हणून त्यांनी डॉ. दत्ता सामंत यांना बोलावून घेतले आणि विचारले, ‘संप मिटविण्यासाठी मी दिल्लीला जाऊन संबंधित मंत्र्यांशी बोलायला तयार आहे. कोणत्या मागण्या मान्य झाल्यावर तू तडजोडीस तयार होशील ते सांग.’ परंतु दत्ता सामंत यांनी एस्. एम्.ना, ‘आपण मध्यस्थी करू नये. मी संप यशस्वी करण्यास समर्थ आहे’, असे सांगितले. यावर एस्. एम्. म्हणाले, ‘मी ट्रेड युनियन क्षेत्रात १९४० पासून काम करीत आलो आहे. मलाही मुंबईतील कामगारांच्या ताकदीचा अंदाज आहे. तू साहसी धोरण स्वीकारून कामगारांच्या जीवाशी खेळतो आहेस, असे मला वाटते.’ परंतु डॉ. दत्ता सामंत यांनी एस्. एम्.चा सल्ला मानण्यास नकार दिला. एस्. एम्. हे लढाऊ कामगार नेते असले तरी सन्माननीय तडजोड करण्यास ते तयार असत. त्यामुळे ते वैतागाने दत्ता सामंत यांना म्हणाले, ‘तुझे धोरण मला आत्मघातकी वाटते. अर्थात निर्णय तूच

घ्यायचा आहेस.' येथेच दोघांची बोलणी संपली आणि दत्ता सामंत उठून गेले. त्या वेळी मी विधानपरिषदेत विरोधी पक्ष नेता होतो आणि ही बोलणी माझ्याच निवासस्थानी झाली. डॉ. दत्ता सामंत गेल्यावर एस्. एम्. विषादाने मला म्हणाले, 'प्रधान, मी आता कालबाह्य झालो, असं वाटतं.'

## गौरव आणि लो. टिळक पुरस्कार

१९८४ नंतर एस्. एम्.ना हे फारच तीव्रतेने वाटू लागले. एस्.एम्.चा ५०वा, ६०वा आणि ७५वा हे सारे वाढदिवस सार्वजनिक समारंभ करून त्यांच्या मित्रांनी, अनुयायांनी आणि चाहत्यांनी साजरे केले. पुणे महानगरपालिकेने मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. पुणे विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डी. लिट् पदवी देऊन त्यांच्या देशसेवेचा गौरव केला. 'मी एसेम्' या त्यांच्या आत्मकथनपर पुस्तकाला मॅजेस्ट्रिक प्रकाशनाचा पहिला पुरस्कार मिळाला. त्यांच्या जीवनाचा आणि कार्याचा अभ्यास करून चाळीसगावचे प्रा. स. म. विसपुते यांनी पीएच्.डी.साठी प्रबंध लिहिला आणि त्यांना पीएच्.डी. मिळाली.

एस्. एम्. म्हणाले, 'या अनेक गौरव समारंभांमुळे मी संकोचून गेलो. मला माझ्या मित्रांचे मन मोडणे शक्य नव्हते. त्यांच्या माझ्याबद्दलच्या सद्भावनांचा मी आदर करतो. पण मी तसा मोठा नाही. मी एक सामान्य कार्यकर्ता आहे, याची मला

जाणीव आहे. अर्थात् मी माणूसच आहे. त्यामुळे लोकांनी माझ्या ठिकाणच्या अल्प गुणांचेही कौतुक केले, याचा मला आनंद वाटलाच. समाजाने मला आयुष्यभर सांभाळून घेतले त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.'

१९८३ साली टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने 'लोकमान्य टिळक सन्मान पारितोषिक' एस्. एम्. यांना देण्यात आले, तेव्हा मात्र एस्. एम्. यांना धन्य वाटले. एस्. एम्. यांनी त्यांच्या आत्मकथेत लिहिले आहे, "टिळक सन्मान पारितोषिक' मला देण्याचे विश्वस्तांनी ठरविले, तेव्हा गेली पंचावन्न वर्षे मी माझे जीवन ज्या प्रकारे व्यतीत केले त्याबद्दलची प्रसाद-पावतीच लोकमान्यांच्या नावाने चालणाऱ्या ट्रस्टकडून मला मिळाली, असे मी समजलो. मी अर्थात् निमित्तमात्र होतो. राष्ट्रीय कार्यात सहकार्य केलेल्या हजारो ज्ञात-अज्ञात सहकाऱ्यांचाही सन्मान त्या पारितोषिकामुळे झाला आहे, अशी माझी भावना आहे. लोकमान्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थेत हायस्कूलपासून पदवी परीक्षेपर्यंत मला विनामूल्य शिक्षण मिळाले. हाही त्यांचा प्रसादच होता. पुढे सार्वजनिक जीवनात मी उतरलो तेव्हांही काही वर्षे 'केसरी'ने माझा प्रतिपाळ करावा, हाही लोकमान्यांचा माझ्यावर अनुग्रह नव्हता काय? आणि अखेर आयुष्याच्या सायंकाळी हे सन्मान पारितोषिक व महावस्त्रांची ऊब! माझे अवघे जीवनच त्यामुळे प्रसादमय झाले."

# प्रकरण ८

## अखेरचे पर्व

एस्. एम्. अंतःकरणाने प्रेमळ होते, परंतु बोलण्यात मात्र ते कोकणी माणसांप्रमाणेच कमालीचे फटकळ होते. कार्यकर्ते चुकले की एस्. एम्. कठोर शब्दांत त्यांची कानउघडणी करीत. पण त्यांच्या मनात कधी आकस नसे. धनदांडग्यांना, सत्तेचा उन्माद चढलेल्या राजकारण्यांना फटकारताना एस्. एम्. यांच्या जिभेला विलक्षण धार येई. परंतु तरीही त्या संतापामागे द्वेष वा मत्सर नसे. गरिबांचे दुःख पाहून मात्र एस्. एम्. चे अंतःकरण कळवळत असे आणि त्यांचे शब्द एकदम मृदू होत. अन्यायाविरुद्ध संघर्ष करताना कठीण वज्राला भेदू पहणारे एस्. एम्. दलित, उपेक्षित बांधवाचे, स्त्रियांचे दुःख पाहून मात्र मेणाहून मऊ होत असत. एस्. एम्. वागायला सरळ होते, पण भोळे मात्र मुळीच नव्हते. लबाडी, दंभ, अप्रामाणिकपणा त्यांच्या चट्कन लक्षात येत असे. राजकारणातील सारे छक्केपंजे ते सहज ओळखत. ते कधी ढोंगामुळे फसत नसत. मात्र प्रत्येक माणसातला सद्भाव ते शोधत असत. ‘ ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ’ असा त्यांचा मनोमन विश्वास होता आणि दुर्जनांच्या मनातीलही सद्भावनेचा अंश आपल्या प्रामाणिकपणाने, साधुत्वाने जागृत करण्याची धडपड ते

करीत असत. एस्. एम्. बोलण्यातच केवळ प्रांजळ नव्हते. त्यांचे व्यक्तिमत्वच पारदर्शी होते. त्यांचा संतापही सात्त्विक असे आणि त्यांच्या भावनेचा उमाळा शत्रूच्याही मनाला स्पर्श करीत असे. एस्. एम्. यांच्याबद्दल कोणाच्या मनात गैरसमज झाले, त्यांचे अनुयायी जरी त्यांच्यावर रागावले, तरी एस्. एम्. कधी त्याचे निराकरण करीत नसत. ते म्हणत, 'मी असा का वागलो, ते त्याला काही दिवसांनी कळेल आणि मग त्याची नाराजी दूर होईल.'

एस्. एम्.च्या स्वभावात भावनांची उत्कटता जाणवत असली तरी त्यांच्या प्रत्येक कृतीला, त्यांना मनोमन पटलेल्या विचारांचे खंबीर अधिष्ठान असे. ते त्यांच्या भूमिकेवर ठाम राहात. कारण तत्त्वांना मुरड घालण्यास ते कधीही तयार नसत. त्यामुळे अनेकांना ते हेकट वाटत. परंतु एस्. एम्. ना त्याची फिकीर वाटत नसे. एस्. एम्.च्या सात्त्विक संतापाच्या आविष्कारामुळे त्यांच्या अनुयायांच्या मनांतील शंकाचे मोहोळ दूर होई आणि सत्यासाठी व न्यायासाठी लढणाऱ्या एस्. एम्. च्या मागे खंबीरपणे उभे राहण्याचा ते निर्धार करीत असत. एस्. एम्. च्या स्वभावात भावनांची उत्कटता होती. त्याचबरोबर त्यांची विनोद बुद्धीही तीव्र होती. खास कोकणी भाषेत ते दांभिकतेचा फुगा फोडून टाकत. अश्लील म्हण ते सहज वापरून जात, त्या वेळी त्यांचा नव्याने परिचय झालेल्या माणसाला धक्काच बसे. पण या साऱ्या परस्परविरोधी छटा त्यांच्या वागण्याबोलण्यात

असल्या तरी त्यांच्या निकट सहवासात आलेल्यांच्या मनावर त्यांची उदात्त प्रतिमाच उमटत असे. कारण त्यांचे जीवन ध्येयासक्त होते, समर्पित होते. एस्. एम्.ना, नाटक आणि सिनेमा पाहण्याची हौस होती. राजकीय आणि सामाजिक कामांच्या व्यापातूनही कधी तरी वेळ काढून ते आणि ताराबाई सिनेमाला किंवा नाटकाला जात. एस्. एम्. ना, शाळेत असल्यापासून क्रिकेटची आवड होती आणि ते स्वतः क्रिकेट शाळेनंतर पुढे कधी खेळले नाहीत तरी क्रिकेट मॅचबद्दल त्यांना फार उत्सुकता असे. रेडिओवरील मॅचची कॉमेंटरी ऐकण्यात आणि पुढे दूरदर्शनवर मॅच पाहण्यात ते रंगून जात. अभिजात संगीतही त्यांना आवडत असे.

एस्. एम्. यांची प्रकृती मात्र चांगली नव्हती. लहानपणी गरिबीमुळे झालेली आबाळ आणि नंतर स्वातंत्र्य चळवळीतील पाच सहा वर्षे सोसलेला 'क' वर्गातील तुरुंगवास, यामुळे त्यांची पचनक्रिया बिघडून गेली होती. ते सकाळी एक वेळ जेवत आणि संध्याकाळी दूध घेत वा थोडेसे खात. भिडस्त स्वभावामुळे राजकीय कामासाठी वणवण करीत फिरताना ते कोणालाही त्रास पडू नये म्हणून खाण्याची कसलीही आवड निवड ठेवत नसत. 'जे पानावरती पडेल पुढती नेमस्त ते भक्षिणे' अशी त्यांची रीत होती. ग्रामीण भागात तिखट खावे लागले की त्यांचे पोट बिघडत असे. थंडी गारठा झाला की त्यांना अनेकदा थोडा ताप येई. त्यांना सतत औषधे घ्यावी लागत. वैद्य मामा

गोखले यांच्या उपचारांमुळे त्यांचा आजार वाढला नाही. पन्नाशीनंतर ते खाण्यापिण्यात अधिक निर्बंध पाळू लागले. एस्. एम्. उंच होते पण त्यांची शरीरयष्टी किरकोळ होती. वर्णाने ते गोरे होते. नाकीडोळी नीटस होते. खादीचा धुतलेला पायजमा व नेहरू शर्ट असा त्यांचा पोषाख असे. बाहेर जाताना ते कोट घालीत. एकूण खाणे, कपडे याबद्दल ते बेफिकीरच असत.

ताराबाईंनी भावे स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून नोकरी करीत संसाराची आर्थिक जबाबदारी उचलली. एस्. एम्. त्यांच्या राजकीय कामात इतके गुरफटलेले असत की मुलांकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसदच नसे. मुलांची दुखणी, अभ्यास यांची जवळजवळ सर्व जबाबदारी ताराबाईंनाच पार पाडावी लागली. मुले अभ्यासात हुशार होती. थोरला अजेय एम.बी.बी.एस. होऊन पुढे मुलांचा तज्ज्ञ डॉक्टर झाला. त्याने 'अश्विनी' म्हणून हॉस्पिटल चालवले आहे. धाकटा मुलगा अभय हा एअरफोर्समध्ये पायलट झाला. १९६२, १९६५ आणि १९७१ या तिन्ही वेळा तो युद्धभूमीवर काम करीत होता. मात्र दोघाही मुलांनी राजकारणात रस घेतला नाही. एस्. एम्.ची थोरली सून कांचन हीही डॉक्टर आहे. अभय पुण्यापासून दूर असे. अजेय आणि कांचन यांच्याजवळच एस्. एम्. आणि ताराबाई राहिले. मुलांवर आईवडिलांचे मायेचे छत्र होते. परंतु एस्. एम्.चा स्वातंत्र्य चळवळीतील कारावास आणि स्वातंत्र्य

मिळाल्यानंतरही समाजवादी चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आदींमधील जबाबदाऱ्या यामुळे मुलांचे कौडकौतुक करायला त्यांना पुरेशी उसंत मिळाली नाही. नातवंडे या बाबतीत अधिक भाग्यवान ठरली. डॉ. अजेय एकदा आपल्या मुलाला म्हणाला, 'तुमची मजा आहे. अण्णा तुमचे जितके लाड करतात तसे आमचे नाही त्यांनी केले.' यावर एस्. एम्. म्हणाले, 'म्हातारपणी मनही अधिक हळुवार होते आणि नातवंडांचे लाड करण्यात एक वेगळाच आनंद असतो.'

१९८४ साली एस्. एम्. यांच्या प्रकृतीत जो बिघाड होऊ लागला, त्याचे निदान करण्यासाठी त्यांना मुंबईला नेण्यात आले आणि डॉक्टर कामतांनी कॅन्सरचे निदान करून औषधोपचार करण्यास सुरुवात केली. ताराबाईंचीही प्रकृती त्यांना साथ देत नव्हती. ताराबाईंचा आजार बळावला आणि ६ सप्टेंबर १९८६ रोजी त्यांचे निधन झाले. आयुष्यभरची सहचरी गेल्यानंतर एस्. एम्. यांच्या जीवनात मोठीच मोकळी निर्माण झाली.

### आस्तिकतेचा साक्षात्कार

१९८७च्या डिसेंबरमध्ये कॅन्सरवरील केमोथेरपीच्या उपचारासाठी एस्. एम्. यांना मुंबईला टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ठेवले. ४ जानेवारी १९८८ रोजी उपचार न मानवून त्यांना रक्ताची उलटी झाली. ते बेशुद्ध झाले. काही

दिवस अतिदक्षता विभागात काढल्यावर त्यांना सामान्य विभागात आणण्यात आले. त्या वेळी त्यांची शुश्रूषा करण्याकरिता दोन खासगी परिचारिका नेमण्यात आल्या. एक होती अल्बर्टीन मेंडीस. ती गोव्याची होती. तिने एकदा एस्. एम्. ना विचारले, 'तुमचा देवावर विश्वास आहे का?' एस्. एम्. तिला म्हणाले, 'मी non-believer आहे.'

रात्रपाळीची परिचारिका होती रेचेल. ती केरळातील होती. तिलाही एस्. एम्. non – believer आहेत हे कळले होते. अल्बर्टीन आणि रेचेल या दोघीजणी, रोमन कॅथॉलिक होत्या. ख्रिस्तावर आणि परमेश्वरावर त्या दोघींचीही गाढ श्रद्धा होती. एस्. एम्. त्यांना पित्यासमान वाटत. हा इतका प्रेमळ म्हातारा non – believer कसा हे त्यांना समजतच नसे. आजारीपणात एस्. एम्. अनेकवेळा चिडचिडे व्हायचे. एका रात्री रेचेलने त्यांना नेहमीप्रमाणे अंथरुणावर पडूनच बेडपॅन घेण्यास सांगितले. एस्. एम्. तिला विनवत होते, 'मला बेडपॅनवर बसू दे.' पण रेचल त्यांना ते करू देत नव्हती. एस्. एम्. एकदम संतापले आणि म्हणाले, 'तू स्वतःची जीजस ख्राइस्टची भक्त समजतेस पण तुझ्यात करुणा कशी ती नाहीच.' एस्. एम्.चा मनावरचा ताबा एकदम सुटला आणि ते तिला, 'सैतानाची अवलाद' म्हणाले आणि त्या क्षणी ते एकदम चरकले. आपणच आपली माणुसकी विसरलो असं त्यांना वाटलं आणि त्यांच्या डोळ्यांतून टपटप अश्रू गळू लागले. रेचेल एकदम

हेलावली. तिने एस्. एम्.ना पटकन उचलून पलंगावर ठेवले आणि ती त्यांचे सान्त्वन करू लागली. ती म्हणाली, 'तुम्ही असे का रडता? मघाशी मला तुम्ही अद्वातद्वा बोललात. पण तुम्ही मला पित्यासारखे आहात.' एस्. एम्. तिला म्हणाले, 'मला एकदम ख्रिस्ताची आठवण झाली. माझे चुकले म्हणून मी रडतो आहे.' रेचेल म्हणाली, 'तुम्ही म्हणता की, तुमचा ईश्वरावर विश्वास नाही. पण तुम्ही जीजसचे भक्त आहांत.' एस्. एम्. यांनी 'आगळी वेगळी माणसे' या त्यांच्या पुस्तकात हा अनुभव 'ईश्वराची लेकरं' या शीर्षकाखाली सांगितला आहे. रेचेल त्यांना Believer म्हणाली त्याबद्दल त्यांनी पुढीलप्रमाणे लिहिले आहे. 'तिचे म्हणणे खरेच होते. आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी ईश्वराचा अंश असतो, तसाच सैतानही निद्रिस्त असतो. काही क्षणांपूर्वी माझ्यातला सैतान जागा झाला. तो सैतान जळून गेला. तिने दिलेल्या इंजेक्शनने मला शांत झोप लागली.'

सकाळी मी रेचेलच्या हाकेने जागा झालो. ती म्हणत होती, 'पपाजी मैने चाय बनाई है। उठो!' मी प्रसन्न मनाने उठलो. ती नुसती माझी नर्सच नव्हती, ती माझी नात झाली होती. तिच्या माझ्यातील हा अतूट बंध मला सांगत होता, 'तू आस्तिक आहेस!' व त्याच वेळी रेचेल, नुकत्याच आलेल्या अल्बर्टीनला म्हणत होती, 'पपाजी is a believer' दोघीही माझ्यातील आस्तिकतेच्या साक्षात्काराने सुखावल्या होत्या.

## अखेर

एस्. एम्. यांची प्रकृती खालावली होती. यापुढे उपचारांचा फारसा उपयोग होणार नाही म्हणून त्यांना पुण्याला घरीच आणले होते. यातना होत होत्या. पण एस्. एम्. च्या चेहऱ्यावरचा आनंद कधी मावळला नाही. ते टी. व्ही.वर क्रिकेट मॅच पाहायचे, बातम्या ऐकायचे. किशोरी आमोणकरांच्या गाण्याच्या कॅसेटस् ऐकताना त्यांचे मन एकदम प्रसन्न व्हायचे. कांचन, अजेय शुश्रूषा करीत होते. कार्यकर्ते येऊन बसत होते. एस्. एम्. सर्वांशी खेळीमेळीने बोलत. थट्टामस्करी करीत. स्वतःच्या दुखण्यावरही विनोद करीत. त्यांच्या कमरेच्या हाडाच्या आत कॅन्सर पसरला होता. ते एक दिवस म्हणाले, ‘मी आयुष्यभर मागासांसाठी, पिछड्यांसाठी काम केले, म्हणून कॅन्सरही माझ्या शरीरात पिछडा होऊन आला.’ आता कोणत्याच औषधांचा उपयोग होत नव्हता. भूक मंदावली होती. शरीर थकत चालले होते. परंतु मन या अखेरच्या दिवसांतही समाज-चिंतनातच गुंतले होते. १ एप्रिलला पुण्याला ‘समता परिषद’ भरणार होती. बाबा आढाव, निळू फुले, भाई वैद्य आदींनी या परिषदेसाठी अविश्रांत धडपड केली होती. ३० मार्चला संध्याकाळी भाई वैद्य एस्. एम्.कडे आले. एस्. एम्.च्या शेजारी बसून भाई म्हणाले, ‘मी उद्या मुंबईला जाणार आहे. समता परिषदेतील ठरावाचा मसुदा निश्चित करावयाचा आहे.’ एस्. एम्. यांच्या

डोळ्यांत नेहमीचे तेज आले. ते बोलू लागले. ‘ठरावात दोन गोष्टी आल्या पाहिजेत. सर्व जातिधर्मांच्या लोकांमध्ये सामंजस्य निर्माण झाले पाहिजे आणि मागास समाजांना, जातींना न्याय मिळाला पाहिजे.’ त्यांच्याने पुढे बोलवेना. भाई वैद्य म्हणाले, ‘मी ठरावात घालतो हे तुमचे विचार.’ भाई मुंबईला जाऊन ३१ मार्चला रात्री परत आले. १ एप्रिलला सायंकाळी पुण्यात साने गुरुजी स्मारकावर समता परिषद भरणार होती. १ एप्रिलला सकाळीच एस्. एम्.ची शुद्ध हरपली. नानासाहेब गोरे आणि इतर कार्यकर्ते चिंतातुर होऊन एस्.एम्.च्या घरात बसून होते आणि अखेर त्याच दिवशी सायंकाळी ५॥ वाजता एस्. एम्. यांची प्राणज्योत निमाली. एक धगधगते यज्ञकुंड शांत झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी अंत्य दर्शनासाठी एस्. एम्. यांचे शव सानेगुरुजी स्मारकावर आणून ठेवण्यात आले. ‘समता परिषद’ ज्या मंडपात होणार होती त्या मंडपातच ते ठेवले. सकाळपासून महाराष्ट्राच्या सर्व भागांतून एस्. एम्. यांचे असंख्य अनुयायी आणि समता परिषदेचे कार्यकर्ते पुण्यात सानेगुरुजी स्मारकावर येत होते. दुपारी चार वाजता अंत्ययात्रा निघण्यापूर्वी कार्यकर्ते अखेरची वंदना देण्यासाठी एकत्र जमले. भाई वैद्य यांनी समता परिषदेच्या ठरावाबद्दल एस्. एम्. यांनी त्यांना जे सांगितले होते ते सर्वांना सांगितले. एस्. एम्.यांच्या अपेक्षेप्रमाणे समता परिषदेसाठी तयार केलेला ठराव वाचून दाखविला. तो एस्. एम्. यांच्या पायाशी ठेवून

भाई रुद्ध कंठाने म्हणाले, ‘समतेच्या लढ्याला या थोर नेत्याचा अखेरचा संदेश म्हणजे हा ठराव.’ कार्यकर्त्यांनी उभे राहून एस्. एम्. यांना मानवंदना दिली आणि थोड्या वेळाने एस्. एम्.ची अंत्ययात्रा मार्गस्थ झाली.

●